ॐ

ईशावास्योपनिषद्

(द्वैताद्वैतभाष्यभाषांतरांसह.)

संपादक

चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

प्रिंटर्स, पब्लिशर्स, एजंट्स् इत्यादि, ठाकुरद्वार—मुंबई.

सन १९११ इ.

ह्या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखन ठेविले आहेत.

किंमत १ रुपया.

हें पुस्तक घर नं. ४३४, ठाकुरद्वार रोड-मुंबई येथें 'इंदुप्रकाश' छापखान्यांत
रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

श्रीरामानुजमतानुयायी नारायणकृत प्रकाशिका.

सर्वेशानः सर्वभूतान्तरात्मा दोषानर्हः सर्वविद्यैकवेद्यः ।
कर्माराध्यः साध्यभक्त्यैकलभ्यः श्रीमान्यक्तो वाजिनां संहितान्ते ॥

रजस्तमःप्रचुरकरणकलेवरसृष्टिविशिष्टत्वादीश्वरोऽहमहं भोगीत्यादिभगवदुक्तप्रक्रियया स्वतन्त्रोऽहं देवतान्तरपरतन्त्रोऽहमिति च भ्राम्यतस्तत्त्वबुभुत्सयोपसन्नस्य शिष्यस्य स्वतन्त्रतात्मभ्रमादिनिवृत्त्यर्थं चिदचिदात्मकस्य प्रपञ्चस्य परमपुरुषायत्तस्वरूपस्थितिप्रवृत्तित्वमुपदिशति—

श्रीरामानुजाचार्य शिष्याच्या नारायणाची प्रकाशिका.

गुरु०—आतां यानंतर वाजसनेय संहितेतील शेवटच्या अध्यायाचें नांदीपूर्वक विस्तृत व्याख्यान करितों. या अध्यायाला ईशोपनिषद् म्हणतात. असो; सर्वांवर सत्ता चालविणारा, सर्व भूतांच्या अंतर्यामी राहून त्यांचें नियमन करणारा, स्वरूपामध्यें कोणत्याही दोषाचा गंध नसणारा, सर्व वेदवेदान्तादि विद्यांच्या अध्ययनोनें मात्र समजून येणारा, सत्कर्म करून मात्र ज्याची आराधना करितां येते, साधन होण्यास योग्य अशा एकनिष्ठ भक्तीनें मात्र ज्याची प्राप्ति होते, जो षड्गुणैश्वर्यसंपन्न आहे, त्या सच्चिदानंद परमेश्वराचें स्वरूप वाजसनेय संहितेच्या शेवटीं प्रकट झालें आहे.

वत्सा! रजोगुण आणि तमोगुण यांचें विशेष प्राबल्य झाल्यामुळें कित्येक जीवांचें शरीर व अंतःकरण कांहीं विशेष प्रकारचें झालेलें असतें. "मीच ईश्वर आहें, भोगण्याचा अधिकार मलाच आहे," इत्यादि श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें वृत्ति होऊनही "मी स्वतंत्र आहें, तरी परमेश्वरव्यतिरिक्त अन्य कांहीं देवतांच्याच तंत्रानें चालणारा आहें!" अशा प्रकारचा या पुरुषास जो भ्रम होतो, तो जीवांचा भ्रम नाहींसा करावा व आपल्याला तत्त्वज्ञान व्हावें या इच्छेनें शरण आलेल्या शिष्यांचा स्वतंत्रतात्मक भ्रम नाहींसा करावा एतदर्थ हा उपदेश आहे. तसेंच स्थावर-जंगमांनीं व चराचरांनीं (येथें जड पदार्थ आणि ज्ञानी जीव या दोघांचाही समावेश होतो) घटित झालेला जो हा प्रपंच (सृष्टिव्यवहार) तो परमेश्वराच्या (पुरुषोत्तमाच्या) मात्र तंत्रानें चालत असून त्या संसाराचें स्वरूप, त्याची स्थिति व व्यवहार हीं सर्व परमेश्वराधीनच आहेत असा उपदेश करावा, असा या मंत्रांचा अभिप्राय आहे.

*मंत्र पहिला.

इदं ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तं सर्वमीश्वरव्यतिरिक्तं भोक्तृभोग्यरूपम्। ईशा सर्वनियन्त्रा पुरुषेणेति यावत्। 'योऽसावसौपुरुषः' [बृ० ५।१५।१]। इत्यनुवदिष्यमाणत्वात्। स हि सर्वस्येष्टे। तथा च श्रुत्यन्तरम्—'पतिं विश्वस्यात्मेश्वरम्' [म० ना० ११।३]। इति। तेन वास्यं वसनीयं व्याप्यमिति भावः। 'यच्च किंचिज्जगत्सर्वं दृश्यते श्रूयतेऽपि वा। अन्तर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः' ॥ (महानारदीय० ११।६) इति श्रुतेः ॥

सिद्धान्ती—हें सर्व विश्व भोक्तृभोग्य स्वरूपाचें आहे, म्हणजे ब्रह्मदेवापासून अणूपर्यंत असणाऱ्या या सर्व चराचर संसारांत भोगण्याचे विषय आणि भोगणारे प्राणी यांचा समावेश होतो. परमेश्वराशिवाय बाकी यच्चयावत् वस्तूंचा प्रपंचामध्यें अंतर्भाव होतो. हा सर्व प्रपंच ईश्वरात्मक आहे व त्याचे अंश जीव व जड हे असून या सर्वांचा स्वामी, सर्वनियंता, परमेश्वर (उत्तम पुरुष) आहे. "जो हा तोच हा पुरुष आहे" (बृहदा० ५।१५।१) अशी श्रुति पुढें अनुवादरूपानें येणार आहे. कारण तो सर्वांचा स्वामी आहे. याचप्रमाणें दुसरी श्रुति म्हणते:—"विश्वाचा आत्मा व त्याचें पालन करणारा एक परमेश्वर मात्र आहे." (महानारदीय ११।३) या परमेश्वरानें हें विश्व व्यापिलेलें आहे.

'या जगामध्यें जे यच्चयावत् पदार्थ दिसतात किंवा ऐकावयास येतात ते सर्व (अंतर्विश्वांतील व बाह्यविश्वांतील) पदार्थ व्यापून सर्वेश्वर नारायण राहिला आहे.' (म० ना० ११।६) अशी श्रुति प्रमाण आहे.

यद्वा सर्वाधारे स्वस्मिन्नेव सर्वं वास्यं प्रतिष्ठापनीयम्। स्मर्यते हि—

सर्वत्रासौ समस्तं च वसत्यत्रेति वै यतः।
ततः स वासुदेवेति विद्वद्भिः परिपठ्यते ॥ इति।

शिष्य०—भगवन्! किंवा सर्वांचा आधार जो परमेश्वर आहे त्याच्या आश्रयानें व त्याच्या स्वरूपामध्यें ह्या सर्व विश्वाची स्थापना झाली आहे. असाही अर्थ होईल. स्मृतीमध्यें म्हटलें आहे कीं परमेश्वराला विद्वान् लोक वासुदेव असें म्हणतात. याचें कारण तो सर्वव्यापी आहे आणि प्रत्येक वस्तूच्या अंतर्यामी व बाहेर सर्वत्र तो वास्तव्य करितो म्हणजे राहतो. म्हणजे सर्व विश्व त्याच्या आश्रयानें व त्याच्या स्वरूपामध्यें राहतें.

---

* मंत्रांचे अन्वयार्थ-मागें दिलेच आहेत. केवळ भाष्य व त्याचा अर्थ इतका मात्र विषय येथें घेतला आहे.

जगत्यां मह्याम्। इदं लोकान्तरोपलक्षणम्। जगदन्यथात्वं गच्छत्। तत्र चिदंशस्य भोग्यत्वाय स्वरूपविकाररूपमन्यथात्वम्। चिदंशस्य तु भोक्तृत्वाय ज्ञानसंकोचविकासादिस्वभावविकारेणान्यथात्वमिति भेदोऽनुसंधेयः। ईशेनावास्यं किंचिदपि नास्तीति द्रढयितुं यत्किंचेति जगद्विशेष्यते। जगत्यादिषु लोकेषु यत्किंचिद्भोक्तृभोग्यरूपं जगदस्ति तदिदं सर्वमीशा वासुदेवेन वास्यं धार्यं चेति वाक्यार्थः।

गुरु०—ठीक! पुढें चल. जगत्याम् म्हणजे ह्या पृथ्वीमध्यें, या शब्दानें इतर लोकांचाही म्हणजे विश्वांतील सर्व भुवनांचा उल्लेख होतो. पृथ्वी हें उपलक्षण आहे; यानें सर्व जगतांचा बोध होतो. जगत् या शब्दानें जडपदार्थांचा (उपभोग घेण्यास उपयोगी आणि स्वस्वरूपामध्यें विकार पावून अन्य स्वरूप घेणाऱ्या विषयांचा) उल्लेख होतो. तसेच उपभोग घेणारे व ज्ञानाचा संकोच, विकास, इत्यादि विकारांनीं अन्य स्वरूप पावणाऱ्या जीवांचा उल्लेख होतो. सारांश, भोगाचे विषय असून स्वरूपीं विकार पावणारे जड पदार्थ व ज्ञानाच्या कमीजास्तपणामुळें विकार पावणारे जीव (विषय भोक्ते) या दोघांचाही अन्तर्भाव ह्या जगत् शब्दामध्यें होतो 'जगत्' म्हणजेच 'अन्यस्वरूप प्राप्त करून घेणारें' असा अर्थ आहे. या जगांत ईश्वरानें व्याप्त नाहीं असा कोणताही पदार्थ नाहीं. हें दृढ करण्यासाठीं "यत्किंच (सर्व कांहीं)" हे शब्द घातले आहेत. असो; या सर्व भुवनांमध्यें जीव व जड या भिन्न स्वरूपानें जें जें कांहीं आहे तें तें या सर्व नियामक वासुदेवानें धारण केलें आहे, सर्वांस वासुदेवाचा आश्रय आहे. प्रथमार्धाचा सारांश, सर्व कांहीं वासुदेवानें व्यापलेलें आहे, असा आहे.

इन्द्रियाणि मनो बुद्धिः सत्त्वं तेजो बलं धृतिः।
वासुदेवात्मकान्याहुः क्षेत्रं क्षेत्रज्ञ एव च॥ [गी० ३।४०]

इत्याद्युपबृंहणानि बोध्यानि 'पृथगात्मानं प्रेरितारं च मत्वा [श्वे० १।६]। 'ज्ञाज्ञौ द्वावजावीशनीशौ' [श्वे० १।९]। 'नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानामेको बहूनां यो विदधाति कामान् [श्वे० ६।१३] इत्यादिषु श्रुतिषु प्रसिद्धो जीवेश्वरयोरीशेशितव्यादिलक्षणोऽत्यन्तभेदोऽप्यत्र सिद्धः। ननु रूढिर्योगमपहरतीति न्यायादीशोऽत्र रुद्रः स्यात्।

नैवम्।

'एको ह वै नारायण आसीन्न ब्रह्मा नेशानो नेमे द्यावापृथिवी न नक्षत्राणि न यमो नाग्निर्न सोमो न सूर्यः स एकाकी नर एव' [म० १]। इत्यादिषु श्रुतिषु भगवत्कार्यत्वेन कर्मवश्यत्वेन च

संप्रतिपन्ने रुद्रे सर्वव्यापित्वसर्वाधारत्वादेरन्वयासंभवेन विरुद्धार्थविषयतयैव रूढेर्भग्नत्वात्। एवं च जगत्कारणवादिवाक्यावगताकाशप्राणादिशब्दन्यायेनाजः सर्वेश्वरः सिद्ध इत्यनवच्छिन्नैश्वर्यतया प्रसिद्धेः सर्वेश्वरेऽयौगिक एवायमीशशब्दः प्रत्येतव्य इति सिद्धम्। एवं मुमुक्षोरीश्वरपारतन्त्र्यबोधमुत्पाद्य वैराग्यभूषितां वृत्तिमुपदिशति-तेन त्यक्तेन भुञ्जीथाः। तेन जगता भोग्यताभ्रमविषयेणेति भावः। त्यक्तेनाल्पत्वास्थिरत्वदुःखमूलत्वदुःखमिश्रत्वदुःखोदर्कत्वदेहाभिमानमूलत्वादिस्वाभाविकब्रह्मानन्दानुभवविरुद्धरूपविषयदोषनिरूपणपूर्वकपरित्यक्तेनोपलक्षितः सन्भुञ्जीथाः। भगवदुपासोपयुक्तदेहस्य धारणमात्रौपयिकमन्नपानादिकं यागदानहोमार्चनाद्युपयोगिपरिजनपरिच्छदादिकं च वर्गे भुञ्जीथा इत्यर्थः। यद्वा दोषसप्तकनिरूपणात्त्यक्तेन भोग्याभासेनोपलक्षितः सन्भुञ्जीथाः। सर्वावासत्वेन प्रकरणप्राप्तं प्रकृतमुक्तदोषप्रतिभटं निरतिशयभोग्यं वक्ष्यमाणोपायमूढेन भुञ्जीथा इति योज्यम्। तत्र 'भोक्ता भोग्यं प्रेरितारं च मत्वा' [श्वे० १।१२]

'द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते। तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति॥

[मुण्ड० ३।१]*

'समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः॥'

[मु० ३।२] इत्यादिभिः प्रपञ्चितस्तत्त्वत्रयविवेकोऽप्यत्रेति भावः। अनीशया भोग्यभूतया मायया प्रकृत्येत्यर्थः। जुष्टं प्रीयमाणम्। स्वस्मादन्यमीशमस्येशस्य महिमानमिति महिमानं चेत्यर्थः। तदेतिप्रतिनिर्देशोऽध्याहार्यः। यदाऽन्यमीशमस्य महिमानं च पश्यति तदा वीतशोको भवतीत्यर्थः। मा गृधः कस्यस्विद्धनम्। कस्यचिद्धनं कस्याऽपि बन्धोरबन्धोर्वा धनं मा गृधः, माऽभिकाङ्क्षीः। गृधु अभिकाङ्क्षायामिति धातुः।

आह च यमः किंकरं प्रति—

परमसुहृदि बान्धवे कलत्रे सुतवनितापितृमातृभृत्यवर्गे।
शठमतिरुपयाति योऽर्थ-तृष्णां पुरुषपशुर्नहि वासुदेवभक्तः॥

इति स्मृतेः। इदं च धनाशाप्रहाणं परमात्मव्यतिरिक्तकृत्स्नविषयवैराग्योपलक्षणम्।

परमात्मनि यो रक्तो विरक्तोऽपरमात्मनि । इति स्मृतेः ॥ १ ॥

शिष्य०—गुरुजी! सर्व ज्ञान-कर्मेंद्रियें मन, बुद्धि, सत्त्व, तेज, बल, धृति, (धैर्य) सारांश, हें सर्व क्षेत्र (सर्व जडपदार्थ) आणि सर्व क्षेत्रज्ञ (सर्व जीव) हे वासुदेवात्मक आहेत. (गीता* ३।४०) अशी ही एक स्मृति आहेच!

गुरु०—होय. हें व इतर वाक्यें हीं ध्यानांत ठेवणें इष्ट आहे. कारण येथें जीव व शिव हे परस्परभिन्न आहेत, हें स्पष्ट करावयाचें आहे. पहाः—"आपण निराळा आणि आपला प्रेरक निराळा असें मानून" (श्वेताश्वतर १।६) "ज्ञाता आणि अज्ञानी असे हे ईश्वर आणि तत्तंत्रानें चालणारा जीव हे दोघे अनादि आहेत" (श्वे० १।९) "नित्यांचा (जीवांचा) नित्य (ईश्वर) आणि चेतनांचा चेतक हा परमेश्वर असून तो पुष्कळांच्या इच्छा पूर्ण करितो" (श्वे० ६।१३) इत्यादि श्रुतींमध्यें जीव आणि ईश्वर यांचा संबंध सेव्य-सेवकाचा आहे. व या उभयतांमध्यें अत्यंत भेद आहे, असें सांगितलें आहे. तोच अर्थ या मंत्राच्या पहिल्या अर्धांत स्पष्ट करून श्रुतीला जीवशिवांमध्यें अत्यंत भेद आहे, असें सांगावयाचें आहे.

शि०—भगवन्! शब्दसिद्ध अर्थापेक्षां (यौगिक अर्थापेक्षां) रूढ झालेला (प्रचारांत आलेला) अर्थ जास्त बलवान् असतो असा न्याय आहे; म्हणून वरील मंत्रांत ईश याचा अर्थ रुद्र असा कां घेऊं नये? ईश म्हणजे रुद्र' असें म्हणण्याची रूढीही आहे.

गुरुजी—नाहीं, असा अर्थ होणार नाहीं. कारण "एक नारायणच पूर्वी (आदिकालीं) होता. ब्रह्मा किंवा रुद्र, किंवा द्यावापृथ्वी, नक्षत्रें, यम, अग्नि, सोम, सूर्य, हे कोणीही नव्हते. तो नारायणच एकटा एक नर होता." (म० १) इत्यादि श्रुतींवरून रुद्र हा नारायणानें उत्पन्न केला आहे व तो कर्माला वश्य आहे, (तो कर्मांच्या स्वाधीन असतो, कर्म-तंत्रानें चालतो.) म्हणून कर्म-तंत्र व नारायणतंत्र रुद्राला सर्व-व्यापकत्व, सर्वाश्रयत्व (सर्वांस आश्रय देणें हा धर्म) इत्यादि लक्षणें असंभवनीय होतात, लागत नाहींत. तसेंच, प्रस्तुत रूढीही विरुद्ध अर्थाचें प्रतिपादन करिते म्हणून या मंत्रांत ईश या शब्दाचा रुद्र असा अर्थ घेतां येत नाहीं. याचप्रमाणें, जगत्-कारण सांगणारीं जीं वाक्यें आहेत, तेथें अवगत झालेल्या आकाश, प्राण इत्यादि शब्दांची जशी व्यवस्था लागते, त्याच न्यायानें व हा परमेश्वर जन्मरहित, सर्वस्वामी, स्वयंभू इत्यादि निरुपाधिक ऐश्वर्यानें मंडित आहे म्हणून, येथील 'ईश' शब्द हा सर्वेश्वर जो नारायण त्यालाच लावला पाहिजे, हें सिद्ध झालें. याप्रमाणें वरील मंत्रार्धाचा अर्थ असा आहे कीं, जीव हा सर्वथा ईश्वरतंत्र म्हणजे परतंत्र आहे, हें ज्ञान मुमुक्षूला समजावें. नंतर, त्यानें वैराग्यवृत्ति कशी धारण करावी तें दुसऱ्या अर्धांत

* ही गीता कोणती हें या नारायणपंडितांनीं सांगितलें नाहीं.

सांगितलें आहे. पहिल्या अर्धांत जीव हा सर्वथा परमेश्वरतंत्र आहे, असें निश्चयपूर्वक सांगण्याचा मात्र अभिप्राय आहे. असो.

त्या 'भोग्यता' नामक भ्रम उत्पन्न करणाऱ्या जगताचा (सर्व विषयांचा) त्याग करावा. कारण ते सर्व विषय अल्प आनंद देणारे, चंचल, (अनित्य) दुःखमूलक, दुःखमिश्रित, दुःखमय, देहाभिमान उत्पन्न करणारे, इत्यादि लक्षणांचे असतात. अर्थातच स्वभावतः उत्पन्न होणारा जो ब्रह्मानंद आणि त्याचा अनुभव यांच्या विरुद्ध हे विषयदोष असतात. हें पूर्णपणें लक्षांत ठेवून म्हणजे हे विषय तुच्छ आहेत असें समजून त्यांचा उपभोग घ्यावा. सारांश, भगवंताच्या उपासनेला उपयोगी पडेल इतक्याच बेतानें आपला देह धारण करावा व देह धारण होईल इतकेंच मात्र आपण अन्नपानादिकांचें सेवन करावें. तसेंच याग, (यज्ञ) दान, होम, अर्चन, (पूजा) इत्यादिकांच्या उपयोगी पडतील असा परिवार व अशी उपकरणें मात्र स्वकृत करावीं. जीव धारण होईल, इतकें अन्नपानादिकांचें सेवन आणि यज्ञ याग दान, धर्म, इत्यादि विहित कर्में करितां येतील, इतका मात्र परिग्रह ठेवावा व एवढ्याचा मात्र उपयोग घ्यावा. सारांश, ईश्वर उपासनेसाठीं उपभोग घ्यावा. भोगासाठीं ईश्वर-उपासना करूं नये. असा तात्पर्यार्थ आहे.

शिष्य०—महाराज ! याचा दुसराही असा अर्थ होईल कीं वर जे सात दोष सांगितले आहेत ते ध्यानांत ठेवून (म्हणजे विषयसुखपोषक नाहींतच, जें सुखसें वाटतें तो भास आहे, असें समजून) या विषयांचा उपभोग घ्यावा. सारांश, विषयसुखाचा त्याग करावा व मग कार्यापुरतें विषयसेवन करावें.

गुरु०—अथवा, सर्वत्र ईश्वर भरला आहे म्हणून हे सर्व विषयही आपापले स्वरूप-दोष टाकून देऊन ईश्वर-स्वरूपानें निरतिशयसुख देणारे झाले आहेत, असा निश्चय करून मुमुक्षूनें उपभोग घ्यावा. 'विषयभोगदृष्टीनें सुख देतील' हा जो मायाजनित भ्रम असतो तो टाकून देऊन ज्ञानदृष्टीनें मात्र त्यांचा उपभोग घ्यावा. निदान प्रकृतीमध्यें जे दोष आहेत, ते दोष परमेश्वरामध्यें नसल्यामुळें व त्याचे गुण प्रकृतिगुणांचे विरोधी असल्यामुळें, भोगाचें निरतिशय सुख देणाऱ्या परमेश्वराचा उपभोग पुढें सांगितलेल्या साधनांचे संबंधानें उपायमूढ होऊन उपभोग घ्यावा, असा हा उपदेश आहे.

शिष्य०—गुरुजी !—" भोक्ता निराळा आणि प्रेरक निराळा असें जाणून " (श्वे० १।१२) " नित्य एकत्र राहणारे दोन पक्षी (जीव आणि शिव) अत्यंत स्नेही असून एकाच वृक्षाचा (प्रपंचाचा, देहाचा) आश्रय करून बसलेले असतात. त्यांतील एकजण (जीव) त्या वृक्षाचीं गोडगोड फळें खातो. आणि दुसरा (ईश्वर) कांहीं एक न खातां साक्षी मात्र असतो " (मुंडक ३।१) " एकाच वृक्षावर जीव हा आपल्या परतंत्र्यानें संसारांत बुडून गेलेला

असतो आणि म्हणून मूढ होऊन शोक करित असतो. पण आपल्यापेक्षां निराळा व आपला स्वामी (ईश्वर) आनंदरूपी आहे असें जाणून त्याचा महिमाही मोठा आहे असें जेव्हां त्याला समजतें, तेव्हां त्याचा शोक नाहींसा होऊन तो जीव शोकशून्य (आनंदी) होतो" (मुं० ३।२) इत्यादि श्रुतींमध्यें तीन तत्त्वांचा, भोक्ता (जीव), भोग्य (विषय) आणि त्यांचा स्वामी (परमेश्वर) यांचा, विस्तार केला आहे. तींच तीन तत्त्वें याही मंत्रांत सांगितलीं आहेत. असें मला वाटतें. असाच भावार्थ आहे. नाहीं?

गुरु०—होय. वरील मुंडक श्रुतींत भोग्य असणारी जी माया किंवा प्रकृति तिचा (अनीशया शब्दानें) उल्लेख आहे. अनीश म्हणजे परतंत्र होय. त्याचप्रमाणें जीवाहून आनंदरूपानें निराळा (अन्य) परमेश्वर व त्याचा महिमा यांचाही उल्लेख आहे. जेव्हां परमेश्वर आणि त्याचा महिमा या उभयतांचें ज्ञान जीवाला होतें, तेव्हां जीवाचा शोक नाहींसा होतो असें स्पष्ट सांगितलें आहे. यावरून परतंत्र प्रकृति, दुःखी जीव व स्वतंत्र आणि आनंदी परमेश्वर या तीन तत्त्वांचा उल्लेख करून त्यांत अत्यंत भेद आहे, असें दाखविलें आहे.

शिष्य०—गुरुजी! 'कोणाचेंही धन घेऊं नको' या मंत्रगत शब्दाचा अर्थ असाचना कीं 'शत्रु किंवा मित्र कोणीही असो; त्याचे धनाचा अपहार करण्याची इच्छा करूं नको?' गृध्=अभिलाष करणें असा धात्वर्थ आहे.

गुरु०—होय. एकदां यम आपल्या दूतांस म्हणाला, "दूत हो! आपले परम स्नेही, बंधु-बांधव, कलत्र, पुत्र, माता-पिता, सेवक, इत्यादिकांचे ठिकाणीं जो दुष्ट पुरुष लबाडीनें, अर्थ-तृष्णा ठेवून मात्र त्यांची संगति करितो, तो पुरुष-पशूच होय. तो वासुदेवभक्त नव्हे." असो; परमात्म्याशिवाय बाकी सर्व विषयांसंबंधी वैराग्य उत्पन्न करून घ्यावें, हें 'धनाचा लोभ सोडून दे,' या वाक्यानें सांगितलें आहे. सारांश, सर्व विषयांचा परित्याग करून ईश्वरतंत्र आपण आहोंत असा उपदेश मुमुक्षूस व्हावा व ईश्वरसेवेस उपयोगी पडेल इतकाच विषयभोग घ्यावा, हा या पहिल्या मंत्राचा अर्थ आहे. म्हटलें आहे; परमेश्वरावर ज्याची भक्ति असते तो इतर पदार्थांच्या संबंधानें विरक्तच असतो ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

एवं विरक्तस्य विदुषः फलसङ्गकर्तृत्वादिरहितो ब्रह्मविद्याङ्गभूतः कर्मयोगो यावज्जीवमनुष्ठेय इत्याह—

सिद्धान्ती—याप्रमाणें ज्या पंडिताला वैराग्य प्राप्त झालें आहे, त्यानें फलाची आशा न धरितां व कर्तृत्वाचा अभिमान सोडून देऊन यावज्जीव श्रुतिविहित कर्मयोगाचें अनुष्ठान करावें. हा असला कर्मयोग ब्रह्मविद्येचे एक अंगच आहे. असा अभिप्राय मनांत आणून म्हणतात—

शतं समाः, शतं संवत्सरान्। कर्माणि नित्यनैमित्तिकानि। कुर्वन्नेवेह लोके जिजीविषेज्जीवितुमिच्छेत्। ब्रह्मविदोऽपि यावद्विद्यापूर्ति जीवितुमिच्छा भवतीति प्राप्तत्वात्। शतायुर्वै पुरुष इति श्रुतेः। यावज्जीवं नित्यनैमित्तिककर्माणि कुर्वीतेति विधिः संक्रामयितव्यः। यावज्ज्ञानयोगाधिकारं कर्मयोगः कर्तव्य इति भावः। न कदाचिदपि विद्याङ्गं कर्म परित्यजेदित्येवकाराभिप्रायः। त्वयि। ईश्वरपरतंत्ररूपज्ञानतया तदाज्ञानपरिपालनरूपकर्मानुष्ठानेऽधिकारपूर्तिमतीति भावः। एवमेवानुष्ठानमित्यर्थः। उक्तमर्थं व्यतिरेकेण दृढीकरोति-नान्यथे तोऽस्तीति। इतः कर्मानुष्ठानादन्यथा प्रकारान्तरं नास्तीत्यर्थः। नान्यः पन्थास्तत्तोषकारणमिति स्मृतेः।

शंभर वर्षेपर्यंत नित्यनैमित्तिक कर्मे करून मात्र या कर्मभूमीवर जिवंत राहण्याची इच्छा प्रत्येक पुरुषानें करावी.' या मंत्रांतील आज्ञेचा अर्थ असा होतो कीं, ब्रह्मवेत्याला सुद्धां विद्या पूर्ण हस्तगत होईपर्यंत जीवंत राहण्याची इच्छा असते. म्हणून त्यानेंही नित्यकर्म केलेंच पाहिजे. 'मनुष्याला शंभरवर्षे आयुष्य असतें' असें श्रुति म्हणते. असो; सर्व ब्रह्मवेत्ते व तदितर पुरुष यांनीं नित्यनैमित्तिक कर्मांचें अनुष्ठान करावें, असा विधि विहित आहे. सारांश, ज्ञानयोगाचा अधिकार असतांनाही कर्मयोग करावा असा भाव आहे. मंत्रामध्यें जो "एव (ही)" असा शब्द आहे. त्याचा अभिप्राय असा आहे कीं, विद्येचें मुख्य अंग असणाऱ्या कर्मांचा केव्हांही त्याग करूं नये. मंत्रांत "तुझ्यामध्यें" असा जो शब्द आहे त्याचा अर्थ असा कीं, जीव हा ईश्वर-तन्त्र आहे, तो ईश्वराच्या सर्वथा स्वाधीन आहे, असें ज्ञान झालें असतें, म्हणून याची आज्ञा परिपालन करण्याचें जें कर्मानुष्ठान त्याचा अधिकार पूर्णत्वानें संपादन केला आहे; अशा मुमुक्षूनें यावज्जीव कर्मानुष्ठान करावें. या म्हणण्याचें तात्पर्य असें आहे कीं, 'मी ईश्वर-परतंत्र आहें.' असें ज्ञान झालेल्या मुमुक्षूनें ईश्वराची आज्ञा एकनिष्ठेनें पाळावयाची आहे आणि मोक्षाचा अधिकार संपादन करावयाचा आहे.

हेंच अनुष्ठान होय. हाच अर्थ दृढ करण्याकरितां स्मृतिही असें म्हणते कीं, कर्मानुष्ठानाखेरीज परमेश्वराला संतुष्ट करण्याचें दुसरें साधनच नाहीं.

नन्वीश्वरवेदिनोऽपि कर्मानुष्ठानादवश्यंभावी बन्धः स्यादित्याशङ्क्याऽऽह न कर्म लिप्यते नर इति । ब्रह्मविद्याविरुद्धेषु कर्मफलेषु न रमत इति नरः । प्रस्तुतब्रह्मविदि नरे विद्याङ्गतया क्रियमाणं कर्म न लिप्यते न स्वर्गादिहेतुर्भवति प्रत्युत शुद्धप्रत्यगात्मसाक्षात्कारमेवोत्पादयतीति भावः। यत्तु कुर्वन्नेवेह कर्माणीत्ययं विधिरविद्वद्विषय एव नतु ब्रह्मविद्विषयस्तस्य विधिनिषेधशास्त्रवश्यत्वाभावादिति व्याख्यानम् तत्प्रकरणविरुद्धम् । 'विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभय ँ सह' [ई० वा० । ११] इत्याद्युपरितनविध्यन्तरविरुद्धं चेति न वेदविदो बहु मन्वते ॥ २ ॥

पूर्वपक्षी—अहो कर्मांचें अनुष्ठान केलें असतां जीव आवश्यकतः बद्धच होतो; मग त्याला ईश्वराचें ज्ञान असो वा नसो. भगवद्भक्ताचें कर्महीं स्वतःला प्रतिबद्धकच होणार.

सिद्धान्ती—नाहीं. ब्रह्मविद्येला जीं विरुद्ध कर्में व कर्मफलें आहेत त्यांमध्यें जो लिप्त होत नाहीं त्याला 'नर' म्हणावें अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणांत सांगितलेलें ब्रह्म जाणणाऱ्या नराला हें कर्म, विद्येची पुष्टि करणारें कर्म, केव्हांही बद्धक होत नाहीं. ह्या विहित कर्मानें स्वर्गनरकांची प्राप्ति होत नाहीं, इतकेंच नव्हे (म्हणजे हें कर्म बद्धक होत नाहीं इतकेंच नव्हे), तर शुद्ध व निर्विकार असा जो प्रत्यगात्मा आहे (जो शुद्ध, निर्विकार सर्वज्ञ, सर्व दयाळु असा परमेश्वर आहे) त्याचा साक्षात्कारही उत्पन्न करितें. सारांश, वर सांगितलेलीं नित्य नैमित्तिक कर्में निष्काम बुद्धीनें व निरहंकार-वृत्तीनें केलीं तर परमेश्वराची प्राप्ति होते. कारण या असल्या कर्मांनीं परमेश्वरी-ज्ञान होण्याला साधकास सर्व प्रकारचें परमेश्वरी साहाय्य मिळतें.

पूर्वपक्षी—अहो ! हा मंत्र ज्याला ब्रह्मज्ञान झालें नाहीं, त्यानें मात्र नित्यनैमित्तिक कर्में करावीं, अशी आज्ञा विहित करितो. ब्रह्मवेत्त्याला कर्म करण्याची आवश्यकताच नाहीं. येथें ब्रह्मवेत्त्याचा विषयच नाहीं. व त्याचा संबंधही नाहीं. कारण ते विधि-निषेध शास्त्रांच्या सत्तेपलीकडे गेलेले असतात.

सिद्धान्ती—हा तुमचा अर्थ प्रस्तुत प्रकरणाला विरोधी आहे. चाललेल्या प्रकरणावरूनच असें दिसतें कीं ब्रह्मवेत्त्यानेंही विद्या-पोषक कर्में केलींच पाहिजेत. असा विधि या मंत्रांत स्पष्ट सांगितला आहे. याच उपनिषदांतील अकरावा मंत्र पाहिला म्हणजे तुमचें बोलणें अप्रासंगिक आहे, असें स्पष्ट दिसेल. तेथें विद्या व

अविद्या या उभयतांचा, ज्ञानकर्मांचा, समुच्चय केला आहे व दोहोंच्या ज्ञानांची आवश्यकता आहे, असें सांगितलें आहे. यावरून अर्थातच वेदवेत्ते आणि वेदावर श्रद्धा ठेवणारे लोक तुमच्या या म्हणण्याला मुळींच किंमत देणार नाहींत ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

एवं मंत्रद्वयेन तत्त्वत्रयं विद्याङ्गकर्मानुष्ठानं चोपदिष्टम् । ईशनीया आसुरप्रकृतयः शास्त्रविधिमुत्सृज्य यज्ञादि कर्म कुर्वन्ति निषिद्धकर्म चाऽऽचरन्ति आत्मघातिनो निरयपातिन इत्युपदिशत्याचार्यः—

याप्रमाणें वरील दोन मंत्रांत तीन तत्त्वांचा (ईश्वर, जीव, आणि जगत् हीं तीन तत्वें) आणि ब्रह्मविद्येस उपयोगी पडणारें कर्मांचें अनुष्ठान, यांचा उपदेश केला. आतां, यापुढील तिसऱ्या मंत्रांत ईश्वराच्याच स्वाधीन असणारे परंतु आसुर प्रकृतीनें वागणारे, लोक शास्त्रांविधि सोडून देऊन यज्ञादि कर्में करितात, सारांश, अविधिपूर्वक कर्में करितात. व कांहीं लोक निषिद्ध कर्मांचें आचरण करितात; ते सर्व लोक आत्मघाती आहेत व त्यांना नरकवास मिळेल, हें सांगितलें आहे.

असुराणां स्वभूता असुर्या अतिदारुणा इत्यर्थः । नामेति प्रसिद्धौ । असुरस्वभावानुभाव्या निरयसंज्ञिता लोकाः सन्तीति शास्त्रप्रसिद्धमिति भावः । तान्विशिनष्टि—अन्धेन तमसाऽऽवृता इति अन्धेनातिगाढेन तमसाऽन्धकारेणाऽऽवृता व्याप्ताः । आलोकप्रसङ्गरहिता इति भावः । ये केचन देवा मनुष्या ब्राह्मणक्षत्रियादयो वाऽऽत्महनः । 'असन्नेव स भवत्यसद्ब्रह्मेति वेद चेत्' । [तै० २।६।९ ।] इत्यज्ञाता ब्रह्मज्ञानविहीनाः । काम्यनिषिद्धकर्मादिनिष्ठा इत्यर्थः । जना जनिमन्तः संसरन्त इत्यर्थः । ते प्रेत्य देहादुत्क्रम्य तानभितो गच्छन्ति । तान्पृथिव्यन्तरिक्षस्वर्गरौरवादिसंज्ञितान्निरयान्निरन्तरं गच्छन्तीति भावः ॥ ३ ॥

सिद्धान्ती०—अति दारुण म्हणजे अति भयंकर अशी ज्यांची प्रकृति असते त्यांना आसुर प्रकृतीचे लोक म्हणतात. यांना आपल्या आसुरी स्वभावास अनुकूल असणाऱ्या प्रकृतीच्या अनुरोधानें 'निरय' नामक लोकांत वास्तव्य करावें लागतें हें शास्त्र प्रसिद्धच आहे. या लोकांसाठींच नरकादि भुवनें उत्पन्न केलीं आहेत. हीं भुवनें अतिगाढ अंधकारानें भरलेलीं आहेत. येथें कोणी कोणास दिसत नाहीं व कोणी कोणास पाहूं शकतही नाहीं.—असो; जे कोणी देव किंवा मनुष्य (ब्राह्मण क्षत्रियादि कोणीही) आत्मघाती लोक आहेत.—

शिष्य०—भगवन्! आत्मघाती म्हणजे काय?

सिद्धान्ती०—"ब्रह्म हें असत् (शून्य) आहे, ब्रह्म नाहीं" असें जे लोक समजतात, ते असत् होतात" असें तैत्तिरीय श्रुति म्हणते. सारांश, ज्यांना ब्रह्मज्ञान नाहीं ते आत्मघाती लोक होत. हे आसुरी लोक नेहमीं काम्य आणि निषिद्ध कर्में करण्यामध्यें दंग झालेले असतात. अर्थातच हे लोक जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतात, संसारी होतात. या लोकांचा देहपात होतांक्षणीं ते पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग, रौरव, नरक इत्यादि भुवनांमध्यें स्वस्वकर्मानुसार प्रवेश करितात. देहपात झाल्याबरोबर हा लोक सोडून ते स्वकर्माप्रमाणें इतर लोकीं जातात व तेथें सुखदुःखांचा अनुभव घेतात ॥ ३ ॥

मन्त्र चवथा.

एवं विद्यायां शीघ्रं प्रतिपत्तिसिद्ध्यर्थमविदुषामनर्थ उक्तः। अथ सर्वावासत्वेन प्रस्तुतस्येश्वरस्यानन्तविचित्रशक्तियोगं व्यञ्जयन्नुपदिशति—

सिद्धान्ती—याप्रमाणें ब्रह्मविद्येकडे जीवांचें लवकर लक्ष लागावें आणि या विद्येविषयीं दृढ रुचि उत्पन्न व्हावी म्हणून अविद्वान् लोकांच्या दैवीं कोणते अनर्थ वाढून ठेविलेले असतात, हें तिसऱ्या मंत्रांत सांगितलें. आतां, या मंत्रांत सर्व चराचर विश्वास व्यापून राहणारा व सर्वांचें नियमन करणारा जो स्तुतियोग्य परमेश्वर त्याच्या अनंत आणि विचित्र शक्ति कशा आहेत त्यांचें दिग्दर्शन करितात.

अनेजन्नकम्पमानम्। एजृ कम्पने। एकं प्रधानतमम्। प्रधानं शास्त्रविदुषामिति रुद्रस्मृतेः। स्वाधिकसमानद्वितीयरहितमिति वा। 'न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते' [श्वे० ६।८] इति श्रुतेः। परमसाम्यमापन्ना अपि मुक्ता ईशाधीना एवेति भावः। मनसो जवीयः, वेगवतो मनसो जवीयो वेगवत्तरम्। निष्कम्पं वेगवत्तरं चेति विरोधः प्रतीयते। परिहारस्तु विभुत्वाद्धस्तुतो नैजति तत एव मनसो गोचरदेशे वर्तत इति मनसो जवीय इत्युपचर्यत इति। किंच देवा ब्रह्मरुद्रादयः पूर्वमर्षत्। प्रागेव सर्वान्देवान्प्राप्नुवन्नित्यर्थः। एतत्प्रस्तुतं सर्वावासं ब्रह्म नाऽऽप्नुवन्नेतावन्तं कालं न लेभिर इति भावः। पूर्वमेव प्राप्तं न प्राप्नुवन्निति च विरोधः। विभुतया प्राप्तमपि कर्मसंकुचितज्ञानाः क्षेत्रज्ञा आचार्योपदेशमन्तरेण स्वबुद्ध्या नाप्नुवन्तीति परिहारः। तथोक्तं छान्दोग्ये 'तद्य-

थाऽपि हिरण्यनिधिं निहितमक्षेत्रज्ञा उपर्युपरि संचरन्तो न विन्देयुरेवमेवेमाः सर्वाः प्रजा अहरहर्गच्छन्त्य एतं ब्रह्मलोकं न विन्दन्त्यनृतेन हि प्रत्यूढाः [८।३।२] इति । 'अपि तद्धावतोऽन्यानत्येति यः पृथिव्यां तिष्ठन्' [बृ० ३।७।३] 'य आत्मनि तिष्ठन्' । 'यः सर्वभूतेषु तिष्ठन्' इत्यादिश्रुतेः । सर्वत्र तिष्ठदेव तद्ब्रह्म धावतोऽन्यान्देवादीनत्येति । तिष्ठतः पुरुषस्य धावदतिक्रमणं न घटत इति विरोधः । जविनो यावद्यावद्धावन्ति तावतस्तावतः परस्तादपि वर्तत इति तात्पर्यादविरोधः । तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति । तस्मिन्त्सर्वावासेऽवस्थितो मातरिश्वा वायुः । अप इत्युपलक्षणं पयोधरग्रहनक्षत्रतारकादिकं बिभर्तीत्यर्थः । सर्वाधारभूतेन सर्वेश्वरेण विधृतो वायुस्तत्सत्तयैव बिभर्तीत्यभिप्रायः । 'एष सेतुर्विधरण एषां लोकानामसंभेदाय [बृ० ४।४।२२] ।

द्यौः सचन्द्रार्कनक्षत्रा खं दिशो भूर्महोदधिः ।
वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मनः ॥

इत्यादिषु प्रसिद्धमेतत् ॥ ४ ॥

सर्व वस्तूंमध्यें श्रेष्ठ व सर्व शास्त्रवेत्यांमध्यें मुकुटमणी जो परमेश्वर तो 'एक' या शब्दानें उल्लेखिला आहे. रुद्रस्मृतिही असेंच म्हणते. एक याचा अर्थ असाही होईल कीं ज्याच्याहून कोणी अधिक नाहीं किंवा ज्याच्या बरोबरीचाही कोणी नाहीं. 'त्याच्या बरोबरीचा कोणी नाहीं आणि त्याच्याहून श्रेष्ठतर असाही कोणी नाहीं.' अशी (श्वेताश्वतर ६।८) श्रुति प्रमाण आहे. तात्पर्य, असें कीं, सारूप्य (सरूपता) नामक मुक्ति पावलेले जीव सुद्धा या ईश्वराच्या अधीन असतात! एवंच, हा सर्वस्वामी आहे. हा सदैव स्थिर असतो. म्हणजे कूटस्थ आहे. हा कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नाहीं, तरी याचा वेग (याची चालण्याची गति) मनापेक्षांही शीघ्रतर, जास्त जोराचा आहे.

शिष्य—परमेश्वर स्थिर आहे आणि अत्यंत वेगवान् आहे हें म्हणणें विरोधाचें दिसतें. मुळींच न चालणारा अति वेगानें कसा चालेल?

सिद्धान्ती—या विरोधाचा परिहार असा आहे कीं हा परमेश्वर सर्वव्यापी आहे. म्हणून हालचाल करण्याचें याला कारणच नाहीं. तथापि जेथें जेथें मनाची धांव जाते, तेथें तेथें हा अगोदरच गोचर होतो. तेथें तो मनाला दिसतो म्हणजे मनाच्या आधींच तो तेथें जातो. म्हणून तो मनापेक्षां जास्त वेगवान् आहे; असें रूपक करून म्हटलें. तात्पर्य, तो सर्वव्यापी आहे हें सांगावयाचें आहे. आणखी; ब्रह्मदेव, शंकर, इत्यादि देवांस परमेश्वराची पूर्वीच प्राप्ति झाली;

परंतु हें जें सर्वप्राप्त व विश्वंभर ब्रह्म आहे, त्याची मात्र जाणीव या देवांसही हा काल पर्यंत झाली नाहीं.

शिष्य—पूर्वीच सर्वप्राप्त असतें आणि अजूनपर्यंतही प्राप्त झालें, अशी जाणीव नाहीं, हें काय प्रकरण आहे ?

सिद्धान्ती—परमेश्वर सर्वव्यापी आहे म्हणून तो सर्वांचा अत्यंत निकटवर्ती आहे. म्हणजे तो सर्वांसच जन्मतःच प्राप्त झालेला आहे. तथापि कर्मांच्या योगानें ज्याचें ज्ञान दूषित झालें आहे, अशा क्षेत्रज्ञांना (सर्व देहधारी जीवांनां) गुरूच्या उपदेशाशिवाय परमेश्वराची प्राप्ति स्वतःच्या बुद्धीनें होत नाहीं. एका उपनिषदांमध्यें (छान्दोग्य नामक ८।३।२) म्हटलें आहे कीं 'भूमीमध्यें ठेवलेला सोन्याचा ठेवा जसा माहित नसणाऱ्या लोकांस त्या ठेव्यावरून संचार करीत असतांही सांपडत नाहीं, याप्रमाणेंच अज्ञानानें बद्ध झालेल्या सर्व प्रजांची (सर्व जीवांची) ब्रह्मासंबंधें स्थिति असते. ह्या प्रजा ब्रह्मलोकामध्यें संचार करितात खऱ्या; पण अज्ञानामुळें त्यांस ब्रह्मलोकाचें ज्ञान नसतें.' तसेंच पृथ्वीवर स्थिर राहून तो सर्व धावणाऱ्या देवांच्याही पुढें जातो (बृहदारण्यक ३।७।३) 'जो आत्मस्वरूपीं राहून' 'जो सर्व भूतांच्या ठायीं राहून' इत्यादि श्रुति सांगतात कीं हा परमेश्वर एका जागीं स्थिर राहून धांवणाऱ्या सर्व देवांच्या पुढें जातो. आतां, 'उभा राहिलेला पुरुष धांवणाराच्या पुढें कसा जातो ?' अशी शंका घेणें बरोबर नाहीं. कारण वेगवान् (तरस्वी) पुरुष जितके जितके आणि जेथपर्यंत धांवतात तितके तितके व तोंपर्यंत आणि त्याच्या पलीकडेही, हा परमेश्वर स्वरूपानें विद्यमान असतो. या अर्थाला वरील श्रुति प्रमाण आहेत. त्या विश्वंभर परमेश्वरामध्येंच मातरिश्वा म्हणजे वायु राहतो आणि अप् (जल) म्हणजे मेघ, ग्रह, नक्षत्रें, तारका, आदिकरून सर्वांचें धारण करितो. सर्वांचा आधारभूत जो परमेश्वर त्याच्या आश्रयानें व त्याच्या सत्तेनें वायु-देव सर्वांचे धारण करितो, असा अभिप्राय आहे. 'या सर्व लोकांच्या मर्यादा व्यवस्थित ठेवणारा हा (परमेश्वर) सेतु आहे; हाच वर्णाश्रमादि व्यवस्था ठेवणारा आहे, या विश्वांची जी स्थिति आहे, तिचें कारण व विश्वें भग्न होण्याचें कारणही हाच आहे.' (बृ० ४।४।२२) श्रुति प्रमाण आहे.

"हें आकाश, सूर्य-चंद्रांसह सर्व नक्षत्रें, अंतरिक्ष, दिशा, पृथ्वी, महासागर, हीं सर्व महात्मा जो वासुदेव याच्या सत्तेनें व सामर्थ्यानें आपापल्या नेमलेल्या ठिकाणीं राहून आपापलीं नियमित कर्में मर्यादेनें करितात." इत्यादि प्रसिद्ध वचनांवरून आम्ही म्हणतों, हेंच खरें आहे, असें ठरतें. तात्पर्य, ब्रह्म हें सर्वाधार आहे, सर्वाश्रय आहे, सर्वगामी व सर्वगोचर आहे. याचें सामर्थ्य व याची

स्वतंत्र सत्ता, हें सर्व विलक्षण आहे. अशा परमेश्वराची उपासना केली तरच आपला तरणोपाय आहे. ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

एवमुपदिष्टविचित्रशक्तित्वमादरेण मुखान्तरेण पुनरनुशास्ति—

याप्रमाणें वरील मंत्रांत परमेश्वराच्या विचित्र शक्तीचें जें वर्णन केलें आहे त्या अलौकिक शक्तीचा अनुवाद आणखी एका निराळ्या तऱ्हेनें हा मंत्र करितो.

भूयोभूयः प्रवचनं श्रवणं च कर्तव्यमिति पुनरनुशासनाभिप्रायः। तथा च श्रूयते—

शिष्य—गुरुजी ! एकच सिद्धान्त अनेक वेळां सांगण्याचें किंवा ऐकण्याचें काय प्रयोजन आहे ? हें पिष्ट-पेषण उगीच कशाला ?

सिद्धान्ती—वरचेवर प्रवचन आणि श्रवण केलें म्हणजे फल फार मोठें मिळत असतें. ज्ञान दृढ होऊन बुद्धि निश्चित होते. व ज्ञानशक्ति व कर्मशक्ति वाढून मोक्षाचें साधन सुलभ होतें. हें केवढें फल आहे बरें ? आणखी श्रुतिवचन ऐक.

येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम् [मुं० १।२।१३] इति। तत्त्वतः अज्ञानसंशयविपर्ययनिरासो यथा भवति तथा प्रोवाच प्रकर्षेण ब्रूयात्पुनः पुनरुपदिशेदित्यर्थः। तदेजति तत्सर्वव्याप्तं ब्रह्मैजति कम्पत इव जवीय इवेति यावत्। तदु तदेव नैजति वस्तुतो न कम्पते। तद्दूरे च तदेवान्तिके च वर्तते आसुरदैवप्रकृतिकपुरुषभेदापेक्षया विभोरेव दूरान्तिकवर्तित्वव्यपदेशः। तथाऽऽह भगवाञ्शौनकः—

पराङ्मुखा ये गोविन्दे विषयासक्तचेतसः।
तेषां तत्परमं ब्रह्म दूराद्दूरतरे स्थितम् ॥
तन्मयत्वेन गोविन्दे ये नरा न्यस्तचेतसः।
विषयत्यागिनस्तेषां विज्ञेयं च तदन्तिके ॥ इति।

अपरमप्येकं वैचित्र्यमित्याह तत्सर्वव्याप्तं परं ब्रह्मास्य सर्वस्य प्रमाणावगतस्य वस्तुनोऽप्यन्तर्भवति तदेव पुनस्तदानीमेव सर्वस्य बहिरपि भवतीत्यर्थः। तदितरेषां गृहान्तर्वर्तिनां तदानीं बहिष्ठत्वं न संभवति बहिर्वसतां च नान्तर्वर्तित्वमिति ब्रह्मणि वैचित्र्यमिति भावः। यद्यप्यणुषु नान्तर्वर्तिता संभवति तथा प्रतिघातादविभक्तदेशतया वर्तित्वमात्रेणान्तर्वर्तित्वोक्तिः। एवं बहि-

व्याप्तिरप्यविभुद्रव्यापेक्षयैव। न तु विभुद्रव्यापेक्षयाऽपीति द्रष्टव्यम्। तदिदं वैचित्र्यं तैत्तिरीयेऽप्युक्तम्—अन्तर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थित इति ॥ ५ ॥

" ज्याच्या योगानें अक्षर आणि सत्यरूपी परमेश्वर समजतो त्या ब्रह्मविद्येचें तात्त्विक प्रवचन अनेक वेळ करावें. (मुण्डक १।२।१३) ही श्रुति आम्ही म्हणतों याला प्रमाण आहे. अज्ञान, संशय आणि विपर्यय (अन्यथा निश्चय) यांचें निरसन होईं तोंपर्यंत ब्रह्मविद्येचें प्रवचन पुनः पुनः करावें, असा या श्रुतीचा अभिप्राय आहे. असो; आतां मूळ मंत्राचा अर्थ सांगतों:— हें सर्वव्यापी ब्रह्म वस्तुतः चलन-वलनादि क्रिया करीत नसूनही अतिशय वेगवान् पदार्थाप्रमाणें धांवत असल्यासारखें दिसतें. तसेंच तें सर्वव्यापी आहे, म्हणून तें अत्यंत निकट आहे, प्रत्येकाच्या अत्यंत समीप आहे, आणि प्रत्येकापासून अतिशय लांबही आहे ! दैवी प्रकृतीच्या पुरुषांस हें ब्रह्म अतिशय जवळ सांपडतें. व आसुरी प्रकृतीच्या पुरुषाजवळ असूनही तें ब्रह्म आपल्यापासून अतिशय लांब आहे असें त्यास वाटतें. तात्पर्य, असें आहे कीं, ब्रह्म हें प्रत्येक वस्तूच्या अंतर्यामीं असतें; पण प्रत्येक जीवाच्या ज्ञानाधिकाराप्रमाणें तें जवळ किंवा लांब भासत असतें. सारांश, ब्रह्म स्थिरच आहे; पण ब्रह्मज्ञात्याच्या दृष्टीनें तें जवळ आहे व आसुरी दृष्टीनें तें लांब आहे, असें म्हटलें. ब्रह्म लांब जवळ नाहीं. भिन्न दृष्टीच्या पुरुषांस तें लांबजवळ वाटतें इतकाच प्रकार आहे, व ह्या भिन्न दृष्टीच्या लोकांस अनुलक्षूनच ब्रह्माला दूर-निकट हे शब्द उपयोजिले आहेत. भगवान् शौनक म्हणतात:—" गोविंदाचे ठिकाणीं जे विषय-लोलुप लोक पराङ्मुख होतात, जे गोविंदाला विन्मुख होतात आणि विषयांना जवळ करितात, त्या लोकांपासून हें परब्रह्म दूर, अतिदूर, दूराहून दूर असतें; पण गोविंदाची एकनिष्ठ भक्ति करून ज्यांनीं आपलें अंतःकरण गोविंदमय केलें आहे आणि विषयांचा त्याग केला आहे, त्या भक्तांच्याजवळ अतिशय जवळ हें परब्रह्म असतें."

आणखी एक भगवत्-सामर्थ्याचें वैलक्षण्य सांगतातः तें सर्वव्यापी परब्रह्म सर्व प्रमाणशुद्ध वस्तूंच्या अंतर्यामीं असून पुनः त्याचवेळीं तें सर्वांच्या बाहेर ओतप्रोत भरलेलें असतें. ब्रह्माहून निराळे जे जीव असतात त्यांस एकदम म्हणजे एका वेळींच घराच्या आंत व घराच्या बाहेर असणें, संभवत नाहीं. बाहेर असतात ते त्याच वेळीं घरांत नसतात, व घरांत असलेले बाहेर नसतात. असा आपला तर नित्याचा अनुभव आहे. पण ध्यानांत ठेव कीं, ही सामान्य वस्तूंची गोष्ट झाली, ब्रह्माची स्थिति वेगळीच आहे. तें ब्रह्म एककालीं आंत बाहेर राहून सर्वांचें नियमन करितें म्हणून ब्रह्माची स्थिति विलक्षण आहे.

शिष्य—भगवन्! अणूंमध्यें पोकळी असणें तर संभवतच नाहीं किंवा विभु, [सर्वव्यापि] म्हणून जीं द्रव्यें (आकाश, काल, दिक्,) मानलेलीं आहेत त्यांच्या बाहेरही कांहीं असणें संभवत नाहीं. पण आपण तर 'सर्व वस्तूंच्या आंत व सर्व वस्तूंच्या बाहेर ब्रह्म आहे' असें म्हणतां. हें कसें?

सिद्धान्ती—अणु फोडला तरी फुटत नाहीं, तो तसाच स्वरूपानें असतो हें जें त्याचें असणें हेंच परमेश्वराचें अंतर्वर्तित्व (आंत राहणें) होय. याचप्रमाणें विभु द्रव्यांचीही गोष्ट आहे, म्हणजे विभु द्रव्यच ब्रह्म असतें व त्याला व्यापून आपण राहतें, म्हणजे असेंः—विभु (सर्वव्यापी) म्हणून ज्या वस्तु आहेत, तदितर सर्व वस्तूंचा बाह्य प्रदेश सर्वतः ब्रह्मानें व्याप्त असतो, आणि विभु—द्रव्यांचें नियामक स्वतः ब्रह्मच असतें. हें वैचित्र्य तैत्तिरीय उपनिषदांतही सांगितलें आहे. 'या सर्व चराचर विश्वाला अंतर्बाह्य व्यापून हा नारायण राहिला आहे.' ॥ ५ ॥

मंत्र सहावा.

एवं सर्वस्य ब्रह्मात्मकत्वमुक्तम् । अथ सर्वं जगद्ब्रह्मात्मकमित्यनुसंदधानस्यैहिकं प्रयोजनमाह—

याप्रमाणें सर्व पदार्थ ब्रह्मात्मक आहेत हें सांगितलें. आतां, सर्व जगत् ब्रह्मात्मकच आहे असें अनुसंधान ज्याचें लागलें, त्याचे कोणते ऐहिक पुरुषार्थ सिद्ध होतात हें या सहाव्या मंत्रांत सांगतातः—

यः परमात्मज्ञानाधिकृतः सर्वाणि भूतानि ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तान्यात्मन्येव परमात्मन्येवानुस्यूतानि पश्यति ध्यायतीत्यर्थः । पृथिव्यादिध्रियमाणमपि तन्मुखेन परमात्मन्येव स्थितमित्येवकाराभिप्रायः । तुशब्देनास्याधिकारिणो माहात्म्यविशेषो द्योत्यते । किंच सर्वभूतेषु चाऽऽत्मानं परमात्मानं यः पश्यतीति । इदं व्याप्तिमात्रपरम् । परमपुरुषस्यानन्याधारत्वादिति भावः । यच्छब्दस्य स इति प्रतिनिर्देशोऽध्याहार्यः । स उक्तविधज्ञानी । ततस्तेषु सप्तम्यर्थे तसिः । ब्रह्मात्मकतया दृष्टेषु सर्वेषु भूतेष्वित्यर्थः । न विजुगुप्सते कुतश्चिदपि न बीभत्सते । स्वात्मविभूतिन्यायेन क्वचिदपि निन्दां न करोतीति भावः ॥ ६ ॥

जो पुरुष परमात्मज्ञानाच्या योगानें अधिकृत होतो, ब्रह्मापासून ते स्तंबापर्यंतचीं यच्चयावत् सर्व भूतें (पदार्थ) परमात्म्यामध्येंच अनुस्यूत झालीं आहेत. (म्हणजे परमात्म्याच्या आश्रयानें व परमात्म्यानें व्याप्त अशीं राहतात, हें ज्याला ज्ञान झालें म्हणजे पृथ्वी जरी सर्व भूतांस आधार देते, सर्व भूतांचें धारण करिते, तथापि तिच्या द्वारानेंच सर्व भूतें परमात्म्याच्या मात्र आश्रयानें

परमात्म्यामध्यें व्यवस्थित रीतीनें राहतात. असा अभिप्राय आहे.) तसेंच, सर्व भूतांमध्यें ज्याला परमात्मा दिसतो; कारण याची व्याप्ति सर्वत्र आहे आणि या दृष्टीनें मात्र सर्व भूतांमध्यें ज्याला परमेश्वर दिसतो;—तो ज्ञानी पुरुष त्या सर्वाधार—ब्रह्मदृष्टीनें पूज्य स्वरूप झालेल्या सर्व पदार्थांची कोणत्याही प्रकारें निंदा करीत नाहीं.

शिष्य०—पण भगवन्! या परमपुरुषाला कोणाचा आधार असतो? हा कोणाच्या आश्रयानें राहतो?

सिद्धान्ती—वेड्या! परमपुरुषाला रे कोण आधार देणार? तो स्वयंसिद्ध व स्वाधार आहे, त्याला दुसऱ्याचा आश्रय हवा आहे, तरी कशाला? असो; हा सर्वाधार आहे व सर्वव्यापी आहे, म्हणून सर्व पदार्थ पूज्यस्वरूपाचे होतात. असें मानणारा पुरुष खरा ब्रह्मज्ञ होय. असो; सर्व वस्तु ब्रह्मव्याप्त आहेत, पण त्या स्वतः ब्रह्म नाहींत, हें त्याचें ज्ञान असतें. समजलें?

या मंत्रांत पहिल्याप्रथमच 'तु' हा शब्द आहे, तो ज्ञानीपुरुषाचें माहात्म्य सांगण्याकरितां उपयोजिला आहे. सारांश, सर्व भूतांमध्यें अंतर्यामी ब्रह्म आणि ब्रह्मामध्यें शरीररूपानें सर्व भूतें ज्याला दिसूं लागलीं, त्याला कोठेंही कोणत्याही प्रकारची निंदा करण्याचें किंवा खोडी काढण्याचें कारण राहत नाहीं. त्याला सर्व विश्व आत्मविभूतिरूपानें आनंदरूप होतें. ॥ ६ ॥

मंत्र सातवा.

एवं वैयधिकरण्येनोक्तं सर्वस्य ब्रह्मात्मकत्वं सामानाधिकरण्येनापि द्रढयंस्तदनुध्यानस्य सद्यः शोकनिवर्तकत्वमाह—

याप्रमाणें वैयधिकरण्यानें (म्हणजे परमात्म स्वरूप व तदितर भूतें यांमध्यें कोणता भेद आहे, हें सांगणें हें वैयधिकरण्य होय.) सर्व ब्रह्मात्मक आहे असें सांगून या मंत्रांत आतां *सामानाधिकरण्यानेंहि 'सर्व भूतांची ब्रह्मात्मकता दृढ करूं' हें अनुसंधान ठेवणाऱ्या ज्ञानी पुरुषाचे शोक मोह कसे नाहींसे होतात हें सांगावयाचें आहे.

यस्मिन्प्रणिधानसमये विजानत ईशा वास्यमित्यारभ्य ततो न विजुगुप्सत इत्यन्तेनोपदिष्टं स्वतन्त्रं परतन्त्रं वस्तुभेदं यथोपदेशं विविच्य जानत इत्यर्थः। नन्वेवमत्यन्तभेदाभ्युपगमे सर्वाणि भूतान्यात्मैवाभूदिति सामानाधिकरण्यं भज्येतेत्याशङ्कावारणाय यस्य

---

* (सर्व भूतांस ब्रह्मात्मकता असते, हें सांगणें म्हणजे सामानाधिकरण्य होय.) एका वाक्यांत भिन्नार्थी शब्द एकाच पदार्थाचा बोध करीत असतात, तेव्हां सामानाधिकरण्य होतें.

पृथिवी शरीरम्। [बृ० ३।२।१३] यस्य शरीरम् [बृ०३।७।३] इत्यादिघटकश्रुतिसिद्धसंबन्धविशेषमाह—एकत्वमनुपश्यत इति। आकृतिव्यक्त्योरिव गुणगुणिनोरिव चात्यन्तभिन्नयोरेव जगद्ब्रह्मणोरेकत्वं विभागानर्हसंबन्धविशेषं पश्यतो विशदमनुध्यायत इत्यर्थः।

रामसुग्रीवयोरैक्यं देव्यर्थे समजायत। इत्यादाविवेहाप्येकशब्दस्य संबन्धविशेष एवार्थो विवक्षितुं युक्त इति भावः। एवं च सर्वाणि भूतान्यात्मैवाभूदिति सर्वभूतशरीरकः प्रतीतोऽभूदित्यर्थः। तत्राऽऽदौ प्रणिधानसमये को मोहः। स्वतन्त्रादिभ्रमादिलक्षणो मोहो न संभवति। कः शोकः परमात्मविभूतितयाऽवगते सर्वस्मिन्निर्ममत्वसिद्धौ पुत्रादिमरणराज्यादिहरणादावपि न कश्चिच्छोकः स्यादित्यर्थः। यथाऽऽह—

यस्य मे चास्ति सर्वत्र यस्य मे नास्ति किंचन।
मिथिलायां प्रदीप्तायां न मे किंचन दह्यते॥ इति।

अत्र केचित्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूदिति बाधायां सामानाधिकरण्यम्। तथा च सर्वाणि भूतान्यात्मव्यतिरिक्तानि न सन्तीत्यर्थः। यथा चोरः स्थाणुरिति। स्थाणुरेवायं न चोर इत्यर्थः। तथेहापीत्याहुः। अन्ये तु नरपतिरेव सर्वे लोका इतिवदौपचारिकमिदं सामानाधिकरण्यम्। नरपत्यधीनाः सर्वे जना इति हि तन्निर्वाहस्तद्वदिहापि परमात्माधीनानि सर्वाणि भूतानीति भाव इति वर्णयन्ति। अपरे तु घटशरावादयः सर्वे मृत्पिण्डा एवेतिवज्जगद्ब्रह्मणोरेकद्रव्यत्वं परिकल्प्यैवेदं सामानाधिकरण्यं निर्वाह्यमित्याचक्षते। सिद्धान्तस्तु देवोऽहं मनुष्योऽहमित्यादिवच्छरीरात्मभावसंबन्धेनैव जगद्ब्रह्मणोः सामानाधिकरण्यनिर्वाहे संभवति सति बाधोपचारस्वरूपैक्यपक्षा वैदिकैर्बहिष्कार्याः॥ ७॥

ध्यान करित असतां ज्या ज्ञानी पुरुषाला या उपनिषदांत पहिल्या मंत्रापासून सहाव्या मंत्रापर्यंतच्या सहा मंत्रांत सांगितलेलें स्वतंत्र ब्रह्म, परतंत्र जीव आणि जगत् व वस्तुभेद यांचें रहस्य उपदेशानुसार समजलें—

पूर्वपक्षी—अहो! या उपनिषदांच्या द्वारा अत्यंत भेद सांगणें हा श्रुतीचा अभिप्राय नाहीं; कारण "सर्व भूतें आत्मरूप झालीं." असें या मंत्रांतील सामानाधिकरण्य ठरवितें. पण तुमच्या अर्थानें हें सामाधिकरण्य बाधित होतें म्हणून तुमचा अर्थ चुकला असें मला वाटतें. अत्यंत भेद श्रुतीला मुळींच इष्ट नाहीं. सारांश, सर्व भूतें

आणि आत्मा यांचें सामानाधिकरण्य करून श्रुतीला अभेद मात्र सांगावयाचा आहे, असें स्पष्ट दिसतें.

सिद्धान्ती—नाहीं. 'ज्यांचें शरीर पृथ्वी आहे' (बृ०३।२।१३) 'ज्याचें शरीर' (बृ० ३।७।३) इत्यादि घटना करणाऱ्या श्रुतींच्या साहाय्यानें सिद्ध झालेला व वस्तुतः असणारा विशेष संबंध येथील शब्दच सांगतातः—आकृति (जाति) आणि व्यक्ति, गुण आणि गुणी, यांच्यामध्यें जसा वास्तविक भेद असूनही यांची एकत्र स्थिति असते, जाति-व्यक्ति एकत्र असतात व गुण आणि गुणीपदार्थ एक ठिकाणींच वास्तव्य करितात, त्याचप्रमाणें जगत् व ब्रह्म वस्तुतः निरनिराळे पदार्थ असून एकच, (एकत्र राहणारे) आहेत. त्यांच्यामध्यें विभाग होणें शक्य नाहीं (स्थलांतर होणें शक्य नाहीं) असें ज्या ज्ञानी पुरुषांना स्पष्ट ज्ञान होतें आणि असेंच त्यांचें स्पष्ट ध्यान-चिंतन असतें, त्या लोकांस शोक-मोह, बाधा करीत नाहींत. या अनुध्यानामध्यें जगत् व ब्रह्म हीं नित्य व सर्वत्र एकत्र असतात, अशी ज्ञानी पुरुषाची जाणीव असते.

सीता देवीची पुनः प्राप्ति करून घेण्यासाठीं राम आणि सुग्रीव यांचें ऐक्य झालें, त्याप्रमाणेंच येथेंही एक शब्दाचा संबंध-विशेषीं मात्र अर्थ सांगण्याचा श्रुतीचा अभिप्राय असला पाहिजे. राम-सुग्रीवांचें ऐक्य झालें, म्हणजे ते शरीरानें सुद्धां एक झाले असा अर्थ नव्हे. त्याप्रमाणेंच विश्वामध्यें 'एक ब्रह्म' पहाणारा म्हणजे सर्व ठिकाणीं व सर्व काळीं या पंडिताला एकच वस्तु एकच स्वरूपानें दिसते, असा अर्थ नव्हे, असो; 'याप्रमाणें आत्मा सर्वभूतात्मक झाला,' याचा अर्थ असा आहे कीं, सर्व भूतांचीं शरीरें त्याच्याच प्रकृतीपासून परिणत झालीं आहेत. व सर्व भूतें परमात्म्याचें शरीर होतात. हा अर्थ ज्ञानी पुरुषाला समजला म्हणजे ध्यानाच्या वेळीं त्याला 'मी स्वतंत्र आहें;' किंवा हें सर्व विश्व भ्रमात्मक आहे,' असा मोह होत नाहीं. तसेंच, 'मी परमेश्वराची एक विभूति आहें व सर्व भूतें परमेश्वरात्मक आहेत.' असें समजून सर्वत्र निर्ममत्वाची वृत्ति सिद्ध झाली, 'माझें असें स्वतंत्रत्वानें कांहीं नाहीं' असें समजलें, म्हणजे पुत्रादिकांचें मरण किंवा राज्यादिकांचें हरण या असल्या महत्संकटामध्यें सुद्धां त्याला शोकप्राप्ति होत नाहीं. म्हटलें आहे—

'ज्या माझें सर्व कांहीं आहे व ज्या माझें कांहीं नाहीं. त्या मला (जनकाला) सर्व मिथिलेला आग लागली म्हणून कांहीं एक वाईट वाटणार नाहीं.'

पूर्वपक्षी—कायहो ? 'सर्व भूतें आत्मरूप झालीं आणि आत्मा सर्व भूतरूप झाला' या वाक्यांत बाध सामानाधिकरण्य घेतलें तर चालावयाचें नाहीं काय ? म्हणजे आत्मरूपाशिवाय एकही वस्तु येथें नाहीं आत्मरूपच आहे, बाकी कांहीं नाहीं. असा अर्थ होईल. हा चोर स्थाणु आहे (हा चोर इतका स्तब्ध आहे कीं, तो खांबासारखा निश्चल दिसतो. म्हणजे प्रत्यक्ष तो खांबच आहे) याचा अर्थ 'हा

स्थाणुच आहे चोर नव्हे' असा जसा होतो तसाच, हें सर्व आत्मरूपच आहे. निराळे पदार्थ नाहींत असा अर्थ करावा. भूतांचा बाध करून (तीं नाहींतच असें समजून) जें सामानाधिकरण्य करावयाचें, त्याला बाधसामानाधिकरण्य असें म्हणतात. हें असलें सामानाधिकरण्य येथें घ्यावें म्हणजे झालें.

दुसरा पूर्वपक्षी०—आमच्या मत राजा म्हणजेच सर्व प्रजाजन होत. (राजा जें करील तें प्रजांचें कृत्य असतें म्हणून राजा हीच प्रजा) हें जसें आलंकारिक वाक्य आहे तसेंच वरील वादविषयक सामानाधिकरण्याचें वाक्य आहे. 'राजाच्या स्वाधीन असणारी सर्व प्रजा' असा जसा आम्ही घेतलेल्या उदाहरणाचा अर्थ करून निर्वाह करितां येतो, त्याप्रमाणेंच हीं सर्व भूतें परमात्म्याच्या अधीन आहेत असा अर्थ करून निर्वाह करावा.

तिसरा पूर्वपक्षी०—येथें या सामानाधिकरण्याचा असा अर्थ करावा कीं, घट, शराव इत्यादि मातीची भांडीं जशीं मातीचींच केलेलीं असतात आणि सर्वांचें घटक द्रव्य एकच म्हणजे माती हें असतें त्याप्रमाणें जगत् आणि ब्रह्म हीं एकाच द्रव्यापासून झालीं आहेत, या अर्थानें वादविषयक वाक्यांत सामानाधिकरण्य झालें आहे. असा निर्वाह करून घ्यावा.

सिद्धान्ती—"मी देव आहें, मी मनुष्य आहें" इत्यादि वाक्यांत जसा देवादि शरीरांचा व तन्निष्ठ जीवांचा संबंध असतो, त्याप्रमाणेंच जगत् आणि ब्रह्म यांचा शरीर-शरीरी संबंध आहे (जगत् व भूतें शरीर आणि परमात्मा शरीरी आहे) असा स्पष्ट, योग्य आणि न्यायशुद्ध अर्थ होत असतां व याप्रमाणें वरील सामानाधिकरण्याचा निर्वाह होत असतां कांहीं एक आधार नसलेलें बाधप्रतिपादक, उपचारप्रतिपादक [आलंकारिक] आणि ऐक्यस्वरूपप्रतिपादक पक्ष यांचा व यांच्या म्हणण्याचा वेदनिष्ठ लोकांनीं विचारच न केला पाहिजे. हीं मतें अवैदिक आहेत. डोळ्यांस प्रत्यक्ष दिसणारी वस्तू 'नाहीं' म्हणणें हें लोकबाह्य वेदबाह्य कर्म आहे ॥ ७ ॥

मंत्र आठवा.

पुनरप्येनमीशोशितव्यवेदितव्येश्वरस्य हेयशोधनेन विशिष्टज्ञानयोगादिकमप्युपदिशति—

सिद्धान्ती—'ईश्वर माझा स्वामी आहे' आणि 'मी त्याचा सेवक आहें.' अशी ज्याची दृढ भावना ज्ञानपूर्वक झाली त्याला विशिष्ट ज्ञान योगादिकांचा उपदेश करण्याकरितां जाणून घेण्यास योग्य जो परमेश्वर त्याच्या स्वरूपामध्यें आपल्यास न दिसणाऱ्या कोणत्या व्यावहारिक गोष्टींचा त्याग करून स्वरूपशुद्धता करावयास हवी, हें या श्रुतीनें प्रथम सांगून नंतर ज्ञान-योगादिकांचा उपदेश केला आहे.

यः सर्वभूतान्तरात्मब्रह्मदर्शी स पर्यगात्प्राप्नुयादित्यर्थः। 'ब्रह्मविदाप्नोति परम्'। [तै० २।१।१] इति न्यायात्। यद्वा समाधिलब्धेनानुभवेन प्राप्नुयादिति सिद्धानुवादः। 'अत्र ब्रह्म समश्नुते' [बृ० ४।४।७] इतिवत्। शुक्रमवदातं स्वप्रकाशमित्यर्थः अकायम्। सर्वशरीरकमपि कर्मकृतहेयशरीररहितमित्यर्थः। 'न तस्य प्राकृता मूर्तिर्मांसमेदोस्थिसंभवा।'

इति हेयशरीरस्यैवान्यत्र प्रतिषेधदर्शनात्। न तु दिव्यमङ्गलविग्रहरहितमित्यर्थः।

'यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि।' [ई० वा० १६]
'य एषोऽन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषो दृश्यते॥' [मै० ६।१]

आदित्यवर्णं तमसः परस्तात् [श्वे० ३।८] इत्याद्युपनिषत्प्रसिद्धस्याप्राकृतविग्रहस्य निषेधायोगादिति भावः। अव्रणम्। कर्मजन्य-शरीराभावादेवाक्षतम्। अस्नाविरं च। स्नावाः शिरा यस्मिन्विद्यन्ते तत्स्नाविरम् स्नाविरं न भवतीत्यस्नाविरं। शुद्धं। अनाघ्राताज्ञानादिदोषगंधं। अशनपानादिषड्ऊर्मिरहितं च। अपापविद्धम् अज्ञानादेः कार्यकारणभूतैः पुण्यपापरूपकर्मभिरलीढमित्यर्थः। 'न शोको न सुकृतं न दुष्कृतम्'। [छा० ८।४।१] इत्यारभ्य 'सर्वे पाप्मानोऽतो निवर्तन्ते' इति पापशब्देनोपसंहारदर्शनात्। स्वर्गादिहेतुभूतविशेषस्यापीह पापशब्देन संग्रहणमिति भावः। एवमहेयहेयप्रत्यनिकं परमात्मानं स विद्वान्पर्यगादिति पूर्वेण संबन्धः। एवंरूपः परमात्मा प्राप्यः प्रापक उपास्यश्च यस्य, तं ब्रह्मविदं विशिनष्टि कविः। व्यासादिवद्ब्रह्मस्वरूपरूपदिव्यगुणादिप्रकाशकप्रबन्धविशेषाणां निर्मातेत्यर्थः। अथवा क्रान्तदर्शी। कर्मयोगस्तु कुर्वन्नेवेह कर्माणीति मन्त्रेण पुरस्तादेवोक्तः। अथ ज्ञानयोगसाध्यप्रत्यगात्मसाक्षात्कारहेतुभूतं जीवात्मयोगमाह—मनीषी मनस ईशित्री बुद्धिर्मनीषा, तद्वान् मनीषी भगवत्स्वरूपगुणस्मृत्यभ्यासेन तदितरविषयवैराग्येण च प्रतिष्ठितप्रज्ञ इत्यर्थः। परिभूः कामक्रोधादीन्परिभवतीति परिभूः। अनेन विरोधिनिवृत्तिरूपयोगाङ्गसेवनमुक्तम्। योगाभ्यासफलमाह—स्वयंभूः। अन्यनिरपेक्षसत्ताकः सुखरूपतया स्वात्मदर्शीति यावत्। याथातथ्यतः। यथावद्विविच्य। अर्थान्प्रष्टव्यार्थान्। तस्य वाचकः प्रणवस्तज्जपस्तदर्थभावनमिति सूत्रोक्तान्व्यदधाद्धृदयेन धृतवानित्यर्थः। सर्वान्तरायप्रशमनार्थमिति

भावः। यद्वा शुक्रमित्यादि द्वितीयान्तपदजातं परिशुद्धजीवपरम्। तमपि स परमात्मा पर्यगात्परितो व्याप्य स्थित इति प्रथमान्तपदजातं परमात्मपरं योजनीयम्। तथाहि कविः सर्वदर्शी श्रीपञ्चरात्रादिप्रणेतेति वा। मनीषी मनःप्रभृतीनां जीवकरणानां नियन्ता। परितो भवतीति परिभूः सर्वव्यापी स्वयमेव संभवतीति स्वयंभूः। बहुधा विजायत इति श्रुत्युक्तप्रसिद्धावतारशाली। अत्र कविरित्यादिना कल्याणगुणविधानात्। छान्दोग्ये—'एष आत्माऽपहतपाप्मा विरजो विमृत्युर्विशोको विजिघत्सोऽपिपासः। [छा० ८।१।५] इति हेयगुणान्प्रतिषिध्य सत्यकामः सत्यसंकल्प इति कल्याणगुणविधनाच्च निर्गुणं निरञ्जनमित्यादिसामान्यनिषेधस्य हेयगुणविषयत्वं सुगमम्। याथातथ्यत इति। अर्थान्कार्यपदार्थाञ्शाश्वतीभ्यः समाभ्यो यावद्विलयमवस्थातुं याथातथ्यतो यथावद्विविच्योत्पादितवान्न पुनरैन्द्रजालिकत्वेन बलं प्रकाशितवानिति भावः॥ ८॥

सिद्धान्ती—ज्याला सर्व भूतांच्या अंतरात्म्यामध्यें ब्रह्म दिसूं लागलें त्याला ब्रह्म प्राप्त होतें. असा तात्पर्यार्थ आहे. "जो ब्रह्मवेत्ता आहे तो ब्रह्म होतो" (तै० २।१।१) असा न्याय श्रुतीनें सांगितला आहे. किंवा समाधींत मिळालेल्या अनुभवामध्यें ब्रह्मस्थिति प्राप्त होते असा सिद्ध पुरुषांचा स्वानुभवी अभिप्राय आहे. "येथेंच ब्रह्मप्राप्ति होते" (बृ० ४।४।७) अशी श्रुति या स्वानुभवसिद्ध अभिप्रायाला प्रमाण आहे.

शिष्य—या ब्रह्माचें स्वरूप तरी कसलें असतें?

सिद्धान्ती—तें ब्रह्म, शुद्ध, स्वयंप्रकाश कर्मानें उत्पन्न झालेल्या अमंगल शरीरानें वियुक्त म्हणजे मंगल शरीरी—

पूर्वपक्षी—अहो, त्याला मुळीं कोणत्याही प्रकारचें शरीर नसतें.

सिद्धान्ती—असा अर्थ नाहीं. "मांस, मेद, अस्थि, इत्यादिकांनीं घडविलेलें प्राकृत शरीर (हाडा-मांसाचें शरीर) त्याला नसतें."

पूर्वपक्षी—हें कशावरून?

सिद्धान्ती—प्राकृत शरीराचा मात्र निषेध, व मंगल शरीराची सिद्धि येथें व दुसरीकडे श्रुतींमध्यें आढळते, म्हणून परमेश्वराला मंगल शरीरही नाहीं, असें नाहीं. तो मंगलमूर्ति आहे.

पूर्वपक्षी—याला आधार?

सिद्धान्ती—'जें हें मी तुझें अत्यंत कल्याणमय रूप आहे. तें आतां पाहत आहें' (ईशावास्य १६) 'जो हा सूर्याच्या अंतरात्म्यामध्यें सुवर्णमय पुरूष दिसतो' (मैत्रेयी ६।१) 'अंधकाराच्याही पलीकडचा (अंधकारासही प्रकाशित करून त्याचें स्वरूप दाखविणारा व आदित्य वर्णाचा' (श्वेताश्वतर ३।८) इत्यादि उपनिषदांमध्यें अप्राकृत (दैवी) शरीराचा कोठेंही निषेध केला नाहीं. किंतु स्वीकारच केला आहे. यावरून [परमेश्वरास मंगल शरीर आहे असें सांगणाऱ्या श्रुती आहेत म्हणून] अप्राकृत शरीराचा निषेध केव्हांही करितां येणार नाहीं. असो; त्याचें शरीर कर्मजन्य नाहीं म्हणून तें अक्षत, अस्नाविर (शिरा आणि स्नायु जेथें नाहींत असें) शुद्ध (अन्नादिकांच्या दोषांचा गंधही ज्याला कधीं शिवला नाहीं) तसेंच (तृष्णा, क्षुधा, इत्यादि सहा वृत्तींच्या लाटा जेथें नाहींत असें) पापशून्य—

शिष्य—भगवन्! अज्ञान, माया, अविद्या, इत्यादि कारणांपासून उत्पन्न झालेल्या कामक्रोधादि त्रयींचीं जीं पापात्मक कर्में यांनीं ज्याला स्पर्श केला नाहीं असा पापशून्य परमेश्वर आहे, होय ना?

सिद्धान्ती—ठीक आहे, पण वत्सा! हें ध्यानांत ठेव कीं, सकाम सत्कर्मापासून उत्पन्न झालेलें पुण्य सुद्धां पापात्मकच असतें! कारण तें जीवांना जन्ममरणापासून सोडवीत नाहीं; म्हणून मंत्रांतील 'पाप' या शब्दानें सर्व सकाम कर्माचा व तज्जन्य फलांचा उल्लेख होतो. 'शोक नाहीं, सुकृत (पुण्य) किंवा दुष्कृत (पाप) नाहीं' (छांदोग्य ८।४।१) असा आरंभ करून 'या साठीं सर्व पापापासून निवृत्त होतो.' असा पाप शब्दानें पुण्य आणि पाप या उभयतांचा श्रुतीनें अंतर्भाव करून उपसंहार केला आहे. सारांश, स्वर्गादिकांना कारण होणाऱ्या पुण्य कर्माचाही पाप शब्दानें संग्रह केला आहे. जन्ममरणाला कारण होणारें तें पापच होय. याप्रमाणें हेंच (टाकून देण्यास योग्य) व उपादेय (घेण्यास योग्य) या उभयतांचाही विरोध करणारें परमात्मस्वरूप विद्वान् पुरुषाला मिळतें.

शिष्य—म्हणजे स्वयंप्रकाश, मंगलदेहधारी अज्ञानरहित, आणि पापपुण्यरहित अशा परमात्म्याचें दर्शन त्या विद्वानाला होतें असाच अर्थ ना?

सिद्धान्ती—होय, अशा रूपाचा परमात्मा मिळावा, हाच पुरुषार्थ आहे. त्या पुरुषार्थाची सिद्धि एक परमेश्वर मात्र करितो आणि म्हणून तोच उपास्य (उपासना करण्यास योग्य) आहे, हें ज्याला समजतें तो ब्रह्मवेत्ता होय. या ब्रह्मवेत्याचें विशेष स्वरूप व गुण सांगतात. ब्रह्मस्वरूप, त्याचे दिव्य गुण आणि त्याचें रूप इत्यादि प्रकाशित करणारे अनेक प्रासादिक प्रबंध (ग्रंथ) (१) निर्माण करणारे श्रीमद् व्यासादिकांप्रमाणें हा विद्वान् असतो; तसेंच याला असामान्य दृष्टि (अलौकिक ज्ञान) असते. (२) यांचें (पंडितांचें) कर्म

याच उपनिषदांतील पहिल्या मंत्रांत सांगितलेल्या कर्म-योगास अनुसरून असतें, तसेंच, (३) याची बुद्धि मनावर स्वामित्व ठेवणारी असते; म्हणून याला मनीषी म्हणतात किंवा मन या शब्दाचा प्रतिष्ठितप्रज्ञ (स्थितप्रज्ञ) असाही अर्थ होईल.

शिष्य—स्थितप्रज्ञ म्हणजे काय ?

सिद्धान्ती—भगवंताचे स्वरूप आणि त्याचे गुण यांचे अहर्निश एकनिष्ठ चिंतन करणें, परमेश्वरव्यतिरिक्त सर्व विषयांचा विरक्तवृत्तीनें त्याग करणें आणि आपली बुद्धि स्थिर करणें ही स्थितप्रज्ञता आहे. या विशेष चिंतनानें जीव आणि आत्मा यांचा योग होतो. हा योग सिद्ध झाला म्हणजे ज्ञाननिष्ठेनें साध्य होणारा आत्मसाक्षात्कार होतो. आत्मसाक्षात्काराला हा जीवात्म-योग कारण आहे. तसेंच, हा पंडित (४) काम-क्रोधादिकांचा पराभव करितो. हा पराभव म्हणजे साक्षात्काराला विरोध करणाऱ्या वृत्तींचें निवर्तन होय. हेंही एक साक्षात्कार देणाऱ्या योगाचेंच अंग आहे. शम-दमादिकांचा अन्तर्भाव यांतच होतो. असो; वरील योगाभ्यासाचें फल पहाः,—हा विद्वान् (५) स्वतंत्र (प्रकृतीच्या तंत्रानें न चालणारा) आणि सुखरूप असून, नित्य स्वात्मदर्शन घेणारा असतो. (६) याचा नित्यानित्य विवेक उत्तम व यथार्थ असून, (म्हणजे तत्त्वांचा व पुरुषार्थांचा विवेक उत्तम असून) परमेश्वराचा वाचक जो 'ॐकार' शब्द त्याचा जप आणि त्याच्या अर्थाचें ज्ञान, हेच कायते पदार्थ हा विद्वान् चित्तामध्यें धारण करितो. सारांश, हा पंडित पूर्ण विवेकानें ॐकाराचा जप करून, त्याच्या अर्थाचें भक्तीनें चिंतन करित असतो. ह्या योगाचार्यप्रणीत चिंतनानें, त्याच्या मार्गांत येणाऱ्या सर्व अन्तरायांचा (अडचणींचा) निरास होतो. याप्रमाणें हा विद्वान् कवि मनीषी वृत्तिशून्य, स्वतंत्र, नित्यानित्यविवेकी आणि ब्रह्मचिंतन करणारा असतो.

शिष्य—महाराज, पहिल्या ओळींत जीं विशेषणें आहेत; तीं सर्व तऱ्हेनें शुद्ध झालेल्या जीवाला लागणार नाहींत काय ? मला वाटतें तीं द्वितीयांत विशेषणें जीव-पर घ्यावीं; आणि असा अर्थ करावा कीं, या शुद्ध जीवाला सर्वबाजूंनीं व्यापणारा परमेश्वर असतो. अर्थातच या सरणीनें दुसऱ्या ओळींतील सर्व पदें परमेश्वराकडे लावावीं, असें ठरेल.

सिद्धान्ती—होय. तसाही अर्थ होईल, मग कवि म्हणजे सर्वज्ञ किंवा पंच-रात्रादिकांचा* कर्ता असा अर्थ घेतला पाहिजे. मनीषी म्हणजे मनः-

---

* पंचरात्र हा एक भक्तिपंथाचा वैदिक ग्रंथ आहे, या पंथाला श्रीरामानुजप्रभृति विशिष्टाद्वैत प्रतिपादन करणाऱ्या आचार्यांनीं प्रौढ दर्जास आणिलें आहे. हा वैदिक ग्रंथ आहे, हें सांगावयास नको.

प्रभृति इंद्रियांचें नियमन करणारा, परिभू म्हणजे सर्वव्यापी, स्वयंभू म्हणजे स्वतःसिद्ध, (आपल्या स्वतःच्याच प्रवृत्तीनें जगाच्या कल्याणासाठीं अनेक अवतार स्वतंत्रतेनें घेणारा असाही स्वयंभूचा अर्थ होईल. हा अर्थ वेदासही अनुकूल आहे; परमेश्वराचा जन्म स्वेच्छेनें व स्वतंत्रतेनें होतो, जीवांस संचित कर्मानुसार जन्म घ्यावा लागतो.) असो; येथें सर्व मंगलगुणांचें विधान केलें आहे.

पूर्वपक्षी—अहो ! आत्मा हा निर्गुण आहे, निरंजन आहे. "हा आत्मा पापशून्य, मलशून्य, मृत्युशून्य, शोकशून्य, क्षुधाशून्य, तृषाशून्य, आहे." (छां० ९।१।५) अशी श्रुति आहे. यावरून सर्व गुणांचाही श्रुति प्रतिषेध करिते, हें लक्ष्यांत ठेवा. पुनः तो निर्गुण आहे, निरंजन आहे, असें सांगणाऱ्याही श्रुति आहेत. म्हणून श्रुतीला निर्गुण ब्रह्मच अभिप्रेत आहे, तुमचा अर्थ चुकला.

सिद्धान्ती—नाहीं. तसें असतें तर श्रुतीनें 'ब्रह्म सत्यकाम आहे,' 'सत्यसंकल्प आहे,' इत्यादि ब्रह्माच्या मंगलगुणांचें कीर्तन कशाला केलें असतें ? हें संकीर्तन केलें आहे, म्हणून निर्गुण, निरंजन, इत्यादि सामान्य निषेधानें त्याज्य गुणांचा निषेध केला आहे; हें स्पष्ट आहे. श्रुतीला निर्गुण ब्रह्माची स्थिति संमतच नाहीं. ब्रह्म सगुण आहे; पण त्याचे सर्व गुण मंगलकारी आहेत, अमंगल गुणांचा तेथें अभाव आहे, हें श्रुतीचें अभिप्रेत आहे. तसेंच, हें ब्रह्म उत्तम प्रकारचें जगत् उत्पन्न करितें म्हणजे आपापलें कार्य संपाद्ण्यास योग्य असे अनंत पदार्थ निर्माण करितें आणि हेंच ब्रह्म प्रलयकालपर्यंत त्यांचें संरक्षणही करितें; हा श्रुत्यर्थ आहे.

पूर्व०—हें जगत् म्हणजे परमेश्वरानें आपल्या मायेचा आश्रय घेऊन उत्पन्न केलेली एक गंधर्वनगरी आहे. ही तर मिथ्या आहे !

सिद्धान्ती—परमेश्वर कांहीं गारुडी नाहीं किंवा त्याला आपलें बल किंवा चातुर्य प्रकट करून कोणाला चमत्कारही दाखवावयाचे नाहींत. हें जगत् सत्य आहे आणि जीव-कल्याणासाठीं परमेश्वरानें पूर्ण व यथार्थ विचार करून हें जगत् उत्पन्न केलें आहे. हा खरा तात्पर्यार्थ आहे. ॥ ८ ॥

मंत्र नववा.

एवं विचित्रशक्तिकपरमात्मविषयां कर्मयोगाद्यङ्गिकां विद्यामुपदिश्यानन्तरं त्रिभिर्मन्त्रैः केवलकर्मावलम्बिनः केवलविद्यावलम्बिनश्च पुरुषान्विनिन्द्न्वर्णाश्रमधर्मानुगृहीतया विद्ययैव निःश्रेयसावाप्तिमाह—

याप्रमाणें आठव्या मंत्रांत उत्तम प्रकारच्या विद्येचा उपदेश केला आहे. ही विद्या कर्मयोगादिकांचा अंगीकार करिते. तसेंच हा ज्ञानयोग परमेश्वराच्या

विचित्र शक्तींचें स्वरूप स्पष्ट करून सांगतो. यानंतर पुढील तीन मंत्रांत केवळ कर्मनिष्ठ लोकांची व केवळ ज्ञाननिष्ठ लोकांची निंदा करून वर्णाश्रम-धर्माच्या अनुग्रहानें प्राप्त होणारी विद्यामात्र मोक्षाला साधन आहे, असें सांगितलें आहे.

बृहदारण्यके चायं मन्त्रः पठितः । ये भोगैश्वर्यप्रसक्ता अविद्यां विद्यान्यां क्रियां केवलं कर्मेत्यर्थः । विद्याविधुरं कर्मेति यावत् । अविद्या कर्मसंज्ञान्येऽति स्मृतेः । उपासते । अनुतिष्ठन्ति । अन्धं तमोऽतिगाढं तमोऽज्ञानमित्यर्थः । त्रिवर्गाभिसङ्घात्मान्तरीयं नरकमन्धं तमो वा । " प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म । एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा जरामृत्युं ते पुनरेवाऽपि यन्ति " इति श्रुतेः । य उ विद्यायां रताः । उकार उत्तरपदेनान्वेतव्यः । स्वाधिकारोचितकर्मपरित्यागेन विद्यायामेव रताः । ते ततः कर्ममात्रनिष्ठाः प्राप्यादन्धतमसाद् भूय इव तमस्तदधिकमज्ञानं प्रविशन्ति । इवशब्दस्तमस इयत्ताया दुर्ग्रहत्वं द्योतयति ॥९॥

सिद्धान्ती—हा मंत्र बृहदारण्यकांच्या चवथ्या अध्यायांतील चवथ्या ब्राह्मणांत सांगितला आहे. असो; जे भोग आणि ऐश्वर्य यांच्यामध्येंच आसक्त झाले आहेत, ते कर्माची मात्र उपासना करितात. या केवल कर्मालाच अविद्या असें नांव आहे, कारण; येथें ज्ञानाचा गंधही नसतो. ज्ञानशून्य कर्म यालाच केवल कर्म किंवा अविद्या असें म्हणावें. " अविद्येचेंच दुसरें नांव कर्म हें आहे, ही विद्येहून निराळी आहे;" अशी स्मृति आहे. याप्रमाणें केवल कर्माची मात्र उपासना करणारे कर्मठ, अत्यंत अज्ञानामध्यें प्रवेश करितात. येथें त्रिवर्गाची (तीन वेदांनीं सांगितलेल्या कर्माची) दृढ संगति आहे, म्हणून येथें अंतःकरणांतील नरक किंवा अज्ञान हा अर्थ घ्यावयाचा नाहीं. " ज्यांच्यामध्यें अठरा प्रकारचें (कनिष्ट प्रकारचें) कर्म सांगितलें आहे, अशा ह्या यज्ञरूपी नौका अदृढ आहेत, म्हणजे बळकट नाहींत; पण यज्ञकर्मानुष्ठान ज्या अज्ञानी लोकांस आनंद देतें; कर्म करणें हाच पुरुषार्थ आहे असें ज्यांस वाटतें, ते लोक पुनःपुनः जन्ममरणाच्या भोंवऱ्यामध्यें सांपडतात." अशी श्रुति आहेः म्हणून नरक अथवा अंधकार असा 'अंधन्तमः' याचा अर्थ करणें अन्याय्य आहे. सारांश; केवल कर्म करणारे जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतात, हें येथें सांगावयाचें आहे. केवल कर्म जन्ममृत्यू देणारें आहे; तसेंच, जे लोक आपल्या अधिकारास उचित अशा विहित कर्माचा त्याग करून, केवल ज्ञानामध्यें मात्र आपल्या जन्माचा अपव्यय करितात; ते पंडितम्मन्य वेदान्ती केवल कर्मनिष्ठांस मिळणाऱ्या जन्ममरणरूपी चक्रापेक्षांही जास्त भयंकर, जास्त संकटाच्या आणि जास्त अज्ञानरूपी अंधकार गृहेमध्यें ढकलून दिले जातात!

शिष्य—मंत्रांत इव शब्द कशाला आला आहे ?

सिद्धान्ती—या शब्दाचें रहस्य असें आहे कीं, वरील पंडितम्मन्य लोकांना ज्या गाढ अज्ञानांधकारांत शिरावें लागतें, त्याचें स्वस्वरूप समजण्याच्याही कक्षेंत नाहीं; आणि कदाचित् समजलेंच, तर त्याचें ग्रहणही करितां यावयाचें नाहीं ! सारांश, अति गाढ, अति अगाध, अन्धतमामध्यें (अज्ञानामध्यें) या केवल ज्ञाननिष्ठ लोकांस कोंडून ठेविलें जातें ! ॥ ९ ॥

मंत्र दहावा.

किं तर्हि मोक्षसाधनमित्यत्राह—

शिष्य—मोक्षसाधन कोणतें तर मग ?

सिद्धान्ती—तेंच या दहाव्या मंत्रांत सांगतात. ऐकः—

विद्ययेति पञ्चम्यर्थे तृतीया । यथाश्रुतेऽन्यशब्दानन्वयादन्यदेवाऽऽहुः संभवादिति वक्ष्यमाणानुरोधाच्च । तथा च विद्यायाः कर्मरहित-विद्यातोऽन्यन्मोक्षसाधनमित्याहुः । उपनिषद इति शेषः । अविद्यया । अविद्यायाः । ब्रह्मविद्याविधुरकर्मणोऽन्यदेव मोक्षसाधनमित्याहुः । पूर्वपूर्वसंप्रदायसिद्धोऽयमर्थोऽस्माकमित्याह—इति शुश्रुम इति । ये पूर्वाचार्यास्ते प्रणिपातादिभिः सम्यगुपसन्नानमस्माकं तन्मोक्षसाधनं विचचक्षिरे विविच्योपदिदिशुः । तेषां धीराणां धीमतां परमात्मध्यानपराणां वचनमित्यध्याहार्यम् । यद्वा धीराणामिति पञ्चम्यर्थे षष्ठी । तेभ्यो धीरेभ्य इति योज्यम् नटस्य शृणोतीतिवत् । इति शुश्रुमः । एवं प्रकारमश्रौषम् । ननु परोक्ष एवार्थे लिड्विधानाच्छुश्रुमेत्युत्तमपुरुषो न घटत इति चेत्सत्यम् । ब्रह्मविद्यायां दुरवगाहत्वेन निःशेषग्रहणमस्माभिर्नकृतमित्यभिप्रायकत्वादुत्तमपुरुषप्रयोगस्येत्याहुः ॥ १० ॥

येथें विद्येची तृतीयान्त विभक्ति आहे, तिचा अर्थ पंचमी विभक्तिपर केला पाहिजे. कारण तृतीयापर अर्थ केला तर मंत्रामध्यें जो अन्य शब्द आहे, त्याचा अन्वय दुसऱ्या कोणत्याही शब्दाशीं बरोबर रीतीनें लागत नाहीं. पुढें, तेराव्या मंत्रांत " संभवात् " या पंचमी विभक्तीशीं ' अन्यत् ' याचा संबंध श्रुतीनें केला आहे. म्हणून येथील मंत्राचा अर्थ करितांना पंचमी विभक्तीच घेतली पाहिजे. असो; याप्रमाणें कर्मरहित विद्येहून मोक्षसाधन निराळेंच आहे, असें सांगावयाचें आहे. निवळ शब्दपांडित्यानें मोक्ष मिळत नाहीं, असें उपनि-

षदांचें म्हणणें आहे. याच न्यायानें ज्ञानशून्य कर्माहून (ब्रह्मविद्येचें ज्ञान नसणाऱ्या पुरुषानें केलेल्या केवल कर्माहून) मोक्षसाधन निराळें आहे; हा उपनिषदांचा अभिप्राय आहे. म्हणून 'आम्ही केलेला अर्थही सनातन जो संप्रदाय चालत आला आहे त्याचाच अनुवाद धरून आहे.' हें स्पष्ट करण्यासाठीं "आम्ही असें ऐकलें आहे" असे या मंत्रामध्यें शब्द आहेत. 'आम्ही साधनसंपन्न झालों, नम्रभावानें ब्रह्मज्ञ आणि तत्त्वज्ञ आचार्यांच्या आश्रमांत जाऊन त्यांना साष्टांग नमस्कारांनीं प्रसन्न करून घेतलें आणि त्यांना मोक्षाचें साधन विचारलें; तेव्हां सारासार-विवेकपूर्ण असा मोक्षसाधनाचा उपदेश त्यांनीं आम्हांस केला. हे आचार्य परम बुद्धिमान् आणि परमात्म-चिंतन करणारे होते. त्यांचा उपदेश असा आहे कीं, किंवा त्यांच्यापासून आम्ही असें ऐकिलें आहे कीं, निवळ कर्म करणें हें किंवा केवल ज्ञानाच्याच पाठीमागें लागणें हें मोक्षाचें साधन नाहीं. त्याचें साधन निराळेंच आहे. येथें 'वचन' 'उपदेश' इत्यादि शब्द नाहींत. पण ते अध्याहृत आहेत असें सहज समजतें.

शिष्य—भगवन्! येथें "धीराणाम्" ही जी षष्ठी आहे तिचा अर्थ पंचमीप्रमाणें करावयाचा काय?

सिद्धान्ती—होय.

शिष्य—येथें "शुश्रुम" हें भूतकाळाचें रूप योग्य दिसत नाहीं. कर्ता प्रथम पुरुषी असतां असा भूतकाळ करित नाहींतना?

सिद्धान्ती—तूं म्हणतोस हें खरें आहे; परंतु ब्रह्मविद्या ही पूर्णत्वानें समजून घेण्याला प्रायः अशक्य आहे, आम्हीं त्या विद्येचें पूर्ण ग्रहण केलें नाहीं, असें दाखविण्याकरितां व असा अभिप्राय मनांत आणून ह्या परोक्षवाचक पदाचा उपयोग केला आहे; पण हा व्याकरणाचा प्रश्न आहे. असो; अपरोक्षज्ञान झालें नाहीं, हें सांगण्याचा मुख्य हेतु आहे. ॥ १० ॥

मंत्र अकरावा.

अन्यदिति सामान्येनोक्तं मोक्षसाधनं विवृणोति—

सिद्धान्ती—गेल्या मंत्रांत 'दुसरें साधन आहे' असें जें सामान्यत्वानें म्हटलें आहे त्याचें स्पष्टीकरण या मंत्रांत केलें आहे.

कुर्वन्नेवेह कर्माणीति मन्त्रे कर्मयोगस्य प्रत्यगात्मदर्शनद्वारा परभक्त्युत्पादकत्वमुक्तम्। इह भक्तियोगेन विदुषा पूर्वोक्तकर्मयोगवेषं परित्यज्याऽहरहरनुष्ठीयमानानां नित्यनैमित्तिककर्मणां कल्मषनिबर्हणद्वारा भक्त्युपचायकत्वमुच्यते। सहशब्दस्त्वारस्यात्।

अतो न पुनरुक्तता। यो यथावस्थितविद्योपदेशवान्। विद्यां ब्रह्मोपासनरूपां तदङ्गभूतकर्मरूपामविद्यां चैतदुभयं सह वेद। अङ्गाङ्गिभावेन सहानुष्ठेयं वेदेत्यर्थः। अविद्यया विद्याङ्गतया चोदितेन कर्मणा मृत्युं विद्योत्पत्तिप्रतिबन्धकीभूतं पुण्यपापरूपं प्राक्तनकर्म तीर्त्वा निर्विशेषमुल्लङ्घ्य। विद्यया परमात्मोपासनरूपया। अमृतमश्नुते मोक्षं प्राप्नोतीत्यर्थः। तीर्त्वेत्यत्रोपायविरोधितरणमुच्यते। अमृतमश्नुत इत्युपेयब्रह्मप्राप्तिविरोधिभूतेभ्यः सर्वपापेभ्यो मोक्षः इति भेदः। एवं च सति—

इयाज सोऽपि सुबहून्यज्ञाञ्ज्ञानव्यपाश्रयः।
ब्रह्मविद्यामधिष्ठाय तर्तुं मृत्युमविद्यया॥ इति।

ज्ञानव्यपाश्रयः शास्त्रश्रवणजन्यब्रह्मज्ञानवान्स जनकोऽपि ब्रह्मविद्यां निदिध्यासनरूपामधिष्ठाय फलत्वेनाऽऽश्रित्येत्यर्थः। भक्तियोगोत्पत्तिं कामयमान इति यावत्। मृत्युं भक्त्युत्पत्तिविरोधि प्राचीनं कर्मजातम्। अविद्यया विद्याङ्गकर्मणा तर्तुं व्यपोहितुं सुबहून्यज्ञाञ्ज्योतिष्टोमादिकानियाजाकरोत्। पाकं पचतीतिवत्॥ ११॥

या उपनिषदाच्या दुसऱ्या मंत्रांत कर्मयोगाचा जो मार्ग सांगितला आहे, त्यानें प्रत्यगात्म्याचें (जीवाचें नियमन करणाऱ्या व्यक्तिगत आत्म्याचें) प्रत्यक्ष दर्शन होऊन त्याच्या संबंधानें पराभक्ति, उत्तमभक्ति, उत्पन्न होते, केवल जन्म घेते, असें प्रतिपादन केलें आहे. ह्या मंत्रांत भक्तियोगाचें माहात्म्य सांगावयाचें आहे. या भक्तियोगानें पूर्वी सांगितलेला कर्मयोगमार्ग पाठीमागें टाकून द्यावयाचा असतो. कारण अहर्निश यथाविधि केलेल्या नित्यनैमित्तिक कर्मांच्या प्रभावानें पूर्वपातकांचें व दोषांचें निरसनच होऊन गेलेलें असतें. अर्थातच मग भक्तियोगाला पुष्टि येते. तो योग वृद्धिंगत होतो. असें हें तत्त्व स्पष्ट दाखवावयाचें आहे. या मंत्रांत 'सह' ह्या शब्दाचा विशेष उपयोग आहे. पूर्वीच्या मंत्रांत हा शब्द आला नाहीं म्हणून येथें कांहीं विशेष अभिप्राय कळवावयाचा आहे, असें सिद्ध होतें. यास्तव येथें पुनरुक्तीचाही दोष येत नाहीं. असो; ज्या पुरुषाला ब्रह्माची उपासना कशी करावी याचें यथास्थित ज्ञान झालें आहे; व ह्या उपासनेला साहाय्य असणारी कर्मरूप अविद्या इचेंही ज्ञान झालें आहे, सारांश, कर्मविद्या हें अंग आणि ब्रह्मोपासनारूप विद्या ही अंगी, या दोहींचें ज्ञान होऊन दोन्ही विद्यांचें अनुष्ठान बरोबरच केलें पाहिजे, कर्म आणि उपासना यांचें साहचर्यानें अनुष्ठान केलें पाहिजे असें ज्या विद्वान् मुमुक्षु पुरुषाला ज्ञान झालें आहे तो पुरुष खरा विद्वान् होय. हा पुरुष अविद्येच्या म्हणजे कर्मांच्या अनुष्ठानसाहाय्यानें मृत्यूला पाठीमागें टाकितो; आणि विद्येच्या म्हणजे ज्ञानपूर्वक उपासनेच्या द्वारा अमृतरूप प्राप्त करून घेतो. विद्येला उपयोगी पडणाऱ्या आणि विद्येनें

प्रेरित केलेल्या कर्माच्या म्हणजे अविद्येच्या साहाय्यानें तो मृत्यूच्या पलीकडे जातो याचा अर्थ असा कीं विद्येची (उपासनेची) भावना उत्पन्न करण्याला जें पुण्य-पापरूपी प्राक्तनकर्म प्रतिबंध करितें, त्या संचित कर्माचा नाश विद्या. प्रेरित कर्मयोगानें होतो अथवा पूर्वसंचिताचा नाश निष्काम कर्मानें होतो. याप्रमाणें वरील विद्वान् पुरुषाचा मृत्यु मरून जातो! पुढें त्याचें परमेश्वरोपासनेचें (विद्येचें) अनुष्ठान चाललेलें असतें म्हणून तो मोक्षालाही प्राप्त करून घेतो. तात्पर्य, कर्मयोगानें त्याचें सर्व संचित संपतें आणि तो ज्ञानयोगाच्या साहाय्यानें (उपासनेच्या बलानें) सर्व पापापासून मुक्त होतो. कर्मयोगानें उपासनेच्या आड येणाऱ्या प्रतिबंधाचा नाश होतो आणि विद्येनें (उपासनेनें) ब्रह्मप्राप्तीला (पुरुषार्थ साध्य करण्याच्या कर्माला) विरोधि असणाऱ्या सर्व पापांचा नाश होतो. कर्मयोग साधनें सोपीं करितो आणि ज्ञानयोग पुरुषार्थाला जवळ आणितो. इतिहासांतही सांगितलें आहे:—

"ज्ञानी (ज्ञानाचा आश्रय करणाऱ्या) जनक राजानें पुष्कळ यज्ञ केले. त्याचा हेतु मृत्यूस पाठिमागें टाकावें, हा होता. हा राजा ब्रह्मविद्येचा कट्टा उपासक होता म्हणून त्यानें ब्रह्मविद्येच्या साहाय्यानें पुष्कळ यज्ञ केले."

याचा भावार्थच असा आहे कीं, शास्त्रश्रवणानें ब्रह्मज्ञानी झालेला जनकराजा अखंड ध्यानरूपी उपासनेचा आश्रय करून (भक्तियोग उत्पन्न होणें हेंच फल आहे असा निश्चय करून) भक्तीला विरोध करणाऱ्या प्राचीन पापपुण्यरूपी कर्माचा नाश करण्यासाठीं व भक्तीचा उदय व्हावा यासाठीं विद्येचें साहित्य करणाऱ्या ज्योतिष्टोमादिक यज्ञांचा (अविद्येचा) आश्रय करिता झाला. सारांश असा आहे कीं, ब्रह्मज्ञानी जनकानें सुद्धां कर्म आणि उपासना या उभयतांचा आश्रय केला होता.

शिष्य—'पाक पकवितो' याप्रमाणेंच 'यज्ञाचें यजन करितो,' हा प्रयोग आहे ना?

सिद्धान्ती—होय. हे असले प्रयोग अर्थास चांगली दृढता आणून वाक्यही सालंकृत करितात. ॥ ११ ॥

मंत्र बारावा.

एवं समाधिनिष्पत्तेर्नित्यनैमित्तिककर्मसाध्यत्वमुक्त्वाऽथ त्रिभिर्मन्त्रैर्निषिद्धनिवृत्तिरूपयोगाङ्गसाध्यत्वमाह—

तत्र तावत्प्राग्वदेकैकमात्रं विनिन्दति ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें निष्काम-वृत्ति धारण करून नित्यनैमित्तिक कर्में केलीं तरच उपासनेची परकाष्ठा होऊन समाधीची स्थिति प्राप्त होईल असा मागील

मंत्रांतील विषय झाला. आतां, यापुढील तीन मंत्रांत निषिद्ध अशी जी कर्म-निवृत्ति तीही योगाचें एक अंग आहे, हें सिद्ध केलें आहे. बाराव्या मंत्रांत प्रथम ज्ञानयोगाचा मात्र जे आश्रय करितात त्यांची निंदा केली आहे. कशी ती पहाः—

' एतमितः प्रेत्याभिसंभवितास्मि [छा० ३।१४।४], ' ब्रह्मलोकमभिसंभवामि [छा० ८।१३।१] इत्यादिषु ब्रह्मप्राप्तिरूपाऽनुभूतिः संभूतिशब्देनोक्ता। इह तु समाधिरूपा संभूतिशब्देनोच्यते। असंभूतिशब्दस्तु समाध्यङ्गभूतां निषिद्धनिवृत्तिमाह। संभूतिं च विनाशं चेत्युत्तरत्र विनाशशब्देनासंभूतेरनुविधानात्। तथा च ये विद्याधिकारिणोऽसंभूतिमेव मानदम्भहिंसास्तेयादीनां योगविरुद्धानां निवृत्तिमेवोपासते निवृत्तिमात्रनिष्ठा इत्यर्थः। तेऽन्धं तमः प्रविशन्तीति पूर्ववदर्थः। ये पुनः समाधिरूपसंभूत्यामेव रतास्ते ततो भूय इव तमः प्रविशन्तीत्यर्थः॥ १२॥

छांदोग्यामधील (३।१४।४ व ८।१३।१) इत्यादि मंत्रांत जो संभूति शब्द आला आहे, त्याचा अर्थ ब्रह्मप्राप्तिरूप अनुभव किंवा तो अनुभव घेणें असा आहे. " हा मृत्युलोक टाकून देऊन मी ब्रह्मप्राप्तीचा अनुभव घेईन " व ब्रह्मलोकाला जाऊन " मी ब्रह्मरूपाचा अनुभव घेईन " असें छांदोग्यांतून उद्धृत केलेल्या मंत्रांचे अर्थ आहेत; पण शिष्यराया! ध्यानांत ठेव कीं येथें ' संभूति ' शब्दानें समाधिरूपाचा बोध होतो. ' असंभूति'शब्दाचा अर्थ ' समाधीला साहाय्य करणारी निषिद्ध-निवृत्ति ' असा आहे. पुढें चौदाव्या मंत्रांत संभूति आणि विनाश हे दोन परस्परविरोधी शब्द एकत्र वाक्यांत आले आहेत व तेथें असंभूतीच्या स्थानीं विनाश शब्द आहे, त्यावरूनही ' असंभूति ' शब्दाचा अर्थ विनाश असाच आहे, हें ठरतें. असो; तात्पर्य हें आहे कीं, जे विद्येनें अधिकृत झाले आहेत, ते जर असंभूतीचा म्हणजे मान, दंभ, हिंसा, चौर्य, इत्यादि योगविरुद्ध कर्मांच्या निवृत्तीचा मात्र आश्रय करितील, सारांश, परापकारी कर्मांचा तेवढा त्याग करतात ते असंभूतीची उपासना करणारे आहेत. असें ठरतें. हे लोक अंधतमामध्यें प्रवेश करितात. अंधन्तम याचा अर्थ नवव्या मंत्रांत सांगितलाच आहे. व जे लोक संभूतीचा म्हणजे समाधिरूपाचा मात्र आश्रय करितात ते अधिकच कष्टमय लोकांप्रत जातात.

सारांश, जे लोक ज्ञानाशिवाय नुसत्या शमदमादि निवृत्तिमूलक कर्मांचा मात्र आश्रय करितात त्यांचें कल्याण होत नाहीं व जे ज्ञानी लोक नुसत्या समाधीचा मात्र आश्रय करितात त्यांचें तर मुळींच कल्याण होत नाहीं॥ १२॥

मंत्र तेरावा.

किं तर्हि मोक्षसाधनमित्यत्राह—

सिद्धान्ती—तर मग मोक्षसाधन तरी काय? असें विचारशील तर सांगतों ऐकः—

संभवात्संभूतेः। असंभवादसंभूतेरित्यर्थः। केवलात्संभवादसंभवाच्चान्यदेव मोक्षसाधनमित्युपनिषद आहुः। लिङुत्तमः पूर्ववत्। शिष्टं स्पष्टम्॥ १३॥

'संभव' याचा अर्थ संभूति म्हणजे समाधि होय. 'असंभव' या शब्दाचा अर्थ असंभूति म्हणजे निषिद्ध कर्मापासून निवृत्ति असा आहे. केवळ समाधीच्या अनुष्ठानानें किंवा निषिद्धनिवृत्तीच्या मार्गानें मोक्ष मिळत नाहीं. मोक्षाचें साधन या उभयतांहूनही भिन्न आहे असें श्रुति म्हणते. बाकीचा अर्थ व प्रथम पुरुषाची योजना दहाव्या मंत्राप्रमाणेंच आहे. ॥ १३ ॥

मंत्र चवदावा.

अन्यदित्युक्तं विवृणोति—

सिद्धान्ती—या मंत्रांत अन्यत् शब्दाचें व्याख्यान करितातः—

संभूतिं समाधिरूपब्रह्मानुभूतिं विनाशं च योगविरोधिनां वर्जनं चेत्येतदुभयं यो विद्वानगांगिभावेन सह वेद स विद्वान्विनाशेन निषेध्यमाणेनेति शेषः। विरोधिनिवृत्तिरूपयोगांगसेवनेनेत्यर्थः। मृत्युं समाधिविरोधिपापं तीर्त्वाऽपाकृत्य निष्पन्नया संभूत्याऽमृतमश्नुते ब्रह्मप्राप्तिरूपां संभूतिमश्नुत इति भावः। अत्र संभूतिविनाशशब्दाभ्यां सृष्टिप्रलयाविवक्षया कार्यहिरण्यगर्भस्याव्याकृतप्रधानस्योपासनं विधीयत इति शांकरं व्याख्यानमनुपपन्नम्। मृत्युतरणामृतत्वप्राप्तिरूपफलवचनानौचित्यात्॥ १४॥

समाधिरूप ब्रह्मानुभूति व योगविरोधि कर्मांचा त्याग या उभयांचा अंगांगिभावानें (निषिद्ध कर्मांची निवृत्ति हें अंग आणि समाधिरूप ब्रह्मानुभूति ही अंगी) या उभयतांचेंही ज्याला ज्ञान आहे, व जो यांचें अनुष्ठान करितो त्याला योगविरोधि जें शमदमादि कर्म असतें, त्याच्या एकनिष्ठ सेवनानें समाधीला विरोध करणाऱ्या पापांचा नाश करतां येतो आणि हें पाप नष्ट झाल्यावर त्याला उत्पन्न झालेल्या ब्रह्मप्राप्तिरूप समाधीचा लाभ होतो. पापनिवृत्ति ही योग्यास मृत्यूच्या पलीकडे नेते आणि एकनिष्ठ ध्यानाची समाधि ब्रह्मज्ञाला अमृत पाजिते.

शिष्य—भगवन्! संभूति आणि विनाश या शब्दांचा अर्थ शांकर-मतानें कांहीं निराळाच होतो. त्या मतांत सृष्टीची व प्रलयाची विवक्षा मनांत ठेवून कार्यरूपी हिरण्यगर्भाची उपासना म्हणजे संभूति व अव्याकृत प्रधानाची उपासना म्हणजे विनाश असे अर्थ करून हिरण्यगर्भ व अव्याकृत प्रधान यांच्या उपासना विहित केल्या आहेत, हें व्याख्यान बरोबर आहे काय?

सिद्धान्ती—नाहीं. हें व्याख्यान सर्वथा चुकलेलें आहे. कारण, या मंत्रांत मृत्यूचें तरण आणि अमृतत्वाची प्राप्ति हीं फलें स्पष्ट सांगितलीं आहेत. व शंकराचा अर्थ घेतला तर हीं फलप्रतिपादक-वचनें निरर्थक होतील. श्रुतीमध्यें निरर्थक किंवा अनुचित शब्द असणें संभवत नाहीं. ॥ १४ ॥

मंत्र पंधरावा.

एवं सांङ्गभगद्भक्तिमुपदिश्य तन्निष्ठस्यानुसंधेयमन्त्रद्वयमुपदिशति—

सिद्धान्ती—याप्रमाणें मागील १४ मंत्रांत भगवद्भक्तीचा सांगोपांग उपदेश केला आहे. असो; एकनिष्ठ भक्तानें ध्यानांत ठेवण्यासाठीं पुढील दोन मंत्र अवतीर्ण केले आहेत. वरील भक्तानें ह्या पुढील दोन मंत्रांचें एकनिष्ठ अनुसंधान ठेवणें अत्यंत इष्ट आहे.

हे पूषन्नादित्यान्तर्यामिन्। य आदित्ये तिष्ठन्नित्यारभ्य 'य आदित्यमन्तरो यमयति' [३।७।९] इति शतपथश्रुतेः। 'शास्त्रदृष्ट्यातूपदेशो वामदेववदि' त्यादिन्यायाच्च। यद्वा पूषन्नाश्रितपोषणस्वभावेत्यर्थः। 'साक्षाद्प्यविरोधं जैमिनिः [ब्र. सू. १।२।२८] इति सूत्रानुरोधात्। सत्यस्य। सत्यशब्देन स्वरूपविकाररहितजीवात्मोच्यते। 'सत्यं चानृतं च' (छा० १।२।३) सत्यमभवदित्यादिषु जीवेऽपि सत्यशब्दप्रयोगात्। तस्य मुखम् मुखवत्। अनेकेन्द्रियावष्टम्भकतया मुखसदृशं मन इत्यर्थः। हिरण्मयेन हिरण्यसदृशेन भोग्यवर्गेणेति यावत्। पात्रेण परमात्मविषयकवृत्तिप्रतिरोधकेनापिहितमाच्छादितम्। हृदि निहिते परमात्मनि निरुद्धवृत्तिकं जातमित्यर्थः। तज्जीवस्य मुखस्थानीयं मनो हृषीकाणामीशस्त्वमपावृणु निरस्य तिरोधानं कुर्वित्यर्थः। तत्कस्य हेतोस्तत्राऽह-सत्यधर्माय सत्यस्य जीवस्य धर्मभूताय। दृष्टिर्दर्शनम्। त्वद्दर्शनायेति भावः ॥ १५ ॥

शिष्य—कशाकरितां महाराज?

सिद्धान्ती—सत्य धर्माचें दर्शन व्हावें म्हणून.

हे पूषा ! हे आदित्याचें नियमन करणाऱ्या अंतर्यामी देवा !—

शिष्य—असा हा अंतर्यामित्वाचा अर्थ कसा निघतो ?

सिद्धान्ती—" जो आदित्यामध्यें राहून " असा आरंभ करून " जो आदित्याचें अंतरंग नियमित करितो, जो आदित्याचा अंतर्यामी असतो " अशी शतपथश्रुति (३।७।९) येथें प्रमाण आहे. या श्रुतीवरून आम्ही केलेला अर्थच अभिप्रेत आहे, असें ठरतें. शास्त्र दृष्टीनेंही हाच अर्थ ठरतो. ' वामदेवाला जसा उपदेश झाला आहे त्यांत सर्वत्र परमात्मा आहे व तो सर्वांचा अंतर्यामी आहे, असें ज्ञान झालें.' या श्रीमद्व्यासाचार्यांच्या सूत्रावरून आम्ही अर्थ केला आहे तोच खरा आहे.

शिष्य—किंवा पूषन् याचा अर्थ शरण आलेल्या लोकांचा ' पोषणकर्ता ' असाही करावा. " परमेश्वराची साक्षात् उपासना केली तरी विरोध येत नाहीं. असें श्रीमद्व्यासाचार्यांनीं ब्रह्मसूत्रामध्यें (१।२।२८ पहा) म्हटलें आहे.

सिद्धान्ती—ठीक आहे. हाही अर्थ शास्त्राला संमतच आहे. असो; आतां, या मंत्रांतील सत्य या शब्दानें स्वस्वरूप, विकारशून्य जीवात्मा, असा अर्थ घ्यावयाचा आहे. जीवाला देवाचें (परमेश्वराचें) दर्शन व्हावें म्हणून 'मनोनाश कर' हा उपदेश आहे.

" सत्य आणि असत्य या छांदोग्य (१।२।३) श्रुतीमध्यें जीवालाही ' सत्य ' हाच शब्द उपयोजिला आहे. त्याच जीवात्म्याचें मुख म्हणजे अनेक इंद्रियांचें अधिष्ठान असणारें व त्यांचें नियमन करणारें जीवाचें मन असा अर्थ होतो. या जीवाचें मन जणूं कांहीं इंद्रियांचें मुखच आहे, असो; हें मन भोग्य-विषयांनीं म्हणजे परमात्मस्वरूपाकडे जाणारी जी वृत्ति तिचा प्रतिरोध होणाऱ्या सुंदर व तेजस्वी भोग्य पदार्थांनीं झांकून किंवा आच्छादून टाकलें आहे. सारांश, जीवाचें मन परमात्म्याकडून निघून विषयांमध्यें रममाण झालें आहे. हृदयामध्यें राहणाऱ्या परमात्म्याला पराङ्मुख होऊन जीवाचें मन विषयोन्मुख झालें आहे. म्हणून ' हे इंद्रियांचा स्वामी असणाऱ्या देवा ! जीवांचें मुख्य इंद्रिय जें मन तें विषयांनीं आच्छादून टाकलें आहे, तें तिकडून काढ. म्हणजे विषयांपासून ह्याला निवृत्त कर, एकीकडे ने किंवा त्या विषयोन्मुख मनाला नाहींसेंच करून टाक."

विषयोन्मुख मनाचा नाश होऊन धर्मरूपी परमेश्वराकडे भक्ताची दृष्टि लागावी एतदर्थ ही प्रार्थना आहे ॥ १५ ॥

मंत्र २०।२१।

पुनरपि तया दृष्ट्या द्रष्टव्यं विशिष्यन्दर्शनं तत्साधनं चाभ्यर्थयते—

सिद्धान्ती—याच दृष्टीनें पुनःही जें ब्रह्मस्वरूप पहावयाचें आहे, त्याचें विशिष्ट स्वरूप सांगून त्याचें दर्शन व्हावें; व त्याच्या दर्शनाचीं साधनें प्राप्त व्हावीं एतदर्थ या मंत्रांत प्रार्थना केली आहे.—

पूषन्नाश्रितपोषक। एकश्चासावृषिश्चैकर्षिः। अद्रियातीन्द्रियार्थद्रष्टा। 'नान्योऽतोऽस्ति द्रष्टा' [बृ ३।७।२३] इति श्रुतेः। यमो यमयति सर्वानिति यमः। सर्वान्तर्यामिन्। 'यः पृथिवीमन्तरो यमयति' [बृ०३।७।३] 'य आत्मानमन्तरो यमयति' [बृ०३।७।२] इत्यादि श्रुतेः। सूर्य स्वोपासकधियां सुष्ठु प्रेरक। प्राजापत्य प्रजापतिश्चतुर्मुखस्तस्य सुताः प्रजापत्यास्तेषामन्तर्यामिन्। यद्वा प्रजापतिरेव प्राजापत्यः। प्रजानां पतिरिति व्युत्पत्त्या प्रजापतिर्विष्णुः 'प्रजापतिश्चरति गर्भे अन्तः' [म० ना० १।१] इति श्रुतेः। व्यूह रश्मीन्। भवदीयदिव्यरूपदर्शनानुपयुक्तान्स्वोग्ररश्मीन्व्यूह व्यपोह विगमयेत्यर्थः। यत्ते दर्शनोपयिकं प्रभात्मकं तेजस्तत्समूह समूहीकुरु। तत्किमर्थमित्याशङ्क्य द्रष्टुमिच्छामि ते रूपमित्याह यदिति यत्। 'आदित्यवर्णं तमसः परस्तात्' [श्वे० ३।८] इत्यादिश्रुतिषु प्रसिद्धमित्यर्थः। ते। 'आनन्दो ब्रह्म' [तै० ३।६] इति निरतिशयभोग्यस्य तवापि। कल्याणतमं सौन्दर्यादिगुणातिशयेन कल्याणेभ्योऽतिशयितं कल्याणं शुभाश्रयमिति भावः। ते यद्दिव्यरूपं तत्पश्यामि पश्येयमिति लकारव्यत्ययश्छान्दसः। द्रष्टुमिच्छामीति भावः। ननु 'यत्ते रूपं कल्याणतमम्'। 'य एषोऽन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषः'। [छा० १।६।६] 'ईशा वास्यमिदं सर्वम्' [ई० १] 'पतिं विश्वस्याऽऽत्मेश्वरम्'। '[म० ना० ११।३] 'सर्वकर्मा सर्वगन्धः। स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च' [श्वे० ६।८]। तस्य ह वा एतस्य ब्रह्मणो नाम सत्यमिति' [छा० ८।३।४] 'तस्योदिति नाम' [छा० १।६।७] इत्यादिभिः शास्त्रैर्गुणविग्रहादयो ब्रह्मणो विधीयन्ते। निर्गुणं निरञ्जनम्। 'सत्यं ज्ञानम्' [तै० २।१।१] 'अकायमव्रणम्।' [ई० ८] 'नेह नानास्ति किंचन' [बृ० ४।४।१९] 'निष्कलं निष्क्रियम्।' [श्वे० ६।१९] 'अगोत्रमवर्णम्।' [मु० १।१।६] एवमादिभिः शास्त्रैर्गुणादयः प्रतिषिध्यन्ते। तथा विधिनिषेधयोः शास्त्रयोर्विरोधादन्यतरबाधोऽवश्यंभावी। तत्र निषेधस्य प्रसक्तिपूर्वकतया पश्चात्प्रवृत्तं प्रतिषे-

धशास्त्रमपछेदाधिकरणन्यायेन प्रबलम् । अतः प्रतिषेधबलेन गुणादिविधयः सर्वे बाधिताः । ततश्च विद्याख्यदोषपरिकल्पित-गुणविग्रहादयो मिथ्याभूता इति । तदिदमनादरणीयम् । पशुच्छा-गनयेनोत्सर्गापवादनयेन च विधिनिषेधयोर्भिन्नविषयत्वोपपादनेन तयोर्विरोधगन्धाभावाद्विधीनां प्रतिषेधबाध्यतानुपपत्तेः । तदुक्तं तत्त्वसारे—

यद्ब्रह्मणो गुणविकारशरीरभेदकर्मादिगोचराविधिप्रतिषेधवाचः ।
अन्योन्यभिन्नविषया न विरोधगन्धमर्हन्ति तत्र विधयः प्रतिषेधबाध्याः ॥

इति । अथान्तर्यामिणमहंग्रहेणानुसंधते—योऽसावसौ पुरुषः सोऽ-हमस्मीति । असावसाविति वीप्साऽऽदरार्था । यद्वाऽदः शब्दौ विभज्य यत्तच्छब्दाभ्यामन्वेतव्यौ योऽसौ पुरुषः प्रसिद्धः सोऽसाव-हमस्मीति । यद्यपि—

पुरुषं प्रकृतिं चैव प्रधानपुरुषेश्वरः [गी० १३।१९]

इत्यादिषु पुरुषशब्दो जीववाचितया प्रसिद्धस्तथाऽपि 'तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम् ।' [श्वे० ३।९] इत्यादिश्रुत्या सर्ववेदपठित-पुरुषसूक्तादिषु प्रसिद्धो महापुरुष एवेह पुरुषशब्देन विवक्षितः । नन्वेवं योऽसौ पुरुषः सोऽहमिति कथं सामानाधिकरण्यम् । अहं-पदार्थस्य जीवस्य महापुरुषाद्भिन्नत्वादिति चेन्न । अहंशब्देनाप्य-स्मदर्थान्तर्यामिण एवाभिधानेनाहं स इति निर्देशस्य सुसंग-तत्वात् । ननु चाहंशब्दस्य प्रत्यगर्थान्तर्यामित्वपरत्वे सोऽस्मी-त्युत्तमपुरुषो न घटते । नहि तदन्तर्यामिपुरुषोऽस्मीत्यन्वयो युज्यत इति चेदुच्यते—मदन्तर्यामीत्यादिशब्दान्तरेणोपस्थापिते प्रत्यगर्थान्तर्यामिण्युत्तमपुरुषान्वयासंभवेऽप्यहमित्यस्मत्पदोपस्था-पिते तस्मिन्नुत्तमपुरुषान्वयो युज्यत एव । तथा च सूत्रम्-अस्म-द्युत्तमः । (पा० सू० १।४।१०) इति । प्रत्यगर्थबोधकास्मच्छ-ब्दोपपदउत्तमपुरुषो भवतीत्यर्थः । न पुनरस्मच्छब्दस्य प्रत्य-गर्थद्वारा परमात्मपर्यन्ततायामुत्तमनिवृत्तिरिति । अधिकं तु प्रविष्टं न तद्धानिरिति न्यायात् । एवं तत्त्वमसीत्यादिष्वप्यसीति मध्यमपुरुषो निर्वाह्यः । त्वंपदेनाभिमुखचेतनद्वारैव तदन्तर्यामि-णोऽभिधानाभ्युपगमात् । तत्रापि 'युष्मद्युपपदे समानाधिकरणे स्थानिन्यपि मध्यमः ।' (पा० सू० १।४।१०५) इत्येतावदेव हि

स्मर्थते । न तु युष्मच्छब्दस्य स्वाभिमुखचेतनद्वारा तदन्तर्यामिपर्यन्तत्वे मध्यमनिवृत्तिरिति । ये तु तत्त्वमसि सोऽहमस्मीत्यादिष्वहंत्वमादिशब्दैर्युष्मदस्मदर्थपरित्यागेन निर्विशेषचिन्मात्रस्वरूपैक्यमेव वाक्यवेद्यमित्याहुः, तानेव तत्त्वमसीत्यादिवाक्येष्वसिरिव सोऽहमस्मीतिवाक्यस्थास्मिरपि खण्डयति । श्रोतर्यनुसंधातरि च युष्मदस्मत्ते हि तैः परित्यक्ते न तेषामसिना कश्चित्प्रतिबोधनीयोऽस्ति न च कश्चिदस्मिना विशिष्यानुसंधेयः । ननु प्रकृते युष्मदस्मदोरिवक्षायामपि तयोर्व्युत्पन्नयुष्मदस्मच्छब्दोपपदमात्रोपजीवनेनास्मत्पक्षेऽपि त्वमहमिति मध्यमोत्तमयोः संपत्तिरिति चेत् । ततोऽप्यपरित्यक्तप्रवृत्तिनिमित्तकस्यास्माकं निर्वहणस्यैवानुसर्तुमुचितत्वात् । अपर आह योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मीत्यत्र पुरुषशब्देन परमपुरुषो न विवक्षणीयः । तथा सत्युत्तमपुरुष इत्याख्यायाः सोऽहमिति सामानाधिकरण्यस्य च लेशेन निर्वाह्यत्वात् । अतो वरमत्र पुरुषशब्दस्य परिशुद्धजीवात्मपरत्वमाश्रयितुम् । एवं च सति यः पुरुषो मुक्तिदृश्यभाव्याकारः परिशुद्धजीवात्मा सोऽहमस्मीत्यन्वयादुत्तमपुरुष इत्याख्यायाः सामानाधिकरण्यस्य चातिस्वरसेन निर्वाह इति । नायं पक्षः साधुः । तथा हि—भवत्वेवमिह निर्वहणं तथाऽपि तत्त्वमसीत्यत्र तत्पदस्य त्वं वा अहमस्मि भगवो देवते, अहं वै त्वमसीत्यादिषु त्वंपदस्य च परदेवतावाचकत्वे त्वदुक्तनिर्वाहस्यात्रासंभवात् । अकामेनापि तत्रास्मदुक्तनिर्वाहस्य समाश्रयणे तत्समानन्यायादत्रापि तस्यैवानुसर्तुमुचितत्वादिति । स्यादेतदेवं त्वं वा अहमस्मि भगवो देवते, अहं वै त्वमसीत्यत्र कथं पुरुषव्यवस्था त्वमहंशब्दयोरुभयोरपि श्रवणात् । उद्देश्यविषयकमेव युष्मदादिपदमुपपदत्वेन पाणिनिसूत्राभिप्रेतम् । यथा चोद्देश्यसमर्पकोपपदवशादेवात्र मध्यमोत्तमयोर्व्यवस्था सिध्यतीति चेत् । अस्त्वेवमिह समाधानं तथाऽपि तत्त्वमसीत्यत्र पुरुषव्यवस्था न घटते । तत्र त्वंपदयोगवत्तत्पदयोगस्यापि सत्त्वात् । तथा चासीतिवदस्तीति प्रथमपुरुषस्यापि प्रसङ्गः । नह्यत्रापि त्वंपदमुद्देश्यसमर्पकम् । येन त्वंपदमेव पुरुषनिमित्तं न तु तत्पदमपीति व्यवस्था स्यात्तथा च तत्त्वमसीतिनिरूपणावसरे भाष्यम्—नात्र किंचिदुद्दिश्य किमपिविधीयत इति । तस्मात्तत्त्वमस्तीति प्रसङ्गो दुर्वार इति । अत्रोच्यते—तत्त्वमसीत्यत्रापि त्वंपदार्थ उद्देश्य एव । तत-

श्रोद्देश्यविषयकयुष्मत्पदवशात्तत्र मध्यम एवेति न प्रथमपुरुष-प्रसङ्गः । नच भाष्यविरोधः । भाष्यस्य विधेयांशमात्रनिषेधपरतयोद्देश्यांशनिषेधकत्वाभावात् । तथा हि-नह्येवं भाष्याभिप्रायः । नात्र किंचिदुद्दिश्यते । न च किंचिद्विधीयत इति । अपि त्वेवमभिप्रायः । त्वंपदेन किंचिदुद्दिश्यत एव किंतूद्दिष्टे तत्र न किंचिदपि विधीयत इति कथमवगम्यत इति चेत्प्राप्तस्यैवोपसंहारत्वोपपादकभाष्येणैव विधेयांश एव निषिध्यत इत्यभिप्रायस्य व्यक्तत्वात् । अन्य आह त्वं राजाऽस्यहं राजाऽस्मीत्यादिवत्तादधीन्यादुपचारविवक्षया तत्त्वमसि सोऽहमस्मीत्यादिषु मध्यमोत्तमसामानाधिकरण्यानामसामञ्जस्यमिति । तदप्युपेक्षणीयमेव । लोकवेदयोश्चेतनपर्यन्तं देवमनुष्यादिव्यवहारबलेन जातिगुणशब्दवन्मुख्यस्यैव संभव उपचारकल्पनस्यान्याय्यत्वात् ॥ १६ ॥

हे आश्रितांचें पोषण करणाऱ्या देवा ! आपल्याला जसें अतींद्रिय पदार्थांचें व तत्त्वांचें ज्ञान आहे. तसें दुसऱ्या कोणासही नाहीं. आपण अद्वितीय आहांत. "याज्ञवल्क्याशिवाय दुसरा द्रष्टा नाहीं" (बृ०।३०।२०।२३) अशी श्रुति मी म्हणतों, हेंच समर्थन करिते. म्हणून मी आपल्यास एकर्षि म्हणतों. आपण सर्वांचे नियामक आहां म्हणजे सर्वांतर्यामी आहां. "जो पृथ्वीच्या अंतर्यामी राहून व जीवांच्या अंतर्यामीं राहून उभयतांचेंही नियमन करतो" (बृ० ३।७ म० ३ आणि ९) या श्रुतीचाच मी अनुवाद करीत आहें व आपल्यास 'यम'या विशेष नामानें संबोधित आहें. आपण आपल्या उपासकांच्या बुद्धीला उत्तम प्रकारची प्रेरणा करिता, यास्तव आपल्यास 'सूर्य' 'सविता' हीं नांवें उत्तम शोभतात. चतुर्मुख ब्रह्मदेवानें जे कांहीं पदार्थ उत्पन्न केले आहेत त्यांचे प्रेरक व चालक आपणच आहां. त्याच्या पुत्रांचे अंतर्यामी आपण आहां, एतदर्थ आपल्यास 'प्राजापत्य' ही संज्ञा मी देतों.

शिष्य—भगवन् ! येथें प्रजांचा पति असा प्रजापति शब्दाचा अर्थ करावा. विष्णूचें हें नांव आहे. "सर्वांच्या गर्भामध्यें राहून तेथें स्वव्यापार (गर्भस्थ जीवांचें पोषण, रक्षण इत्यादि व्यापार) करितो." असे महानारदीय (१।१) उपनिषदांत म्हटलें आहे.

सिद्धान्ती—ठीक आहे. चांगला अर्थ केलास. परमेश्वराचा उपासक म्हणतो हे पूषा, एकर्षे, यम, सूर्य, प्राजापत्य, आपले किरण, आपले उग्र प्रकाश-किरण आतां आवरून घे. ह्या किरणांचा संहार केला नाहींस तर (परत घेतले नाहींस तर) तुझ्या दिव्य स्वरूपाचें मला दर्शन होणार नाहीं. पण तुझ्या दर्शनाला योग्य जें तुझें प्रभारूपी तेज आहे तें मात्र सर्वांच्यासर्व प्रकट होऊं दे. कारण

मला तुझें वेदप्रसिद्ध स्वरूप पहावयाचें आहे. हें स्वरूप "आदित्य वर्ण असून अंधाराचेंही स्वरूप प्रत्यक्ष दाखविणारें आहे." असें श्वेताश्वतर उपनिषदांमध्यें[क] (३।८) प्रसिद्धच आहे. तैत्तिरीय श्रुति (३।६) म्हणते कीं 'आनंद हेंच ब्रह्माचें स्वरूप आहे.' सर्व भोग्य वस्तूपेक्षां अनंतपटीनें अतिशय सुख देणाऱ्या देवा! आपलें अति-मंगल स्वरूप, आपल्या सर्व-श्रेष्ठ सौंदर्यानें स्वकीय भक्तांस उत्तमप्रकारचें कल्याण प्राप्त करून देणारें, ध्यानाला कल्याण-कारक आश्रय देणारें, "शुभाश्रय" असणारें, असें हें आपलें दिव्य स्वरूप मला दिसेल असें कर. कारण तें कल्याणाचें कल्याण करणारें स्वरूप पाहण्याची मला भारी इच्छा आहे.

शिष्य—गुरुजी! येथें "पश्यामि" (मी पाहतों) असा प्रयोग झाला आहे हा ठीक आहे काय?

सिद्धान्ती—हा आर्ष प्रयोग आहे 'पश्येयम्' (मला पाहाणें शक्य असूं दे.) असें क्रियापद असावयास पाहिजे होतें.

पूर्वपक्षी—अहो! हा तुम्ही श्रुतीच्या अर्थाचा कसा अन्यायी अनर्थ करितां? पहा कीं कांहीं श्रुति असें सांगण्यास प्रवर्तल्या आहेत कीं, "जें तुझें अत्यंत कल्याण करणारें स्वरूप आहे. (जें तुझें मंगलतम स्वरूप आहे.)" "जो हा सूर्याच्या अंतरात्म्यांत राहून स्वतः हिरण्मय (सोन्याच्या वर्णाचा) पुरुष आहे" (छा० १।६।६) "हें सर्व परमेश्वरानें ओतप्रोत भरलेलें आहे." (ई० १) "हा जीवांचा स्वामी सर्व जगतांचेंही पालन करणारा परमात्मा" (म० ना० ११।३) "हा सर्वकर्ता आणि सर्वज्ञाता, (सुवास घेणारा) याचें ज्ञान, याचें बल व याचें कर्म स्वाभाविक आहे." (श्वे० श्व० ६।८) "त्या ह्या ब्रह्माचें नाम सत्य हें आहे." (छा० ८।३।४) "त्याचे नांव पापविनाशक आहे." (छां० १।६।७) इत्यादि अनेक श्रुतींमध्यें ब्रह्माला गुण आहेत. व ब्रह्माला शरीर आहे. सारांश, ब्रह्माला नामरूप आहे, असें कांहीं श्रुति विधान करितात आणि दुसऱ्या कांहीं श्रुति सर्व गुणांचा ब्रह्मासंबंधानें निषेध करितात. पहा "तें ब्रह्म निर्गुण आणि निर्मळ आहे." "तें सत्यरूप म्हणजे ज्ञानरूप आहे." (तै० २।१।१) "त्याला शरीर नाहीं किंवा कोणत्याही प्रकारचें क्षत पडत नाहीं." (ई० ८) "येथें अनेकत्व नाहींच आहे" (बृ० ४।४।१९) "तें निष्कल, विभागशून्य आणि निष्क्रिय आहे." (श्वे० ६।१९) "त्याला गोत्र नाहीं किंवा वर्णही नाहीं." (मुंडक १।१।६) इत्यादि ति ब्रह्मामध्यें गुणादि कांहीं नाहीं असा एक कंठानें गुणादिकांचा निषेध करितांहेत. आतां विधिनिषेधांमध्यें विरोध असेल तर विधिवाक्याचा (अस्तिप्रतिपादक वाक्याचा) अथवा निषेध वाक्याचा (नास्तिप्रतिपादक वाक्याचा) कोणाचा तरी बाध झाला पाहिजे, असा न्याय आहे. येथें तसाच प्रसंग आहे.

सिद्धान्ती—मग त्याचें काय ?

पूर्व०—ऐका. निषेध सांगणारीं वाक्यें आहेत तीं कोणत्या तरी वस्तूचें अस्तित्व पत्करून मागून त्या त्या गृहीत केलेल्या गोष्टींचा निषेध करतात. अर्थातच निषेधक वाक्यें बलवत्तर असतात. हा न्याय आहे. म्हणून ह्या बलवत्तर निषेध वाक्यांच्या सामर्थ्यानें ब्रह्माचे ठिकाणीं गुणादिक स्थापन करणारीं जीं वाक्यें आहेत तीं सर्व बाधितच होतात. आतां बाध्य असणारीं किंवा बाधित होणारीं वाक्यें मिथ्याच असलीं पाहिजेत. कारण ब्रह्मामध्यें गुण अथवा शरीर यांचें जें स्थापन केलें आहे तें अविद्यानामक दोषानें 'अग्राह्य' म्हणून मिथ्या झालें आहे. ब्रह्माचे ठिकाणीं गुणादिकांची स्थापना होते, ती अविद्येमुळें होते. एवंच गुणविधान करणारीं वाक्यें मिथ्या आहेत असें ठरलें. सारांश, ब्रह्म निर्गुण आहे, अशरीरी आहे, असे सिद्धान्त श्रुतींच्या आणि न्यायाच्या बलावर करून आम्ही या विरोधी वाक्यांची व्यवस्था लावितों. तुम्ही सगुण ब्रह्माचें प्रतिपादन करणारे आहां, तेव्हां ह्यीं परस्पर विरोधी वाक्यें प्राप्त झालीं असतां, एका वस्तूविषयींच गुणविधायक आणि निषेधक वाक्यें प्राप्त झालीं असतां, कसा काय निर्णय करितां, हें आम्हांस पहावयाचें आहे.

सिद्धान्ती—ही तुमची शंका व्यर्थ आहे. व तुम्ही काढलेला निष्कर्षही असत् (खोटा) आहे. पहा कीं विधि-वाक्यें आणि निषेधवाक्यें हीं जर भिन्न भिन्न विषयांचें प्रतिपादन करीत असतील, ज्या विषयाचें विधान केलें असेल त्याहून निराळ्या विषयाचा निषेध जर निषेध-वाक्यें करीत असतील, तर ह्या उभय वाक्यामध्यें कोणत्याही प्रकारचा विरोध किंवा विरोधाचा गंध सुद्धां राहत नाहीं. आणि म्हणून विधिवाक्यांचा बाध निषेध-वाक्यें करूं शकत नाहींत. पशुच्छाग-न्यायानें आम्ही म्हणतों हें न्याय्य आहे. यज्ञास पशु असावा असें कोठें सांगितलें असतें व कोठें छाग म्हणजे बकरा असावा असें सांगितलें असतें. पण या दोहोंत विरोध असत नाहीं. पशू म्हणजे यज्ञास योग्य (मेध्य) असा कोणताही चतुष्पाद प्राणी आणि बकरा हा विशेष प्राणी आहे. कित्येक यज्ञांमध्यें छागाची आवश्यकता सांगितली असते. म्हणून सामान्यत्वानें सांगितलेल्या पशुयागाचा निषेध होत नाहीं. उत्सर्गापवादाचा न्यायही असाच असतो. कांहीं सामान्य नियम सांगितला असतां विशेष ठिकाणीं अपवाद सांगितला असेल तर तो अपवाद सामान्य नियमाचा निषेध करीत नाहीं. शिवाय तुम्ही मोठ्या डौलानें 'ब्रह्म हें निर्गुणच आहे' असें म्हणतां तें श्रुतीला, युक्तीला व अनुभवाला प्रमाणही असत नाहीं. म्हणून तुमचा पक्ष स्वीकृत करण्यास योग्य नाहीं.

पूर्व०—याला आधार ?

सिद्धान्ती—ऐका. तत्त्वसार नामक ग्रंथांत म्हटलें आहे. "ब्रह्माचे गुण, विकार, शरीरभेद, कर्म, इत्यादि विषयीं जीं विधानें असतात व निषेध असतात, ते परस्पर-विरोधी होत नाहींत. कारण विधायक वाक्याचे विषय निराळे असतात आणि निषेधक वाक्यांचे विषयही निराळे असतात; म्हणून विधिवाक्यांचा बाध निषेधवाक्यें करूं शकत नाहींत."

असो; यापुढें परमेश्वराची उपासना करणारा भक्त 'अंतर्यामी परमेश्वर आपणच आहों' असें अनुसंधान ठेवून "हा जो पुरुष आहे. तो मी आहें." असें म्हणतो.

शिष्य—येथें असौ (हा) या शब्दाचा दोन वेळ उच्चार झाला आहे तो आदर (पूज्यभाव) उत्पन्न करण्यासाठींच झाला आहेना?

सिद्धान्ती—बरोबर! किंवा या शब्दांचा विभाग करून असा अर्थ करावा कीं, "जो हा प्रसिद्ध पुरुष आहे तो हा मी आहें." आतां जरी—

"पुरुष आणि प्रकृति हीं दोन्ही प्रधान-पुरुषेश्वर (प्रधानाचा व पुरुषाचा स्वामी असणारा) हाच आहे (म्हणजे परमेश्वरच पुरुष आणि प्रकृति हीं दोन प्रकारचीं रूपें घेतो) असें भगवद्गीतेच्या* तेराव्या अध्यायांतील १९ व्या श्लोकांत म्हटलें आहे.

या व इतर ठिकाणीं पुरुष शब्दाचा अर्थ जीव असा यद्यपि प्रसिद्ध आहे तथापि "त्या ह्या पुरुषानें हें सर्व जगत् पूर्ण केलें आहे." (श्वे० श्व० ३।९) इत्यादि श्रुतींनीं व सर्व वेदांमध्यें विद्यमान असलेल्या पुरुषसूक्तादिकांच्या मंत्रांनीं पुरुष याचा अर्थ 'तो प्रसिद्ध महापुरुषच' अभिप्रेत आहे. सारांश, पुरुष या शब्दानें या मंत्रांत परब्रह्माचाच उल्लेख झाला आहे.

पूर्वपक्षी—हें परमेश्वराचें आणि अहंपदानें निर्दिशित केलेल्या जीवाचें प्रक्रियेनें सामानाधिकरण्य कसें होईल? महापुरुष जो परमेश्वर तो जीवाहून अत्यंत भिन्न आहे. तेव्हां, सर्वथा परतंत्र असणारा जो जीव तो आपल्याला "मी स्वतंत्र असणारा व सर्व-स्वामी असणारा महापुरुष आहें" असें कसें म्हणेल? 'जीव हा परमेश्वराच्या शरीराचा एक भाग आहे' असा तुमचा सिद्धान्त आहे.

---

* या भाष्यकारांजवळ निराळीच भगवद्गीता होती असें दिसतें. यांचा पाठ "पुरुषं प्रकृतिं चैव प्रधानं पुरुषेश्वरः" असा आहे; पण प्रचलित प्रसिद्ध भगवद्गीतेमध्यें "पुरुषं प्रकृतिं चैव विध्यनादी उभावपि" असा पाठ सर्वसाधारण आहे. असें दुसरें एक पाठान्तर यानीं या उपनिषदाच्या पहिल्या मंत्राचें व्याख्यान करतांना उद्धृत केलें आहे. यावरून अशी बळकट शंका उत्पन्न होते कीं, सर्वपठित व सर्वमान्य गीतेतही पाठ-पाठान्तरें होतीं किंवा आहेत.

सिद्धान्ती—ही शंका व्यर्थ आहे. कारण येथें "मी" या शब्दानें जीवाच्या अंतर्यामीचा बोध करून घ्यावयाचा आहे; जीवाचा अंतर्यामी हाच परमेश्वर आहे, असें सांगावयाचें आहे. असा अर्थ केला म्हणजे ग्रंथाची संगति चांगली लागते.

पूर्वपक्षी—याप्रमाणें "मी" चा अर्थ अंतर्यामी परमेश्वर केला तर "सोऽस्मि" (तो आहें) असा प्रयोग, असें वाक्य, शुद्ध कसें असेल? 'त्याचा अंतर्यामी पुरुष आहें' असा प्रथम पुरुषी कर्तरिप्रयोग व्याकरणशास्त्राच्या सर्वथा विरुद्ध आहे.

सिद्धान्ती—"माझ्यामध्यें अंतर्यामी असणाऱ्या" इत्यादि निराळ्या शब्दांनीं स्थापित झालेला जो प्रत्यगात्मा (जीवाच्या अंतर्यामी असणारा परमेश्वर) त्याच्या संबंधानें प्रथम पुरुषी प्रयोग होणें असंभवनीय आहे, हें खरें; पण "माझ्या अंतर्यामामध्यें असणाऱ्या" पदानें स्थापित केलेला जो परमात्मा त्याच्या संबंधानें 'मी' हा शब्द उपयोजून तोच कर्ता केला म्हणजे प्रथम पुरुषी कर्तरिप्रयोग ठीकच जुळतो. महावैयाकरणकार पाणिनि यांनाही हा प्रयोग मान्य आहे. अस्मत्-अर्थाच्या कर्तरि वाक्यांत क्रियापद प्रथम पुरुषींच असावें असा त्यांचा नियम आहे. (पाणिनि सूत्र १।४।१०) सारांश, अंतर्यामी प्रत्यगात्म्याचा बोध जर अस्मत्-शब्दानें होत असेल (मी या शब्दानें होत असेल) तर तेथें प्रथम पुरुषच योग्य आहे.

पूर्वपक्षी—ठीक आहे. हा तुमचा अस्मत् शब्द अंतर्यामी आत्म्याच्या द्वारानें जर परमात्म्यापर्यंत जाऊन पोंहचत असेल, परमात्मा हाच जर त्याचा अर्थ होत असेल तर *प्रथम पुरुषाची "मी" ची, जीवाची निवृत्तिच झाली म्हणावयाची! (म्हणजे जीवाचें अस्तित्वच नाहींसें झालें म्हणावयाचें!) आम्ही अद्वैतवादी या पेक्षां जास्त काय मागतों? 'जीव सर्वथा नाहीं, एक ब्रह्म मात्र काय तें आहे.' हाच आमचा सिद्धान्त आहे; आणि तुम्हीही शेवटीं त्याच सिद्धान्ताचा स्वीकार करीत आहांत. ठीक आहे. उत्तम गोष्ट झाली!

सिद्धान्ती—असा अर्थाचा अनर्थ करूं नका. जीवामध्यें पुरुषोत्तमाचा प्रवेश झाला म्हणून जीवाची हानि झाली असें नाहीं. जीवामध्यें अधिकाचा, परमात्म्याचा प्रवेश झाला, इतकेंच काय तें. जीवाची हानि मुळींच झाली नाहीं. याच न्यायानें "तें तूं आहेस" इत्यादि महावाक्यांत 'असि' (आहेस) या मध्यमपुरुषाचा (द्वितीय पुरुषाचा) निर्वाह करावयाचा आहे. या वाक्यांत "त्वं" (तूं) या शब्दानें अभिमुख (प्रत्यक्ष) होणाऱ्या चैतन्य द्वारानें त्यामध्यें (जीवामध्यें) असणाऱ्या अंतर्यामीचा नामनिर्देश होतो. म्हणजे

---

* मराठी प्रथम पुरुषाला संस्कृतांत उत्तम पुरुष हें नांव आहे.

'तूं' मध्यें (जीवामध्यें) असणाऱ्या अंतर्यामीचा निर्देश होतो. हें म्हणणें सर्वांसच ग्राह्य असलें पाहिजे. कारण ह्या म्हणण्याला व असल्या प्रकारच्या प्रयोगाला पाणिनिसूत्राचा (१।४।१०५) आधार आहे. येथें तुम्हीं असें नाहीं म्हणणार कीं युष्मत् शब्दानें प्रत्यक्ष होणाऱ्या चैतन्य द्वारानें परमात्म्यापर्यंत जीवाला जातां येऊन तो जीव परमात्मा होतो आणि याप्रमाणें जीव हा पदार्थ नाहींसा होतो.

पूर्वपक्षी—"तत्त्वमसि, (तें तूं आहेस)" "सोऽहमस्मि" "(तो मी आहें)" इत्यादि वाक्यांमध्यें 'मीं, तूं' हे शब्द आपापला अर्थ सोडून देतात, म्हणजे जीव मिथ्या पदार्थ आहे असे सांगतात आणि 'भेदशून्य असें ज्ञानैकरूप ब्रह्ममात्र सत्य आहे,' हा या वाक्यांचा अर्थ आहे, असें प्रतिपादितात.

सिद्धान्ती—नाहीं. हें खरें नाहीं. पहा "तत्त्वमसि" "सोऽहमस्मि" इत्यादि वाक्यांमधील द्वितीय पुरुषीं व प्रथम पुरुषीं क्रियापदें असें स्पष्ट सांगतात कीं तूं आणि मी (जीवदशा) यांची निवृत्ति केव्हांही होत नाहीं. 'आहेस' व 'आहें' हीं क्रियापदें 'तूं' व 'मी' हे पदार्थ सत्य आहेत असें निर्बाधरीतीनें सिद्ध करितात, आणि याप्रमाणें तुमचें खंडन होतें. कारण 'तें तूं आहेस' या वाक्यांमधील ऐकणारा जो 'तूं' आणि "हा मी आहें" या वाक्याचें तात्त्विक अनुसंधान करणारा जो "मी" हे दोन्हीही काढून घेतले तर "आहेस" या क्रियापदाचा उद्देश्यच तुम्ही नाहींसा केल्यामुळें ज्याला बोध करावयाचा तो नाहींसा होतो व "आहें" या क्रियापदाचा उद्देश्य जो अनुसंधान करणारा विशिष्ट 'मीं' तोही तुमच्या या वाक्यार्थानें नाहींसा होतो. सारांश, तुमच्या वाक्यार्थानें कोणास बोधही होत नाहीं; व चिंतन करणाराही कोणी शिलक उरत नाहीं. म्हणून तुमचीं वाक्यें निरर्थक होतात.

पूर्वपक्षी—प्रस्तुतच्या वादविषयक वाक्यांमध्यें तूं आणि मी यांच्या संबंधानें जरी कांहीं एक बोलावयाचें नाहीं, जीवांच्या संबंधानें कांहीं एक बोलावयाचें नाहीं. तथापि या शब्दांचे उपपद-स्वरूपानें मात्र (मी 'तूं' या स्वरूपानें मात्र) वाक्यामध्यें अस्तित्व आहे म्हणून आमच्या पक्षामध्येंही (आम्ही केलेल्या वाक्यार्थामध्येंही) तूं आणि मीं या द्वितीय आणि उत्तम म्हणजे 'प्रथम पुरुषी' शब्दांची संपद्रूपता (यांना कल्पनेनें प्राप्त झालेली ब्रह्मस्थिति) आम्ही स्वीकारून यांस उद्देश्य करितोंच कीं नाहीं? मग हे संपद्रूपी 'मी व तूं' हे उद्देश्य ठरले व 'आहें' 'आहेस' हीं क्रियापदेंही योग्य ठरलीं.

सिद्धान्ती—तथापि या दोन्ही शब्दांनीं आपापले अर्थ प्रकट करण्याचें सामर्थ्य टाकून दिल्यामुळें ते निरर्थक होतात. आणि म्हणून आम्हीं केलेला जो अर्थ आहे, त्याचेंच स्वीकरण करणें योग्य होतें. कारण आम्ही या वादविषयक शब्दांचें प्रवृत्तिनिमित्त (अर्थबोध करविण्याचें सामर्थ्य) नाहींसें करित नाहीं.

संपद्रूपापेक्षां वाच्यार्थ नेहमीं श्रेष्ठच असतो. सारांश, तुमच्या पक्षानें केलेला वाक्यार्थ सर्वथा अयोग्य आहे. आणि आमचाच अर्थ स्वीकृत करणें अवश्य आहे.

दुसरा पूर्वपक्षी—वादाकरितां जीं आपण वाक्यें काढलीं आहेत त्यामध्यें जो 'पुरुष' शब्द आहे तो "पुरुषोत्तमाचा" (परमेश्वराचा) बोध करून घेण्याकरितां घातला नाहीं. तसा त्या शब्दाचा उपयोग अभिप्रेत असता तर 'परमेश्वर जो, तो मी आहें' या वाक्यांत उत्तम पुरुषाचा व परमेश्वर आणि मीं यांचें जें सामानाधिकरण्य होतें त्याचा, निर्वाह मुळींच लागत नाहीं. 'उत्तम पुरुष मीं आहें.' असा अर्थ तुम्हांसही इष्ट नाहीं. म्हणून आम्ही असें सुचवितों कीं 'पुरुष' शब्दानें परिशुद्ध जीवात्मता (मुक्त जीवाची स्थिति) हा अर्थ घेतला पाहिजे. असा अर्थ केला म्हणजे मुक्तस्थितीमध्यें दृश्य व प्राप्त होणारा जो भविष्यकालीन आकार म्हणजे सर्व तऱ्हेनें शुद्ध झालेला जीवात्मा, 'तो मी आहें.' असा अन्वय करून घेतला म्हणजे वाक्याचा अन्वय उत्तम किंवा सुसंगत होतो. आणि परिशुद्ध जीवात्मा तो मीं असें योग्य सामानाधिकरण्य व उत्तम पुरुषाचा (मीचा) निर्वाह होऊन सर्व वाक्यांची संगति उत्तम लागते.

सिद्धान्ती—हाही पक्ष ठीक नाहीं, कारण; तुमचा अर्थ "हा पुरुष मी आहें" या वाक्यासंबंधानें जरी ठीक लागतो, तथापि "तें तूं आहेस" या वाक्यांतील "तें" या पदाचा अर्थ करतांना अडचण पडावयाची ती पडतेच. म्हणजे 'तें' या पदाचा अर्थ ठीक करितां येत नाहीं. "हे देवते! तूं मीं आहेस किंवा मी तूं आहें" इत्यादि वाक्यांमध्यें 'तूं' या शब्दानें श्रेष्ठ देवतेचा बोध झाला म्हणजे तुम्ही केलेला अर्थ वाक्याच्या अन्वयाला जुळत नाहीं. ("हे देवते! तो परिशुद्ध जीवात्मा तूं आहेस." असें श्रेष्ठ देवतेच्या संबंधानें कोण विचारी पुरुष विधान करील?) म्हणून आम्ही केलेल्या व्यवस्थेचा आश्रय केला पाहिजे. म्हणजे तुमची इच्छा नसली तरीही आम्ही केलेल्या योग्य अर्थांचा स्वीकार तुम्हास 'तत्त्वमसि' या वाक्यांत करावा लागतो. याच न्यायानें 'तो पुरुष मी आहें' या वाक्यांतील शब्दांची व्यवस्था आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें कां करित नाहीं? आमचें म्हणणें योग्य व स्वीकार्य आहे.

दुसरा पूर्वपक्षी—"हे देवते! मीं तूं आहें?" किंवा "तूं मीं आहेस" या दोन्ही वाक्यांत तूं आणि मीं हे दोन्ही शब्द प्रत्यक्ष असल्यामुळें, हे वाक्यप्रयोग कोणत्या पुरुषीं आहेत, असें समजावयाचें? पाणीनीच्या सूत्राचा अभिप्राय तर असा आहे कीं, 'तूं' आणि 'मीं' हीं उपपदें उद्देश्याविषयींच म्हणजे ज्याच्याविषयीं कांहीं सांगावयाचें आहे, जो अस्तित्वांत असून क्रियेचा कर्ता आहे, त्याविषयीं मात्र उपयोजावीं.

सिद्धान्ती—ठीक आहे. उद्देश्याला समर्पण करणारीं 'मीं तूं' हीं उपपदें उद्देश्यदृष्टीनें ('मी' किंवा 'तूं' यांपैकीं ज्याच्या संबंधानें कांहीं सांगावयाचें

आहे, त्यास योग्य असा) उत्तम अथवा मध्यम पुरुषी प्रयोग उत्पन्न करतील. अर्थातच ही आमची व्यवस्था पाणीनीच्या सूत्राप्रमाणेंच होते.

दुसरा पूर्वपक्षी—आतांच्या ह्या वादवाक्यांत तुम्ही केलेला निर्वाह (समाधान, शंकानिवृत्ति) आम्ही कबूल करूं; पण 'तें तूं आहेस' या वाक्यांत पुरुष–व्यवस्था कांहींच होत नाहीं; कारण 'तें तूं आहेस' ह्या वाक्यांत 'तें' या शब्दाचाही अवतार आहे, आणि म्हणून 'आहेस' याप्रमाणेंच 'आहे' या क्रियापदयोजनेचा प्रसंग येतो. येथेंसुद्धां तुम्हांस असें म्हणतां येणार नाहीं कीं, वाक्यांत 'तूं' हाच उद्देश्यसमर्पक शब्द आहे. म्हणजे "प्रयोगकारण 'तूं' च आहे, 'तो' नाहीं, असें म्हणतां येत नसल्यामुळें प्रयोगाचा पुरुष येथें ठरत नाहीं. "येथें कोणाला उद्देशून कांहींही सांगावयाचें नाहीं" असें 'तत्त्वमसि' या वाक्यावर भाष्य करितांना म्हटलें आहे. म्हणून 'तो तूं आहे' असा तृतीय पुरुषी वाक्यप्रयोग करण्याचा प्रसंग अगतिकत्वानें येतो. सारांश, उद्देश्य अनिश्चित असल्यामुळें प्रयोगाचा पुरुष अनिश्चित राहतो व सर्वत्र घोंटाळा उडतो.

सिद्धान्ती—नाहीं. असा घोंटाळा करण्याचें कारण नाहीं. पहाः—'तें तूं आहेस' या वाक्यांतही 'तूं' हाच उद्देश्य आहे, आणि उद्देश्यविषयक 'त्वं (तूं)' हें पद प्रत्यक्ष असल्यामुळें या वाक्याचा प्रयोग द्वितीय पुरुषीच झाला पाहिजे. तृतीय पुरुषाला येथें अवसरच नाहीं. तुम्हीं जो भाष्याचा अवतार केला आहे. तेथेंही तुम्ही दाखविलेला विरोध प्राप्त होत नाहीं. कारण भाष्यामध्यें कसल्याही विधेयांशाचा मात्र सर्वथा निषेध केला आहे. उद्देश्य वस्तूचा निषेध भाष्यामध्यें मुळींच केला नाहीं. शिवाय, तुम्ही केलेला भाष्याचा अर्थही चुकला आहे. भाष्याचें हृद्गतच तुम्हांस कळलें नाहीं. ऐका आम्ही काय म्हणतों तें, 'येथें कोणासही उद्देशून कसलेंही विधान केलें नाहीं' असें सांगण्याचा भाष्यकारांचा उद्देशच नाहीं. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, 'तूं' या शब्दानें कोणास तरी उद्देशून बोलावयाचें आहे. पण उद्दिष्टाच्या संबंधानें कसलेंही विधान करावयाचें नाहीं. इतकाच काय तो त्यांचा अभिप्राय आहे.

पूर्वपक्षी—हें कशावरून ?

सिद्धान्ती—प्रकरणानुरोधानें प्राप्त होणाऱ्या उद्देश्याच्या संबंधानें (कसलेंही विधान करावयाचें नाहीं) असा निषेधाचा भाग आहे व हा निषेध उपसंहाराचें प्रतिपादन करणाऱ्या भाष्यानें मात्र केला आहे. येथील अभिप्राय स्वच्छ व स्पष्ट आहे. म्हणून तुमचा पक्ष मुळींच ग्राह्य नाहीं.

तिसरा पूर्वपक्षी—'तूं राजा आहेस' 'मी राजा आहें' इत्यादि वाक्यांत जशी 'राजाच्या स्वाधीन आपण आहों' हा अर्थ प्रकट करणारी लक्षणा सांगण्याच्या उद्देशानें आपण 'मी राजा आहें' इत्यादि वाक्यें बोलत असतों,

त्या प्रमाणेंच 'तें तूं आहेस' 'तो मी आहें' इत्यादि वाक्यांत जीं सामानाधिकरण्यें झालीं आहेत. व ज्यांवरून 'त्याच्या (परमेश्वराच्या) स्वाधीन 'तूं आहेस' 'त्याच्याच स्वाधीन मी आहें.' असे अर्थ होतात तीं सामानाधिकरण्येंच असमंजस आहेत. 'परमेश्वराधीन मी आहें' असें ज्ञान असतां लक्षणेनें 'मीच परमेश्वर आहें' असें लक्षणामूलक सामानाधिकरण्य करणें हें अप्रयोजक होय.

सिद्धान्ती—हें तुमचें स्पष्टीकरणच असमंजस आहे आणि म्हणून स्वीकारण्याला योग्य नाहीं. वेदामध्यें आणि व्यवहारामध्यें देव मनुष्यादि सजीव वस्तूंचा व्यवहार चेतनयुक्त असल्यामुळें (सर्व जीवांना ज्ञान आहे असें सर्वानुमतानें व अनुभवानें ठरलें असल्यामुळें) जाति व गुण हे अर्थ दाखविणाऱ्या शब्दाप्रमाणेंच 'तूं' 'मीं' आणि 'तें' इत्यादि उपपदांचा मुख्यार्थच घेतला पाहिजे. येथें लक्षणापर अर्थ करणें अन्याय्य आहे.* ॥ १६ ॥

मंत्र सतरावा.

एवं परावरतत्त्वविवेकं निःश्रेयससाधनभूतभक्तियोगं तन्निष्ठस्यानुसंधेयमन्त्रविस्तार इत्यादिशास्त्रैः प्रोक्षणादिभिः समिदादिकमिव परिशुद्धस्वरूपयाथात्म्यज्ञानेन संस्मृत्याऽऽत्महविः समर्पणीयमित्युक्तत्वादिहापि शरीरेन्द्रियादिभ्योऽतिरिक्तं स्वात्मानं प्रथमं विशोध्य तं ब्रह्मणि समर्प्य स्वाधिकारानुगुणमर्थयते—

सिद्धान्ती—याप्रमाणें श्रेष्ठ आणि कनिष्ठ प्रकारच्या तत्त्वांचा विवेक, मोक्षाला साधन होणारा भक्तियोग, भक्तिनिष्ठ भक्तानें चिंतावयाच्या मंत्रांचा विस्तार, इत्यादि शास्त्रांच्या साहाय्यानें शुद्ध आणि निर्मळ आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होतें. समंत्रक प्रोक्षण—विधि केला असतां समिदादि यज्ञीय पदार्थ शुद्ध व संस्कृत होतात, त्याप्रमाणें आपला जीवात्मा वरील ज्ञान—भक्ति—आदि शास्त्रीय साधानांनीं शुद्ध होतो. हें शुद्ध आत्म्याचें यथार्थ ज्ञान झाल्यावर, जीवाला असें स्मरण होतें

---

* येथील वादप्रतिवाद व्याकरणात्मक व वाक्यार्थनिर्णयशास्त्रात्मक आहे. या एका गोष्टीवरूनच वाक्याची छाननी पूर्वी कशी होत असे व स्वपक्षमंडनार्थ व परपक्षखंडनार्थ व्याकरणाच्या जोरावर कशी 'भवति न भवति' होत असे, हें स्पष्ट दिसतें. 'तें तूं आहेस' हें महावाक्य सर्वसंमत आहे. याचा अर्थ कसा करावयाचा हा प्रश्न आहे. निरनिराळे आचार्य आपल्या सिद्धान्तास अनुकूल होईल असा प्रयत्न करितात. असो; हा वाद 'रुक्ष' असूनही मनोरंजक आहे, हें काळजीपूर्वक वाचणाऱ्यांस सहज समजेल.

कीं, 'आपल्याही आत्म्याचो आहुति समर्पण करावी' असें शास्त्र आहे. हाच अर्थ मनांत आणून इंद्रियादिकांच्या पलीकडे असणाऱ्या जीवात्म्याला प्रथमतः शुद्ध करून ज्ञानयोगी भक्त त्याला ब्रह्मसमर्पण करितो आणि आपल्या अधिकारानुरूप वरील भक्त परमेश्वराची प्रार्थना करतो, अशा अर्थाचा हा मंत्र आहे.

'भोक्ता भोग्यं प्रेरितारं च मत्वा' [श्वे० १।१२] इत्यादिश्रुत्यन्तरप्रसिद्धचिदचिदीश्वरतत्त्वत्रयमिहाऽपि द्रष्टव्यम्। वायुः विद्याकर्मानुगुणभगवत्संकल्पवशेन तत्र तत्र गन्तृत्वाद्वा वायुः। अनेन जीवस्याणुपरिमाणत्वं परमात्माधीनत्वं च सिध्यति। वा गतिगन्धनयोरिति धातुः। निलयरहितत्वात्। क्वचिदपि व्यवस्थितत्वाभावाच्चानिलः। अमृतम्। प्रीयमाणोऽपि देहसंताने स्वयममृतं स्वरूपतो धर्मतश्चाविनाशीत्यर्थः। 'अविनाशी वा अरेऽयमात्माऽनुच्छित्तिधर्मा' [बृ० ४।५।१४] 'न विज्ञातेर्विपरिलोपो विद्यते' [बृ० ४।३।३०] न विद्यत उच्छित्तिर्विनाशो यस्य सोऽनुच्छित्तिर्नित्य इत्यर्थः। अनुच्छित्तिर्धर्मो यस्यासावनुच्छित्तिधर्मेति पुनर्बहुव्रीहिः। नित्यज्ञानवानिति भावः। आहुश्च यामुनमुनयः—

तदेवं चित्स्वभावस्य पुंसः स्वाभाविकी चितिः।
नानापदार्थसंसर्गात्तत्तच्चित्तत्वमश्नुते॥ [आ०सि०पृष्ठ४८]

इति। तदमृतत्वम् 'अपहतपाप्मा विरजो विमृत्युः।' [छा०८ १।५] इति श्रुतेः। अनिलममृतमिति पुल्लिङ्गत्वेन विवरणीयं वायुरिति पुल्लिङ्गत्वेनोपक्रमात्। अत्र विशिष्टवृत्त्या योगतो वा परमात्मविषयत्वं न शङ्कनीयम्। नश्वरदेहस्यानन्तरवचनेन तद्व्यावृत्त्या प्रत्यगात्मपरत्वस्यैव न्याय्यत्वात्। 'क्षरं प्रधानममृताक्षरं हरः क्षरात्मानावीशते देव एकः।' [श्वे०१।१०] इति श्रुतावमृतशब्दस्य जीवे प्रयोगात्। स्वभोग्यतया प्रधानं हरतीति हरो जीव इत्यर्थः। एवं प्रत्यगात्मनोऽमृतत्वमभिधाय तच्छरीरस्य मृतत्वमवश्यमित्याह—अथेदं भस्मान्तं शरीरमिति। प्रकृतादर्थादर्थान्तरविवक्षायामथशब्दः। इदं शरीरमिति विशेष्यमीश्वरशरीरव्यवच्छेदार्थम्। कर्मवश्यशरीरं भस्मान्तमित्यर्थः।

ब्रह्मादिषु प्रलीनेषु नष्टे स्थावरजङ्गमे।
एकस्तिष्ठति सर्वात्मा स तु नारायणोऽव्ययः॥

इत्युक्तेः। भस्मशब्दो दाहाख्यसंस्कारपरः सन्खननादेरप्युपलक्षकः। अत्राऽऽत्मशरीरयोरमृतत्वमृतत्वोक्त्या भेदः समर्थ्यते।

रसनादिसेवया शरीरस्य नित्यत्वसंदेहोऽपाक्रियते । स्वदेहवैराग्यं कार्यमिति च सूच्यते शीघ्रं मोक्षोपाये प्रवर्तितव्यमित्यादिकं द्योत्यते । एवं चिदचिद्विवेकमुक्त्वा प्रेरितारं महापुरुषं प्रणवेनोपादत्ते—ॐमिति । उक्तं च योगानुशासने । 'क्लेशकर्मविपाकाशयैः परामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः । तस्य वाचकः प्रणवः' । आह च सर्वज्ञो महादेवः—

ओमित्येवं सदा विप्राः पठध्वं ध्यात केशवम् ।

इति द्रष्टव्यम् । यद्वा शरीरमात्मानं च विविच्य विविक्तमात्मानमोंकारवाच्ये परमपुरुषे समर्पयत्योमिति । प्रणवस्याऽऽत्मसमर्पणपरत्वमोमित्यात्मानं युञ्जीत । 'प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते । अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ।' [मु० २।२।४] इत्यादिषु प्रसिद्धम् । अथ क्रतुरूपिणं विष्णुं ज्ञानयज्ञगोचरमभिमुखीकुर्वंस्तदनुग्रहं प्रार्थयते—क्रतो स्मर क्रतो ज्योतिष्टोमादिक्रत्वात्मक । अहं क्रतुरहं यज्ञ इति वचनात् । यज्ञः पञ्चमहायज्ञात्मक इत्यर्थः । स्मर स्मरणानुग्रहया बुद्ध्या विषयीकुरु ।

अहं स्मरामि मद्भक्तं नयामि परमां गतिम् ।

[इति] भगवद्वचनम् । अत्र स्मरामि नयामीति पदद्वयस्य क्रतो स्मराग्ने नयेति प्रार्थनाद्वयापेक्षया प्रतिवचनत्वावगमात् । कृतं स्मर यत्कृतं यत्किंचिदानुकूल्यमनुसंधाय कृतज्ञस्त्वं मां रक्षेति वा । एतावदन्तं त्वकृत्यतयाऽऽनुकूल्यं प्रतिसंधाय त्वमेव शेषपूरणं कुर्विति भावः । उक्तार्थं आदरातिशयात्क्रतो स्मर कृतं स्मरेत्यावृत्तिः ॥ १७ ॥

" भोग—भोक्ता जीव, भोक्त्याचे भोग्य विषय हें जगत्, आणि उभयतांच्याही व्यापाराला प्रेरणा करणारा परमेश्वर, हें सर्व परमार्थतः भिन्नच आहे असें मानून " (श्वेता० १।१२) इत्यादि अन्य श्रुतींमध्यें प्रसिद्ध असलेलें चित्, अचित् आणि ईश्वर हें तत्त्वत्रय (हीं तीन तत्त्वें) येथेंही सांगितलें आहे. पहा कीं, वायु म्हणजे विद्या आणि कर्म त्यांस अनुगुण असणारी (ज्ञान आणि कर्म या द्वयीवरून ठरणारी) किंवा भगवत्—संकल्पाला वश होऊन (भगवंताच्या तंत्रानें चालणारी), वायुदेवताही जिकडे तिकडे जाते, जसा भगवत्संकल्प असेल, तसतसा व्यापार करिते; म्हणून त्या देवतेला वायु म्हणतात. या एका शब्दाच्या अर्थानेंच जीव हा अणुपरिमाण आहे (अणु एवढा आहे) व परमेश्वराधीन आहे असें ठरतें.

शिष्य—तें कसें ?

गुरु०—येथें 'वायु' शब्दानें 'जीवात्मा' हा अर्थ समजावयाचा. वायु सर्व पदार्थांच्या आंत बाहेर असूं शकतो; तसाच जीवात्मा आहे व तो वाटेल तेवढया लहान वस्तुरूपी शरीरांत राहतो, म्हणून तो अणुपरिमाण झाला व भगवानाच्या इच्छेनुसार शरीर धारण करितो, म्हणून पराधीन झाला. समजलें ?

शिष्य—'गुरुजी ! वा' याचा अर्थ गतीप्रमाणेंच गंध वाहणारा असा आहे. येथेंही हे दोन अर्थ आपण घेतले आहेतना ?

सिद्धान्ती—होय. वायुप्रमाणें गंधही सर्वगामीच आहे. निलय म्हणजें घर किंवा राहण्याचें स्थान. या घराचा अभाव आहे म्हणून, कायमचें राहण्याचें ठिकाणच नाहीं म्हणून, वायूला अनिल अशी संज्ञा देतात. जीवात्म्याची हीच स्थिति आहे. याला तरी कायमचें बिऱ्हाड कोठें आहे ? भगवत्संकल्पानुसार किंवा संचितानुसार हाही सदैव भ्रमण करीत असतो. वायु स्वरूपतः सुखकर असतो तसाच जीवात्माही स्वरूपानें सुखकर आहे हें आपल्याला देहापासून अथवा पुत्रापासून होणाऱ्या आनंदानें स्पष्ट समजतें. वायूप्रमाणेंच जीवात्मा हा धर्मतः अविनाशी आहे म्हणजे विश्रांत वायु नाहीं व जीव नाहीं अशी स्थितिच नसते, म्हणून वायूला व जीवात्म्याला 'अमृत' असें येथें म्हटलें आहे. "अरे, हा आत्मा अविनाशी आहे. आणि याच्या गुणधर्मांचा उच्छेद केव्हांही होत नाहीं." (बृहदा० ४।५।१४) "विज्ञानाचा लोप केव्हांही होत नाहीं." (बृ० ४।३।३०) ह्या श्रुति आत्मा अविनाशी आहे, हें अधिकारपूर्वक वाणीनें सांगतात. असो; ज्याचा केव्हांही विनाश होत नाहीं, जो नित्य आहे, विनाश हा ज्याचा धर्मच नव्हे, त्याला अविनाशी असें श्रुति म्हणतात. तसेंच त्याचें ज्ञानही नित्य आहे म्हणजे जीवात्मा नित्य ज्ञानी आहे. यामुनाचार्य म्हणतात— "ज्ञान हाच मुख्य धर्म आहे, स्वभावसिद्ध धर्म आहे; पुरुषाची नैसर्गिक स्थिति म्हटली म्हणजे त्याचें ज्ञान होय. अनेक पदार्थांच्या संसर्गानें जीवाच्या चैतन्याला त्या त्या पदार्थांच्या अनुरूप ज्ञानप्राप्ति होते." (आत्मसिद्धि पृष्ठ ४८.) हें वर्णन जीवात्म्याच्या अमृतत्वासंबंधाचें झालें.

"हा आत्मा पापविमुक्त, निर्मळ आणि मृत्यु-शून्य आहे" (छां० ८।१।५) या श्रुतीवरून जीवात्मा स्वरूपतः शुद्ध आहे असें सिद्ध होतें.

शिष्य—भगवन्! अनिल, अमृत, इत्यादि शब्द नपुंसकलिंगी आहेत ना ? मग येथेंच हे पुल्लिंगी समजावयाचें कीं काय ?

सिद्धान्ती—होय. कारण वायु या पुल्लिंगी शब्दानें वाक्याला आरंभ झाला आहे; आणि अनिल आणि अमृत हे दोन्ही शब्द वायूची विशेषणें आहेत.

पूर्वपक्षी—हें ठीक आहे; पण, वायु हा 'अमर' किंवा 'अविनाशी' आहे असें स्वाभाविक अर्थानें प्रसिद्ध नाहीं म्हणून, 'जीवात्मविषयपर' असा जो

वायु शब्दाचा अर्थ तुम्ही करीत आहांत तो ठीक नाहीं, असें मला वाटतें. कांहीं विशेषवृत्तीनें किंवा शब्दव्युत्पत्तीनें 'वायु' शब्दाचा परमात्मपर अर्थ करितां येईल. तेव्हां येथें 'वायु' शब्द जीवात्मपर न लावितां परमात्मपर लावावा.

सिद्धान्ती—अगदीं अयोग्य! हें होणें शक्यच नाहीं. कारण; 'अमृत' इत्यादि शब्दांच्या पुढें नश्वर देहाचा साक्षात् व लागलाच उल्लेख आहे; अर्थातच या योगानें परमात्म्याची व्यावृत्ति होत आहे. नश्वरदेहाच्या उल्लेखानें परमात्मा वेगळाच काढला गेला आहे. परमात्म्याला नश्वर शरीर नाहीं हें सिद्ध आहे. असो; प्रत्यगात्म्याशिवाय दुसरा अविनाशी पदार्थच नाहीं, म्हणून वायु आदि शब्दांचा जीवात्मपरच अर्थ घेतला पाहिजे. "प्रधान" क्षर आहे (विनाशी आहे) हर (शंकरादिदेव—जीवात्मे) अमर आणि अक्षर आहेत; क्षर आणि अक्षर या दोघांचाही स्वामी एकच देव आहे." (श्वे० १।१०) या श्रुतीमध्यें जीवाला अमृत शब्दात्मक विशेषण उपयोजिलें आहे. 'प्रधान (प्रकृति) भोग्य म्हणजे भोगाचा विषय आहे. आणि याचें हरण 'हर' म्हणजे जीव करितो. अर्थातच प्रत्यगात्मा अमर आहे. वरील श्रुतीवरून त्याचें शरीर मर्त्य म्हणजे विनाशी असलें पाहिजे, हें निश्चित होतें. हा अभिप्राय मनांत आणून भस्म होणारें शरीर' असे शब्द या प्रार्थनारूपी मंत्रामध्यें भक्तानें योजिले आहेत.

शिष्य—भगवन्! मंत्रामध्यें जो 'अथ' शब्द आहे तो असें दाखवितो का कीं प्रस्तुत अर्थाचा विषय संपून निराळा दुसरा विषय सांगावयाचा आहे?

सिद्धान्ती—होय. आत्मपर प्रवचन संपून येथून शरीरपर विवेचनाला प्रारंभ झाला असें 'अथ' दाखवितो. 'हें शरीर' असे शब्द आहेत म्हणून विशेष शरीराचा बोध करून तें विनाशी शरीर अक्षर—शरीरी ईश्वराचें नव्हे, असें सांगण्याकरितां 'हें' हा शब्द ठेविला आहे. तात्पर्य, कर्माला वश करणारें शरीर हा अर्थ येथें इष्ट आहे. ही गोष्ट सर्व प्रसिद्धच आहे कीं, आपलें कर्मजन्य शरीर भस्मीभूत होतें. म्हणून जीवांचें शरीर असा अर्थ इष्ट आहे. म्हटलें आहे:—

'ब्रह्मदेवादि सर्व स्थावर—जंगम पदार्थ प्रलयकालीं नष्ट झाले तरी सर्वांचा आत्मा जो अव्यय नारायण तो एकीएक मात्र नित्यत्वानें स्थित असतो.'

येथें भस्म शब्द आहे त्याचा अर्थ नुसता जाळून टाकणारा संस्कार असाच घ्यावयाचा नाहीं, तर पुरून टाकणारा, (नाहींसें करणारा संस्कार) अशा अर्थपरही भस्म शब्द आहे. असो; येथें जीवात्मा अमर आहे, पण त्याचें शरीर मर्त्य आहे, हें स्पष्ट सांगितलें आहे; म्हणून उभयतांमध्यें भेद आहे, असें निश्चित होतें. तसेंच, अन्नपानादिकांचें सेवन शरीर—रक्षणासाठीं नित्य करावें लागतें हें लोकप्रसिद्ध आहे. यावरून 'शरीर नित्य आहे कीं काय?' या शंकेचेंही येथें आपोआप निवारण होतें.

शिष्य—तसेंच हें भस्मीभूत होणारें शरीर अनित्य आहे म्हणून आपण त्याच्या संबंधानें विरक्त असावें, असाही विधि सुचविला जातो आणि तें अनित्य आहे म्हणून आपण जीवांनीं मोक्षाविषयीं शीघ्र उपाय तत्परतेनें केले पाहिजेत, इत्यादि अभिप्रायही स्पष्ट होतात.

सिद्धान्ती—वाहवा! श्रुतींस जो इष्ट अभिप्राय आहे तोच तूं सांगितलास! असो; याप्रमाणें ज्ञानी व नित्य जीव आणि अज्ञानी व अनित्य शरीर यांच्यामधील भेद स्पष्ट सांगून या उभयतांचाही प्रेरक व नियंता जो महापुरुष त्याचा अवतार ॐ या प्रणवाक्षरानें केला आहे. योग-शास्त्रामध्यें सांगितलें आहेः—"क्लेश, कर्म, कर्मफल, शरीर, इत्यादि ज्याला मुळींच स्पर्श करूं शकत नाहींत तो पुरुषोत्तम ईश्वर होय. ॐ हा त्याचा वाचक शब्द आहे." सर्वज्ञ महादेवही म्हणतातः—

"विप्रहो! सदैव ॐकाराचा पाठ करित जा आणि केशवाचें ध्यान करित जा."

शिष्य—भगवन्! शरीर आणि आत्मा यांचा विवेक करून शरीर-भिन्न जो आत्मा, तो स्वतः आपणाला ॐकार शब्दानें ओळखितां येणाऱ्या परम पुरुषाचे चरणीं 'ॐम्' असा उच्चार करून समर्पण करितो, असा अर्थ होणार नाहीं काय?

सिद्धान्ती—उत्तम! प्रणववाच्य महापुरुषाला जीवात्मसमर्पण करून घेण्याची योग्यताच आहे. असें मनांत ठेवून त्याच्याशीं आपल्या आत्म्याचा 'ॐम्' या मंत्रानें योग करावा. पहाः-"ॐकार हें धनुष्य आहे, आपला जीवात्मा हा एक बाण आहे आणि ब्रह्म हें लक्ष्य (ज्याच्यावर नेम धरावयाचा तें) आहे. म्हणून प्रत्येक पुरुषानें सावधपणानें त्या ब्रह्माचा वेध करावा. बाण जसा लक्ष्याप्रत जाऊन तेथें राहतो, तशी आपल्यास (जीवात्म्यास) ब्रह्ममय स्थिति प्राप्त होईल" (मुं० २।२।४) इत्यादि श्रुतीमध्यें हा सिद्धान्त प्रसिद्धच आहे.

असो, आतां यज्ञरूपी जो विष्णु तो ज्ञानयज्ञाला मात्र गोचर आहे, हें ध्यानांत आणून व ह्या विष्णूला अभिमुख होऊन ज्ञानी भक्त त्याच्या अनुग्रहासाठीं प्रार्थना करितो; 'हे यज्ञस्वरूपा, ज्योतिष्टोमादियज्ञात्मका!!'

शिष्य—'मी क्रतु आहें' 'मी यज्ञ आहें' अशीं वचनें भगवद्गीतेंत आहेत; यांवरूनच 'क्रतु' शब्दाचा अर्थ 'विष्णु' असा होतो, हें सिद्ध होतें. 'यज्ञ' या शब्दानें पंचमहायज्ञात्मक विष्णु आहे, असेंही ठरतें. होयना?

सिद्धान्ती—बरोबर! या यज्ञात्मक विष्णूनें आपल्यावर स्मरणाचा अनुग्रह करून त्या स्मरणाचा विषय आपण असावें, आपलें स्मरण यज्ञात्मक

श्रीविष्णूस व्हावें, अशी या मंत्रामध्यें भक्ताची प्रार्थना आहे. भगवानानेंही म्हटलें आहेः—

" मला माझ्या भक्तांचें स्मरण असतें आणि मी त्यांस परमगतीला नेतों, मोक्ष देतों. "

येथें ' स्मरण करणें ' आणि ' नेणें ' हे दोन क्रियाशब्द आहेत म्हणून ' हे विष्णो ! माझें स्मरण कर, ' ' हे अग्ने ! मला घेऊन जा, ' इत्यादि ज्या दोन प्रार्थना आहेत त्यांना अनुलक्षितात. म्हणजे ' ह्या दोन प्रार्थना लक्षांत ठेवून मी माझ्या भक्तांचें स्मरण करितों आणि त्यांस मोक्षपुरीमध्यें नेतों ' असा भगवानानीं आशीर्वाद दिला आहे. तसेंच, येथें दुसराही एक सुंदर अर्थ होतो तो असाः— भक्तानें येथें देवाची प्रार्थना केली आहे कीं "जें काय मीं थोडें बहुत सत्कर्म केलें असेल तें ध्यानांत ठेवून हे कृतज्ञ (केलेलें जाणणाऱ्या) देवा ! तूं माझें संरक्षण कर. आम्हीं जें काय सत्कर्म करितों तें तुला ठाऊकच आहे. म्हणून हा कालपर्यंत तुला अर्पण केलेलीं आमचीं सत्कृत्यें ध्यानांत ठेवून जें काय आणखी हवें असेल तें उणें पुरें करून घे आणि आम्हांस मोक्षस्थानाला देवयान मार्गानें ने.'

शिष्य—या मंत्रांत तीन वेळ ' देवा ! स्मरण कर ' अशी पुनरावृत्ति केली आहे, ती केवळ अतिशय आदर दाखविण्याकरितां केली आहे असेंच ना ?

सिद्धान्ती—होय. आतां अठराव्या मंत्राचा, या उपनिषदांतील शेवटल्या मंत्राचा, अर्थ समजून घे. ॥ १७ ॥

मंत्र अठरावा.

बृहदारण्यके पञ्चमेऽध्याये यदा वै पुरुषोऽस्माल्लोकात्प्रैति स वायुमागच्छति [१०।१] इत्यादिनाऽर्चिरादिकं पन्थानमुपदिश्य पञ्चादध्यायावसाने हिरण्मयेन पात्रेणेत्याद्याश्चत्वारो मन्त्राः क्रमेण पठिताः । अग्नेऽग्निशरीरक 'यस्याग्निः शरीरम्' । इति श्रुतेः । यद्वा साक्षादप्यविरोधं जैमिनिः [ब्र० सू० १।२।२८] अग्रं नयतीत्यग्निः अग्रनयनादिगुणयुक्त नय प्रवर्तयेत्यर्थः । सुपथा शोभनेन मार्गेणार्चिरादिना ।

अर्चिरहःसितपक्षानुदगयनाब्दौ च मारुतार्केन्दून् ।
अपि वैद्युतवरुणेन्द्रः जापतीनातिवाहिकानाहुः ॥[वरदमिश्रः] ॥

इत्यभियुक्तसंगृहीतेन मार्गेणेति भावः । राये धनाय ब्रह्मणः प्राप्यत्वाद्ब्रह्मैव सुस्थिरमनन्तधनं तस्मै हिरण्मयपुरुषाय त्वत्प्राप्तय

इति भावः। अस्माननन्यप्रयोजनान्। अनन्यगतींश्चेत्यर्थः। न केवलं मामपि त्वनुबन्धिजनानपीति बहुवचनस्याभिप्रायः। देव मम बुद्धौ द्योतमान। 'तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये।' [श्वे० ६।१८] इति श्रुतेः। विश्वानि वयुनानि। चतुर्विधपुरुषार्थोपायान्यथावद्विद्वांस्त्वमस्मान्नेतुमर्हसीति भावः। 'यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै, [श्वे० ६।१८] इति श्रुतेरिति भावः। मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्य इति मन्त्रगतं मुमुक्षुपदं विवृण्वन्नाह—युयोध्यस्मज्जुहुराणमेन इति। हुर्छा कौटिल्ये। जुहुराणं कुटिलं बन्धात्मकमित्यर्थः। एनः। अकृत्यकरणकृत्याकरणादिरूपं त्वदुपासनोत्पत्तिप्रतिबन्धमित्यर्थः। त्वत्प्राप्तिप्रतिबन्धकमिति वा। एन इति जात्यभिप्रायकम्। अस्मदस्मत्तः। युयोधि पृथक्कुरु। एतावदेव याचे त्वां जुहुराणमेनोऽस्मत्तः प्रथमं वियोजयेति तत्पश्चाद्यथामनोरथं विनाशय पुरुषान्तरे संक्रामय वा न तत्रास्माकं निर्बन्ध इति भावः। भूयिष्ठाम्। अनन्यगतित्वेनाऽऽवृत्तितो भूयसीम्। नमउक्तिं। ते। आप्तकामतया निरुपाधिकस्वामितया च नमउक्तिम्। निरपेक्षाय ते विधेम विदध्महे। हेऽग्ने देव विश्वानि वयुनानि विद्वांस्त्वं जुहुराणमेनोऽस्मत्तो युयोधि सुपथाऽस्मान्राये नय वयं ते भूयिष्ठां नमउक्तिं विधेमेत्यन्वयः। नित्याञ्जलिपुटा हृष्टा नम इत्येवंवादिनो भवाम इति भावः॥ १८॥

सिद्धान्ती—बृहदारण्यकाच्या पांचव्या अध्यायामध्यें "ज्या वेळेला जीवात्मा हा लोक सोडून जातो, तेव्हां तो वायु लोकांमध्यें येतो." (१०।१) इत्यादि अर्थपूर्ण मंत्रानें अर्चिरादि मार्ग (देवयानाचा मार्ग) सांगितला आहे. नंतर अध्यायाच्या शेवटीं "हिरण्मय पात्रानें" इत्यादि चार मंत्र क्रमानें पठित केले आहेत. या मंत्रांचा क्रम लक्षांत ठेवून, हा मंत्र अवतीर्ण केला आहे. असो; 'ज्याचें शरीर अग्निमय आहे, तो अग्नि होय,' (बृह० ३।७।५) अशी श्रुति आहे. श्रीमद्व्यासांनीं आपल्या ब्रह्मसूत्रांमध्यें (१।२।२८) असें म्हटलें आहे कीं, "अग्नीचा साक्षात् उल्लेख आहे म्हणून विरोध नाहीं असें जैमिनि आचार्य म्हणतात."

शिष्य—या मंत्रांत 'पुढें नेतो तो अग्नि' असाही अर्थ होईल. असो; 'पुढें नेणें इत्यादि कर्म करण्यास योग्य जो तूं अग्नि, तो तूं मला चांगल्या, सुकर आणि मंगलकारक देवयान मार्गानें ने' अशी अग्नीची प्रार्थना या मंत्रांत आहे. होयना?

सिद्धान्ती—होय. "अग्नि-ज्वाला, दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायण, वर्ष, वायु, सूर्य, चंद्र, तसेंच विद्युत्, वरुण, इंद्र, प्रजापति, या सर्वांसही अतिवाहक म्हणजे सूक्ष्म शरीराला नेणारे अशी संज्ञा आहे." (वरदमिश्र)

असो; "ह्या सुखकर व सर्वश्रेष्ठमान्य अशा 'देवयान मार्गानें' मला घेऊन जा. मला उत्तम प्रकारचे चिरंजीव, अनंत इत्यादि सद्गुणयुक्त धन म्हणजे ब्रह्मप्राप्ति करून दे. (मला हिरण्मय पुरुषाकडे घेऊन जा.) तसेंच माझ्या बुद्धीमध्यें प्रकाश पाडणाऱ्या ज्या वृत्ति आहेत, त्यांस व माझे इष्टमित्र त्यांसही घेऊन जा. त्यांना ब्रह्मावांचून दुसरी कोणतीही गोष्ट इष्ट नाहीं. तसेंच तुझ्यावांचून त्यांना दुसऱ्या कोणाचाही आश्रय नाहीं. परमेश्वरा! तूं माझ्या बुद्धीमध्यें प्रकाश पाडून व तेथें स्वप्रकाशानें आहेस." अशी ही प्रार्थना आहे.

शिष्य—कशावरून देव बुद्धीमध्यें प्रकाशतो?

सिद्धान्ती—"आत्मबुद्धीमध्यें प्रकाश पावणारा आणि बुद्धीला प्रकाशित करणारा जो परमात्मा आहे. त्याला मी मुमुक्षु शरण जातों." (श्लो० ६।१८) अशी श्रुतिच आहेना? असो; ही प्रार्थना पुढें ऐक:—'हे अग्ने! चारी प्रकारच्या पुरुषार्थाला कोणतीं साधनें आहेत तीं तुला उत्तम प्रकारें ठाऊक आहेत.' 'कशावरून' म्हणशील तर "जो ज्ञानरूपी अनन्त वेदांस प्रकट करितो, त्या धर्मात्म्याला' (श्वे० ६।१९) अशी श्रुति आहे. आतां श्वेताश्वतर श्रुतीमध्यें 'मुमुक्षु मी तुला शरण जातों.' या मंत्रांतील मुमुक्षु शब्दाचें येथें ही प्रार्थनाश्रुति विवरण करीत आहें. 'हे देवा! आम्ही विहित कर्में केलीं नसतील व निषिद्ध कर्में हीं केलीं असतील, म्हणून पापाचाही पुष्कळच संचय आला असेल. हें पाप तुझी उपासना आम्हांस करूं देणार नाहीं. किंवा तुझ्या प्राप्तीला तरी हें आमचें पाप अडचण उत्पन्न करील; म्हणून हे देवा! आम्ही जीं काय अनंत पापें केलीं असतील, तीं आमच्या मधून काढून टाक. मग पुढें, जसें तुला वाटेल त्याप्रमाणें त्यांचा नाश कर किंवा अन्य पुरुषामध्यें त्यांचा प्रवेश करीव. आम्हांला त्या संबंधानें कांहीं एक वाईट वाटणार नाहीं. किंवा आम्ही तुझ्या आड येणार नाहीं व आग्रहही करणार नाहीं. आमची मनःकामना पूर्ण व्हावी म्हणून आम्ही तुला अनन्य शरण येतों आणि तुला अनेकवार साष्टांग नमस्कार घालितों. तूं आमचा आप्त (हित करणारा) आहेस आणि आमच्या सदिच्छा पूर्ण करणारा आहेस. तसेंच, तूं आमचा

पूर्ण स्वामीही आहेस आणि आमच्यापासून कांहीं मिळावें अशी तुला इच्छाही नाहीं.''

शिष्य—महाराज! या मंत्राचा अन्वय कसा? मला तर सर्व घोंटाळा दिसतो.

सिद्धान्ती—ऐक. 'हे अग्ने! हे देवा! सर्व मोक्षसाधनें तुला ठाऊक आहेत. तूं आमच्या कुटिल पापांस आम्हांपासून वेगळें कर, आम्हांस चांगल्या मार्गानें ब्रह्माकडे घेऊन जा, आम्ही तुला पुष्कळ वेळ नमस्कार करितों, हा अन्वय आहे.

असो, 'आम्ही हात जोडून आनंदानें तुला नमस्कार करितों, असें म्हणणारे तुझे दास होऊं,' हें मुख्य तात्पर्य आहे ॥ १८ ॥

एवमस्मिन्नध्याय आदितो मन्त्राष्टकस्य तु परतत्त्वं ततो मन्त्राष्टकस्य परमपुरुषविषयकं भक्तियोगरूपं साक्षात्साधनमवशिष्टमन्त्रद्विकस्य सर्वफलसाधनप्रपादनं प्रधानप्रतिपाद्यम्। एवं च भगवद्गीताध्यायषट्कं प्रथमं प्रथमाष्टकस्योपबृंहणं द्वितीयषट्कमुपरितनाष्टकस्य चरमश्लोकस्य पूर्वार्धं वायुरनिलममृतमन्त्रोक्तानुष्ठानविधायकमुत्तरार्धं तु युयोध्यस्मज्जुहुराणमेन इति प्रार्थयमानानां प्रार्थनापूरणसंकल्पपूर्वकं शोकप्रतिक्षेपकं चरमश्लोकोऽप्यस्य मन्त्रद्विकस्योपबृंहणमिति बोध्यम्।

इति रामानुजमतानुयायिनारायणकृतप्रकाशिका-समेतेशावस्योपनिषत्।

उपनिषत्तात्पर्य.

सिद्धान्ती—याप्रमाणें या अध्यायांत पहिले आठ मंत्र परमात्मतत्त्वविषयक आहेत. श्रेष्ठ तत्त्वांचा त्यांत उपदेश केला आहे. दुसऱ्या आठ मंत्रांमध्यें पुरुषोत्तमाच्या भक्तियोगाचें साक्षात् साधन सांगितलें आहे. शेवटचे दोन मंत्र सर्व फलें व साधनें सांगणाऱ्या मुख्य विषयांचें प्रधानतः प्रतिपादन करितात. तसेंच जीव, जगत् आणि परमात्मा हीं तीन निरनिराळीं तत्त्वेंही येथें

सांगितलीं आहेत. असो, भगवद्गीतेच्या पहिल्या सहा अध्यायांतील विषय या उपनिषदाच्या पहिल्या आठ श्लोकांचें स्पष्टीकरण करितात. द्वितीय षट्कांतील विषय पुढील मंत्राष्टकाचें विवरण करितात. शेवटच्या (१८ व्या) श्लोकाचा पूर्वार्ध उपान्त्य (१७ व्या) मंत्रामध्यें सांगितलेल्या अनुष्ठानाचा विधि विहित करितो. आणि याचा उत्तरार्ध देवाची प्रार्थना करणाऱ्या भक्तांची शोकादि-प्रतिबंधक प्रार्थना सार्थ व्हावी हा ईश्वरी संकल्प आहे, असें दाखवितो. सारांश, शेवटचा श्लोक शेवटच्या मंत्रद्वयाचें स्पष्टीकरण करितो.

रामानुज-मताचे अनुयायी नारायण यांनीं केलेली ईशावास्योपनिषदावरील 'प्रकाशिका' समाप्त झाली.

ॐ

केनोपनिषत्

(द्वैताद्वैतभाष्यभाषांतरसह.)

संपादक,

चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.

प्रकाशक,

दामोदर सावळाराम आणि मंडळी,

प्रिंटर्स, पब्लिशर्स, एजंट्स् इत्यादि, ठाकुरद्वार-मुंबई.

सन १९१२ इ.

ह्या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

किंमत १ रुपया.

पुस्तक घर नं. ४३४, ठाकुरद्वार रोड-मुंबई येथें 'इंदुप्रकाश' छापखान्यांत
रा. रा. दामोदर सांवळाराम वंदे यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

केनोपनिषद्.

श्रीमद्रामानुज० रंगाचार्यविरचितप्रकाशिकोपेता ।

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः ।

अथ कश्चिद्धन्यो ब्रह्म-जिज्ञासुर्जडानां मनःप्रभृतीनां करणानां प्रवृत्तिस्तत्प्रवर्तकचेतनमन्तरेणानुपपन्नेति सामान्यतोऽवगत्य तत्प्रवर्तकचेतनविशेषबुभुत्सया पृच्छति—

सिद्धान्ती—या उपनिषदांत असा प्रसंग आहे कीं, कोणी एक धन्य (पुण्यवान्) व ब्रह्मजिज्ञासु पुरुष मनादि इंद्रियांचा प्रवर्तक कोण आहे, हें जाणण्याच्या इच्छेनें आचार्यांस प्रश्न विचारीत आहे आणि ब्रह्मज्ञ आचार्य उत्तर देत आहेत. सारांश; कोणी साधक आचार्यांस शरण जाऊन आत्मजिज्ञासेच्या तृप्त्यर्थ प्रश्न विचारून समाधान करून घेत आहे, असा प्रसंग आहे.

शिष्य—या मुमुक्षूला मनाचा प्रवर्तक कोण अशी शंका कां उत्पन्न झाली ?

सिद्धान्ती—अरे ! मन हें जड आहेना ! इंद्रियें, प्राण, हींही मनाप्रमाणेंच जड आहेत. तथापि त्यांच्यामध्यें सहेतुक कार्य-प्रवृत्ति दिसत आहे. जडाला स्वतःप्रवृत्तीनें नियत व्यापार करितां येणें शक्य नाहीं. हें सर्व मनांत आणून साधकानें प्रश्न विचारण्याचा उपक्रम केला आहे. त्याला सामान्यतः असें वाटलें कीं, कोणातरी प्रवर्तकाच्या साहाय्याशिवाय मनादिकांचे व्यापाराची व्यवस्था नीट लावतां येणें शक्य नाहीं. म्हणून हा साधक आचार्यांजवळ गेला आणि 'कोणत्या चैतन्य विशेषाच्या साहाय्यानें मनासह सर्व कर्मेंद्रियें आणि ज्ञानेंद्रियें स्वव्यापाराचे संबंधानें प्रवृत्त होतात, असा प्रश्न त्यानें विचारला. ह्या प्रश्नाचा अवतार पहिल्या मंत्रांत आहे.

मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—केन प्रेषितं मनः इषितं पतति (कोण प्रेरणा करितें म्हणून मन आपल्यास इष्ट असणाऱ्या विषयाकडे प्रवृत्त होतें ?) **केन युक्तः प्रथमः प्राणः प्रैति** (कोणाच्या प्रेरणेनें प्रथम प्राण—प्राणवायु-स्वव्यापार करितो ?) **केन इषितां इमां वाचं वदन्ति** (कोणाच्या इच्छेनें प्रेरित झालों असतों म्हणून आम्ही जीव बोलणें बोलतों ? उं (महाराज !)

कः देवः चक्षुःश्रोत्रं युनक्ति (कोणता देव नेत्रकर्णांस स्वव्यापाराचे ठिकाणीं प्रवृत्त करितो ?)

सारांश, मन, प्राण, वाणी, नेत्र, कर्ण इत्यादि ज्ञानकर्मेंद्रियें कोणाच्या आज्ञेनें स्वव्यापारांमध्यें प्रवृत्त होतात ? हा प्रश्नाचा भावार्थ आहे.

मन इषितमिष्टं साध्वसाधु वा विषयं प्रति केन देवेन प्रेषितं सत्पतति गच्छति । करणत्वादवश्यं केनचित्प्रेरितमिति वाच्यम् । न तावज्जीव एव प्रेरकः । तेन निगृह्यतोऽपि मनसो विषयं प्रति पतनात् । अतो बलवता केनचिद्देवेनैव प्रेरितमिति वक्तव्यं स इति भावः । एवमग्रेऽपि बोध्यम् । इषितमितीडागमश्छान्दसः । अथ प्रथमः प्राणः पञ्चानां प्राणानां मुख्यः प्राणः केन प्रयुक्तः प्रेरितः सन्प्रैति याति स्वव्यापारं करोतीत्यर्थः । इमां लौकिकीं वैदिकीं च वाचं केनेषितां प्रेरितां वदन्ति जीवा इति शेषः । चक्षुःश्रोत्रमिति प्राण्यङ्गत्वादेकवद्भावः । उ संबुद्धौ । भो देशिक को देवो युनक्ति नियुङ्क्ते प्रेरयतीत्यर्थः । इदमुपलक्षणं शेषकरणानामिति ॥ १ ॥

सिद्धान्ती—साधक विचारतो,—' आचार्य महाराज ! चांगल्या किंवा वाईट विषयाकडे मनाची जी प्रवृत्ति होते; ती कोणत्या देवाच्या प्रेरणेनें होते ? कोणत्या देवाच्या प्रेरकत्वानें मनाला चांगली असो, किंवा वाईट असो; पण ती ती गोष्ट करावीशी वाटते ? मन हें करण (इंद्रिय) आहे, व्यापाराचें एक साधन मात्र आहे. म्हणून त्याला कोणी तरी प्रेरक अवश्य असलाच पाहिजे.' चक्राचा प्रेरक कुलाल निराळा असतो, तसा मनाचा प्रेरक कोण ?

शिष्य—जीव हा मनाचा प्रेरक आहे ना ?

सिद्धान्ती—नाहीं. त्यानें आपलें मन आंवरून धरिलें तरी त्याला न जुमानतां तें मन आपल्या इष्ट विषयाकडे धांवत जातें. तेव्हां कोणा तरी बलवान् देवानें प्रेरणा केलेली असते, म्हणून मात्र मन स्वविषयाकडे प्रवृत्त होतें. तो बलवान् प्रेरक कोण ? हें समजून घेण्याची साधकाची इच्छा आहे. याप्रमाणेंच प्राण व इतर इंद्रियें यांचा प्रेरक कोण, हेंही साधकास समजून घ्यावयाचें आहे.

शिष्य—' इषित ' हें पद व्याकरण-शुद्ध नाहीं ?

सिद्धान्ती—हा प्रयोग आर्ष आहे; पूर्वी हा प्रयोग शुद्धच होता. असो; प्राणवायु हा प्राणापानादि पंचकामध्यें श्रेष्ठ आहे, मुख्य आहे, म्हणून प्राणाचा मात्र उल्लेख करून ' तो कोणाच्या प्रेरणेनें स्वव्यापार करितो;' तसेंच, ही लौकिक व वैदिकवाणी कोणाच्या प्रेरणेनें आपला व्यापार करिते; आणि जीव बोलतात; तसेंच नेत्र, कर्ण, इत्यादि प्राण्यांचीं सर्व इंद्रियें कोण प्रेरित

करतो ? हें साधकास समजून घ्यावयाचें आहे. सारांश, सर्व ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, मन, प्राण इत्यादि जडांचा प्रेरक कोण ? हें त्यास समजावयास हवें आहे.

शिष्य—मंत्रांतील 'उ' हा शब्द संबोधनार्थी आहेना ? तसेंच, श्रोत्र व चक्षु एकाच देहाचीं अंगें असतात, म्हणून त्यांचा एकरूपानें उल्लेख केला आहे ना ?

सिद्धान्ती—होय. हे आचार्य ! असा आचार्यांचा संबोध येथें इष्ट आहे. सारांश, सर्व इंद्रियांचा प्रेरक कोण आहे, हा मुख्य प्रश्न आहे ॥ १ ॥

इति शिष्येणानुयुक्त आचार्य उवाचेति ज्ञेयम्—

सिद्धान्ती—साधकानें जो प्रश्न विचारला, त्याचें उत्तर या पुढील मंत्रांत आचार्यांनीं दिलें आहे असें समजावें.

मंत्र दुसरा.

अन्वय व अर्थ—सामान्यतः पूर्वीप्रमाणेंच आहे. जेथें कांहीं विशेष अर्थ आहे, तेथें त्या पदांचें व्याख्यान श्रीरंगाचार्यांनीं स्पष्ट केलें आहे. त्याचें अवतरण मात्र करितोः—**धीराः** (हें सर्व प्रेरकत्व नारायणाचें आहे असें जाणणारे विद्वान्) **अतिमुच्य** (लिंगदेह सोडून देऊन) अर्चिरादिमार्गानें जातात आणि मुक्त होतात.

यत् । यः । श्रोत्रस्य श्रोत्रं शब्दभासकत्वशक्तिप्रदः । मनसो मनः । मननशक्तिप्रदः । वाचो वागिन्द्रियस्य वाचं शब्दोच्चारणशक्तिप्रदः । प्राणस्य प्राणः प्राणनशक्तिप्रदः । चक्षुषश्चक्षुर्दर्शनशक्तिप्रदः श्रोत्रादेर्नियन्ता यस्त्वया पृष्टः स देव इत्यन्वयः तथा च श्रुतयः—

'यो मनसि तिष्ठन्मनसोऽन्तरो यं मनो न वेद यस्य मनः शरीरं यो मनोऽन्तरो यमयति' [बृ० ३।७।२०] । 'यो वाचि तिष्ठन्वाचमन्तरो यमयति' [बृ० ३।७।१७] । 'यः श्रोत्रे तिष्ठञ्छोत्रमन्तरो यमयति [बृ० ३।७।१९] । 'यश्चक्षुषि तिष्ठंश्चक्षुरन्तरो यमयति' [बृ० ३।७।१८] । यः प्राणे तिष्ठन्प्राणमन्तरो यमयति' [बृ० ३।७।१६] । इत्याद्या नारायणस्यान्तर्यामित्वप्रतिपादिका इति । स इत्यनेन तादृशो नारायणो देव इति भावः । तथा च भगवद्वाक्यम्—' मत्तः सर्वं प्रवर्तते । इन्द्रियाणि मनो-

बुद्धिरि'त्याद्युक्त्वा 'वासुदेवात्मकान्याहुरि'त्यादिस्मृतयश्च । श्रोत्रादिनियामकत्वज्ञानिनः फलमाह—अतिमुच्येति । धीरा धीमन्तः श्रोत्रादिप्रेरकत्वं नारायणस्य जानन्तः । अस्माल्लोकाद्भौतिकदेहात्प्रेत्य निर्गत्योत्क्रमणं विधायेति यावत् । अर्चिरादिमार्गेण गत्वाऽतिमुच्य लिङ्गदेहं हित्वाऽमृता मुक्ता भवन्तीत्यर्थः ॥ २ ॥

सिद्धान्ती—'मंत्रांत 'यत्' हा शब्द 'यः (जो)' या अर्थी आहे. श्रोत्राला शब्द प्रकट करून घेऊन तो ग्रहण करण्याची शक्ति देणारा, मनाला विचार करण्याची शक्ति देणारा, वाणीला शब्दाचा उच्चार करण्याची शक्ति देणारा, प्राणाला प्राणन-शक्ति देणारा, याचप्रमाणें डोळ्यास पाहण्याचें सामर्थ्य देणारा जो, तो देव आहे, बरें साधका! असो; या व इतर इंद्रियांचा प्रेरक कोण? असा जो साधकानें प्रश्न विचारला होता, त्याचें आचार्यांनीं उत्तर दिलें कीं, हा सर्व-प्रेरक एक परमेश्वर मात्र आहे. हाच कर्णाला, मनाला, वाणीला, व प्राणाला (सारांश, सर्व इंद्रियांनां) आपापले व्यापार करण्याला प्रवृत्त करितो.

शिष्य-असें आचार्यांनीं कशावरून म्हटलें? त्यांच्या म्हणण्यास आधार काय?

सिद्धान्ती—किती तरी श्रुति या आचार्यांचें म्हणणें समर्थन करतील? ऐक, 'जो मनामध्यें राहून मनाचें अंतर्याम नियमित करितो, जो मनाला मात्र ठाऊक नाहीं, पण ज्याचें मन हें शरीर आहे. व मनावर ज्याची सत्ता अनियंत्रित चालते.' (बृ०३।७।२०) 'जो वाणीमध्यें राहून वाणीचें अंतर्याम नियमित करितो' (बृ०३।७।१७) 'जो श्रोत्रांमध्यें राहून श्रोत्रांचें अंतर्याम नियमित करितो' (बृ० ३।७।१९) 'जो नेत्रांमध्यें राहून नेत्रांचें अंतर्याम नियमित करितो' (बृ० ३।७।१८) 'जो प्राणांमध्यें राहून प्राणांचें अंतर्याम नियमित करितो (बृ० ३।७।१६) इत्यादि अनेक श्रुति नारायणाचें अंतर्यामित्व स्पष्ट सांगतात. मूळ मंत्रामध्यें 'सः (तो)' हें पद एवंगुणविशिष्ट नारायणास अनुलक्षूनच घातलें आहे.

शिष्य—कशावरून?

सिद्धान्ती—गीतेमध्यें भगवान् म्हणतात कीं, 'माझ्यापासूनच सर्वांची प्रवृत्ति आहे' त्याचप्रमाणें 'इंद्रियें, मन, बुद्धि' असा तिसऱ्या अध्यायांत आरंभ करून 'हें सर्व वासुदेवात्मक आहे' असें सातव्या अध्यायांत श्रीकृष्णानें सांगितलें आहे. सारांश, सर्वांची प्रेरणा नारायणाच्या इच्छेनें होते.

शिष्य—भगवन्! श्रोत्राचें प्रेरकत्व कोणाकडे आहे, हा प्रश्न करून व तें प्रेरकत्व नारायणाकडे आहे, हें समजून घेऊन काय करावयाचें आहे?

सिद्धान्ती—बाळा! या ज्ञानाचें फल फार मोठें आहे. बाबा! नारायण हाच सर्व-प्रेरक आहे, असें ज्या बुद्धिमान् पुरुषांस यथार्थ ज्ञान होतें, त्या

लोकांनीं हा भौतिक देह सोडल्यावर, सारांश, देहपात झाल्यावर, त्यांचा जीवात्मा देवयान मार्गानें जातो आणि लिंग-देहाचा त्याग करून तो अमृत म्हणजे मुक्त होतो. सारांश, हें ज्ञान ज्यांस झालें ते लोक सर्व दुःखांपासून मुक्त होतात आणि अमृतपदाला जातात. सर्वप्रेरकत्व समजून घेण्याचें हें फल आहे. ॥२॥

(आनंदाश्रमांत छापलेल्या प्रतींत तिसरा मंत्र व त्यावरील श्रीरंगाचार्यांचें व्याख्यान हीं मला उपलब्ध झालीं नाहींत. पुढील मंत्राचा क्रमांक चवथा आहे. तेव्हां तिसरा मंत्र व त्यावरील व्याख्यान हीं मुद्रकांच्या अनुग्रहानें स्वकार्यविन्मुख झालीं असावीं !)

मन आदीनां प्रवर्तकनारायणब्रह्म साकल्येनोपदिश्येत्यत्राऽऽह यद्वाचेत्यादिमन्त्रैः—

सिद्धान्ती—ह्या पुढील मंत्रांत मनाचें प्रवर्तक जें नारायणरूपी परब्रह्म, त्याचें स्वरूप पूर्णत्वानें समजून द्यावें, अशी विनंति केल्यावरून आचार्यांनीं पुढील मंत्रांत तें स्वरूप सांगितलें आहे.

मंत्र ४-५-६-७-८.

या सर्व मंत्रांचे अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेंच* आहेत.

यद् ब्रह्म वाचा वेदवाण्याऽनभ्युदितं साकल्येन नोक्तम्। येन च प्रेरिता सती वागभ्युद्यते पुरुषैरुच्चार्यते तदेव त्वं ब्रह्म विद्धि जानीहि। नेदं जडजीवादिकं जगद्यत्कामात्मान इदमुपासत इत्यर्थः। एवमग्रेऽप्यर्थो ध्येयः। यन्मनसा कश्चित्साकल्येन न मनुते येन मनो मतम्। येन चक्षूंषि पश्यन्ति दृश्यन्ते इत्यर्थः। यत्प्राणेन न प्राणिति न चेष्टते येन प्राणः प्रणीयते प्रेर्यते ॥४।५।६।७।८॥

इति प्रथमः खंडः ॥ १ ॥

सिद्धान्ती—वाणीला म्हणजे वेद-वाणीला ज्या ब्रह्माचें पूर्णत्वानें वर्णन करितां येत नाहीं, पण ज्याच्या प्रेरणेनें प्रवृत्त झालेली वाणी जीवांचे विचार प्रकट करिते, तें मात्र ब्रह्म होय, असें तूं जाण. ज्याची म्हणजे ज्या जड-जीवात्मक जगताची सकाम पुरुष उपासना करितात तें हें ब्रह्म नव्हे, असा अर्थ

---

* शांकरभाष्याचें भाषांतर करितांना दिलेल्या अन्वयार्थाप्रमाणें.

आहे. सारांश, जड वस्तु किंवा जीवात्मक वस्तु किंवा ह्या सर्व वस्तु जेथें राहतात, तें जमत् ब्रह्म नव्हे; तें ब्रह्म या सर्वांस अगोचर असून सर्वांचें नियामक आणि प्रवर्तक आहे. याच प्रमाणें पुढच्याही चार मंत्रांचा अर्थ समजून घ्यावा. म्हणजे जें मनाला पूर्णत्वानें ग्रहण करितां येत नाहीं, जें डोळ्यांनां दिसत नाहीं, जें प्राणाच्या साहाय्यानें प्रवृत्त होत नाहीं, पण ज्याच्या साहाय्यानें मन, डोळे, प्राण इत्यादि आपापले व्यापार करितात तें ब्रह्म आहे.

शिष्य—किंवा जें मनानें विचार करित नाहीं, जें डोळ्यानें पहात नाहीं, पण जें मनास व डोळ्यांस स्वस्वव्यापाराची शक्ति देतें तें ब्रह्म आहे. असाही अर्थ हाइल. नव्हे ?

सिद्धान्ती—होय. मंत्रांतील पदद्दष्टीन पाहिलें असतां तुझाच अर्थ जास्त आदरणीय आहे. मी केलेला अर्थ वैयाकरणांस ही संमत होणार नाहीं. तरी पण श्रुतीचा भावार्थ मी म्हणतों, असाही असणें शक्य आहे, हें चवथ्या मंत्रावरून दिसतें. शिवाय माझ्या अर्थानें इंद्रियांची दुर्बलता जास्त स्पष्ट होते. असो. तात्पर्य, हें आहे कीं तें सर्व पदार्थांस व ज्ञान–साधनास अगोचर आहे. पण त्याला मात्र सर्व पदार्थ आणि ज्ञान–साधनें यांचें पूर्ण ज्ञान आहे. तसेंच, तें कोणाच्याही तंत्रानें चालत नाहीं म्हणून स्वतंत्र आहे; पण सर्व वस्तु त्याच्या तंत्रानें चालतात म्हणून त्या परतंत्र आहेत; समजलें ? सारांश, तें सर्वज्ञ आणि सर्वप्रेरक आहे. ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥

पहिला खण्ड समाप्त.

द्वितीयः खण्डः ।

मंत्र पहिला (क्रमांक ९ वा).

अन्वय व अर्थ—सुवेद इति यदि मन्यसे (आपल्याला ब्रह्मज्ञान पूर्णत्वानें झालें असें–हे साधका !–तूं मानीत असशील तर) **त्वं अपि दहरं एवं ननं ब्रह्मणः रूपं वेत्थ** (तुला सुद्धां खरोखर ब्रह्मरूपाचें अल्प ज्ञान झालें असलें पाहिजे) **यत् अस्य त्वं, यत् अस्य देवेषु** (तुझ्यामध्यें जें ब्रह्मरूप आहे व देवांमध्यें जें ब्रह्मरूप आहे त्याचें–तुला फारच अल्प ज्ञान झालें असलें पाहिजे.–पुढील अन्वयार्थ पूर्वीप्रमाणें.

— हे शिष्याहं सुवेद ब्रह्मणो रूपं सम्यग्जानामीति यद्दि मन्यसे तर्हि त्वमपि नूनं दहरमेवाल्पमेव ब्रह्मणो रूपं वेत्थ । तस्यानन्त-

त्वादिति भावः। रूपमिति ब्रह्मगुणानामुपलक्षणम्। यद्यस्माद्हरमेव वेत्थ। अथ तस्मात्त्वं तदिति शेषः। मीमांस्यमेव विचार्यमेव नु इदानीम्। ते त्वयेति ॥ ९ ॥ १ ॥

शिष्य—भगवन्! मागील खंडांतील उपदेश ऐकून त्या साधकाला ब्रह्माचें निश्चित स्वरूप समजलेंच असलें पाहिजे.

सिद्धान्ती—हीच शंका आचार्यांना येऊन त्यांनीं ह्या साधकाला सांगितलें कीं "'ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान मला यथास्थित झालें आहे.' असें जर तुला वाटत असेल, तर मला असें सांगितलें पाहिजे कीं, तुला ब्रह्मरूपाचें अति अल्प ज्ञान झालें असलें पाहिजे."

शिष्य—कां बरें? आचार्यांनीं असें कां म्हटलें?

सिद्धान्ती—अरे! ब्रह्म अनंत आहे ना? ह्या अनंताचें ज्ञान सान्त जीवबुद्धीला कसें व्हावयाचें? मला अनंत कालांतील सर्व गोष्टींचें ज्ञान यथास्थित झालें आहे, असें जर मी म्हटलें तर तें वेड्यासारखें नाहीं का होणार?

शिष्य—भगवन्! 'ब्रह्माचें रूप' अशीं पदें मंत्रांत आहेत, तेव्हां श्रुतीनें रूपाचाच तेवढा कां उल्लेख केला?

सिद्धान्ती—रूप या पदानें ब्रह्माच्या सकल गुणांचा म्हणजे अनंत गुणांचाही उल्लेख केला आहे. रूप हें केवल उदाहरणाकरितां घेतलें आहे. समजलें? असो; या अनंत गुणांपैकीं ज्या अर्थी साधकाला फारच थोड्या गुणांचें ज्ञान झालें आहे, असें आचार्यांनीं पाहिलें, तेव्हां त्यांनीं त्यास सांगितलें कीं, साधका! तुला अद्यापि ब्रह्माच्या पूर्ण स्वरूपाची मीमांसा केलीच पाहिजे. तात्पर्य, झाला इतका विचार फारच थोडा आहे. अद्यापि तुला ब्रह्मस्वरूपाविषयीं पुष्कळच विचार करावयास पाहिजे; तुझ्यामध्यें-सर्व जीवांमध्यें-व सर्व देवांमध्यें जें ब्रह्मस्वरूप विराजमान आहे, त्या स्वरूपाचें अति अल्प ज्ञान झालेलें दिसत आहे, म्हणून आपल्याला या स्वरूपाविषयीं पुष्कळच ऊहापोह केला पाहिजे. ॥ ९ ॥ १ ॥

शिष्य—भगवन्! येथें 'त्वं' ह्या प्रथमाविभक्तिक पदाचा सतम्यर्थ केला आहे, असें समजावयास हवें.

सिद्धान्ती—होय. असो; शेवटच्या 'मन्ये विदितं' या दोन पदांचा अर्थ पुढें केला आहे.

मंत्र दुसरा (क्रमांक १० वा).

अन्वय व अर्थ—मन्ये विदितं (मला स्वरूपज्ञान झालेंसें वाटतें) सुवेद इति अहं न मन्ये (पण मला ज्ञान-विज्ञान झालें आहे असें वाटत नाहीं.) नो न वेद इति वेद च (समजलें नाहीं असें नाहीं व समजलें असें नाहीं.) पुढील अन्वयार्थ पूर्वीप्रमाणें. सारांश स्पष्ट आहे. ॥१०॥२॥

अन्येषां कात्स्न्र्येन ब्रह्माज्ञानित्वेऽपि तव स्वस्ति सम्यग्ब्रह्मज्ञानित्वमिति पृष्टो देशिक आह-मन्य इति । अन्ये सम्यग्वेदायमिति मां वदन्ति अहं तु ब्रह्म विदितं न मन्य इति योजना । तर्हि त्वमपि ब्रह्म सर्वथा न वेत्थ किमित्यत आह-नो नेति । नो वेद न जानामीति न किंतु वेदेति च ।

ब्रह्मणः साकल्येनाज्ञेयत्वमुपपाद्योपसंहरति—

नोऽस्माकं मध्ये यस्तु ब्रह्माहं वेदेति वदति स तन्नो वेद । कुतः परिच्छिन्नत्वज्ञानात् । अहं न वेदेति यो वदत्यसौ वेद च ब्रह्मणोऽपरिच्छिन्नत्वात् ॥ १० ॥ २ ॥

सिद्धान्ती—नंतर साधक आचार्यांला म्हणाला भगवन् ! इतर पुरुषास तर ब्रह्माचें सर्वथा अज्ञानच आहे. पण आपल्याला मात्र त्या स्वरूपाचें पूर्ण ज्ञान झालें आहे असें मला वाटतें.

शिष्य—यावर आचार्यांनीं काय उत्तर दिलें ?

सिद्धान्ती—आचार्य म्हणाले. साधका ! पुष्कळ लोक असें म्हणतात कीं मला ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान यथास्थित झालें आहे. पण मला मात्र तसें वाटत नाहीं. तत्स्वरूपाचें ज्ञान मला समग्र झालेंच नाहीं.

शिष्य—हें उत्तर ऐकून साधक स्तब्ध बसला कीं काय ? मी तेथें असतों तर विचारिलें असतें कीं, 'आचार्य महाराज ! तर मग आपल्यालाही ब्रह्मज्ञान सर्वथा झालें नाहीं असें म्हटलें पाहिजे.'

सिद्धान्ती—तुझ्या प्रमाणेंच साधकानें प्रश्न विचारला. त्याचें उत्तर आचार्यांनीं असें दिलें कीं मला ब्रह्मज्ञान झालें नाहीं, असेंही नाहीं; किंतु झालें आहे.

शिष्य—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—म्हणजे असें कीं ब्रह्मस्वरूपाचें साकल्यानें ज्ञान होणें हें अत्यंत अशक्य आहे. सारांश, आपल्यामध्यें जो कोणी असें म्हणतो कीं, 'मी ब्रह्मरूप जाणिलें' त्याला कांहीं एक समजलेलें नसतें. कारण जीवाचें ज्ञान मर्यादित आहे. तेव्हां मर्यादित ज्ञानाला अनंताचें ज्ञान होणें शक्यच नाहीं. पण 'ब्रह्मज्ञान

झालें नाहीं.' असें जो म्हणतो, त्याला असें कळलेलें असतें कीं ब्रह्मस्वरूप अनंत आहे आणि तें आपल्यास समजावयाचें नाहीं. हा निश्चय ज्याचा झाला तोच ब्रह्मवेत्ता होय. ब्रह्मस्वरूप अनंत आहे आणि जीवबुद्धि परिच्छिन्न अथवा मर्यादित आहे; म्हणून जीवाला ब्रह्मज्ञान होणें अत्यंत अशक्य आहे. हें निश्चयानें समजणें हेंच खरें ज्ञान होय. ॥ १० ॥ २ ॥

मंत्र तिसरा (क्रमांक ११ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

यो न इत्यादिना साकल्येन श्रवणाऽगोचरत्वमुक्त्वा मननाऽगोचरत्वं चाऽऽह–यस्येति। यस्य ब्रह्मामतमिति मतं तस्य पुंसो मतं विचारितमनन्तत्वज्ञानात्। यस्य ब्रह्म मया मतं विचारितमिति मतं बुद्धिः स न वेदानन्तत्वाज्ञानात्। साक्षात्कारोऽपि न साकल्येनेत्याह–अविज्ञातमित्यादिना। वयं ब्रह्म सम्यक्साक्षात्कृतवन्त इति विजानतामविज्ञातं ब्रह्म। आनन्त्याद्ब्रह्मणः साकल्येन ज्ञानाभावात्। अविजानतामुक्तरीत्याऽविजानतां नास्माभिर्ब्रह्म सम्यक्साक्षात्कृतमिति यावत् विज्ञातं ब्रह्म साक्षात्कृतमित्यर्थः। आनन्त्यवेदनादिति भावः ॥ ११ ॥ ३ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें श्रवणाला ब्रह्माचें साकल्यानें गोचरत्व होणें अशक्य आहे, असें सांगून (सारांश, ब्रह्म हें इंद्रियांस अगोचर आहे; असें प्रतिपादून) आतां या मंत्रांत तें मननालाही सर्वथा गोचर असणें शक्य नाहीं, असें सांगतात. ज्याला असें समजलें कीं, ब्रह्म ही वस्तु मननाला गोचर होण्यासारखी नाहीं, त्या पुरुषानें खरा विचार केला आहे आणि ब्रह्माच्या अनंतत्वाचें ज्ञान त्याला झाले आहे, असें समजावें. पण उलटपक्षीं 'मीं ब्रह्माचें पूर्ण मनन केलें आहे; आणि माझा तत्स्वरूपाचा निश्चय पक्का झाला आहे' असें ज्याला वाटत असतें, त्याला ब्रह्मरूप समजलेलें नसतें. कारण, अनंतब्रह्म हें ज्ञानाचा विषय होणें शक्यच नाहीं. सारांश, 'ब्रह्म हें अनंत आहे' या तत्त्वाचें या अहंमन्य पुरुषास शुद्ध अज्ञान असतें; ही मननाच्या संबंधानें गोष्ट झाली. तसेंच, त्या स्वरूपाचा समग्र साक्षात्कार होणेंही अशक्य आहे; म्हणून आम्ही ब्रह्मसाक्षात्कारी आहों, आम्हांला तत्स्वरूप प्रत्यक्ष झालें आहे' असें जे लोक समजतात, त्यांना कांहीं एक ज्ञान झालेलें नसतें. कारण वर सांगितलेंच आहे, तें हें कीं, ब्रह्म अनंत आहे म्हणून त्याचें समग्र ज्ञान होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें 'आम्हांला ब्रह्मसाक्षात्कार सामग्र्यानें झाला नाहीं व होणें शक्यही नाहीं' असें ज्यांचें निश्चयपूर्वक मत आहे, त्यांनां ब्रह्मस्वरूपाचें

यथार्थ ज्ञान झालें आहे, असें समजलें पाहिजे. म्हणजे ब्रह्मस्वरूप अनंत आहे, असें स्पष्ट ज्ञान त्यांस झालेलें असतें, म्हणून त्यांचा असा निश्चय होतो.॥ ११॥३॥

ब्रह्मणः साकल्येनाज्ञेयत्वे कथं तेनेष्टसिद्धिरिति चेत्स्वस्य योग्यैकदेशज्ञानादेवेष्टसिद्धिरित्याह—

शिष्य—महाराज ! ह्या ब्रह्माचें समग्र ज्ञान होणें केव्हांही शक्य नाहीं, असें जर आहे तर पुरुषार्थसिद्धि तरी कशी सांग व्हावयाची ?

सिद्धान्ती—आपलें ज्ञान सदैव एकदेशी असतें, असा यथार्थ निश्चय झाला, म्हणजे पुरुषार्थसिद्धि होण्याला अथवा कृतार्थ होण्याला कोणताही प्रत्यवाय उत्पन्न होत नाहीं. हेंच स्पष्ट करितात, ऐकः—

मंत्र चवथा (क्रमांक १२ वा).

अन्वय व अर्थ—हि मतं प्रतिबोधविदितं अमृतत्वं विन्दते (कारण आपल्या ज्ञानास योग्य असें अपरोक्षज्ञान अथवा उपासनासिद्ध विद्या पूर्ण होऊन मोक्ष मिळतो.) आणि—धैर्यानें समाधान व भक्तीनें साक्षात्कार, असें फल मिळतें. बाकीचा अन्वय पूर्वीप्रमाणेंच आहे.

प्रतिबोधेत्यत्र श्रुतमिति शेषः । स्वस्य ब्रह्मविद्याया योग्यतानुसारेण पुंभिः श्रुतं मतं ब्रह्म प्रतिबोधेन स्वयोग्यापरोक्षज्ञानेन विदितं चेदमृतत्वं मुक्तिं विंदते लभते पुमानिति वा प्रतिबोधेनोपासनरूपया कयाचिद्ब्रह्मविद्यया विदितं साक्षात्कृतं ब्रह्म विन्दते लभत इति वार्थः । आत्मना धृत्या वीर्यं समाहितमनस्त्वलक्षणं विन्दते लभते । विद्यया । उपासनरूपया भक्त्येति यावत् । अमृतं परमात्मानं विन्दते लभते साक्षात्करोतीति यावत् । 'भक्त्या च धृत्या च समाहितात्मा ज्ञानस्वरूपं परिपश्यतीह' ति स्मृतेः ॥ १२ ॥ ४ ॥

सिद्धान्ती—या मंत्रांतील ' प्रतिबोधविदित ' पदाच्या नंतर श्रवण केलेलें या शब्दांचा अध्याहार करावा. ब्रह्मविद्येनें स्वतःची जी आत्मिक योग्यता झाली असेल तिच्या अनुसारानें श्रवण केलेलें, मनन केलेलें, ब्रह्मस्वरूप जर स्वज्ञान—योग्यतेनुसार प्राप्त झालेल्या अपरोक्ष ज्ञानानें विदित झालें असलें म्हणजे अमृतत्व (मुक्ति) मिळतें. पुरुषाला त्याच्या ज्ञानयोग्यतेनुसार जर साक्षात्कार झाला तर त्याला अमृतत्व प्राप्त होतें. प्रतिबोध याचा अर्थ अपरोक्षज्ञान असा आहे. आपल्या आत्मिक योग्यतेनुसार आपल्यास ब्रह्मज्ञान होतें. त्या ज्ञानाच्या योग्यते-

प्रमाणें अपरोक्ष साक्षात्कार होतो व हें झालें म्हणजे अमृतत्व मिळतें. असो; प्रतिबोधाचा दुसरा अर्थ असाही करावा कीं, उपासनरूपानें ब्रह्मविद्या प्राप्त होऊन आपल्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला म्हणजे आपण मुक्त होतों. विद्या म्हणजे उपासनारूप भक्ति होय. ह्या भक्तीनें मुक्ति मिळते. म्हणजे परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. म्हटलें आहे, 'भक्तीनें व धैर्यानें (दृढ अभ्यासानें) आत्मा समाहित होऊन (समाधिस्थिति प्राप्त होऊन) पुरुष ज्ञानस्वरूपाचा द्रष्टा होतो,' अशी स्मृति आहे.

शिष्य—'आत्मना वीर्यं विन्दते' याचा भावार्थ काय?

सिद्धान्ती—तो तर स्पष्ट आहे. आपल्याला जर धैर्य असेल तर आपल्यास उत्तम प्रकारचें वीर्य म्हणजे उत्तमप्रकारची शांति मिळते. मनाला समाधान हवें असेल तर त्यानें धैर्याचा अवलंब करावा. याप्रमाणें दृढ अभ्यासानें शांति आणि 'विद्येनें' (भक्तीनें) अमृत मिळतें. सारांश, जीव मुक्त होतो. तात्पर्य यद्यपि जीव व त्याचें ज्ञान हीं मर्यादित आहेत, तथापि अनंत ब्रह्माचें ज्ञान-विज्ञान संपादणें असेल तर दृढ अभ्यासानें व एकनिष्ठ उपासनेनें आत्म-साक्षात्कारापर्यंत परमात्मभक्ति करावी. या भक्तीला धैर्याचा व ज्ञानाचा अवलंब असावा. हें झालें म्हणजे आपल्या ज्ञानानुसार साक्षात्कार होऊन मोक्ष मिळतो. ॥ १२ ॥ ४ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक १३ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

अस्तु विद्यारूपं ज्ञानं भगवत्साक्षात्कारफलं तत्कदा संपाद्यमित्यत आह-इहेति। इह ज्ञानयोग्यब्राह्मणादिदेहेऽवेदीच्चेद्यजानाच्चेत्। अथ तर्हि सत्यं पूर्वोक्तफलं सत्यममृतब्रह्मास्त्येव तत्प्राप्तौ न संदेह इति भावः। इह नावेदीच्चेत्तदा महती विनष्टिर्हानिर्भवति। अथ प्रतिबोधं वक्ति-धीरा ब्रह्मप्राप्तिविनष्टिविवेकिनो भूतेषु सर्वभूतेषु स्थितं ब्रह्म विचिन्त्याऽप्रयाणं स्मृत्वाऽऽस्माल्लोकात्प्रेत्यामृता भवन्तीति ॥ १३ ॥ ५ ॥

इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

शिष्य—ब्रह्मविद्यारूप ज्ञानानें भगवत्-साक्षात्कारचें फल मिळतें हें तर ठीकच झालें, पण या ज्ञानाचें संपादन केव्हां करावयास पाहिजे?

सिद्धान्ती—या तुझ्या प्रश्नालाच श्रुति उत्तर देत आहे तें ऐक:—येथें म्हणजे ज्ञान करून घेण्यास योग्य असें जें ब्राह्मणादिकांचें शरीर असतें, त्यांतच म्हणजे ब्राह्मणादिजन्मामध्येंच जर हें कृतार्थ करणारें ज्ञान झालें, तर पूर्वी सांगितलेलें फल निश्चितपणानें मिळतें. म्हणजे नित्य असणाऱ्या ब्रह्माची प्राप्ति होते व

मुक्ति मिळते, यांत कांहीं संदेह नाहीं. पण येथें जर आपण प्रयत्न केला नाहीं आणि ब्रह्मज्ञान मिळविलें नाहीं तर मोठा घात होतो, मोठी हानि होते असो; जे धीर पुरुष आहेत, ज्यांना उत्तम प्रकारचा विवेक प्राप्त झाला आहे आणि प्रत्येक भूतांमध्यें ब्रह्म अंतर्यामिरूपानें स्थित असतें, असें ज्याचें अखंड चिंतन आमरण असतें, ते लोक हें भुवन सोडून गेले म्हणजे मुक्त होतात. सारांश, ब्रह्मप्राप्ति व समूल नाश यांच्या मधील तारतम्य समजून जे लोक ब्रह्मज्ञ होतात, ते मुक्त होतात. ॥ १३ ॥ ५ ॥

दुसरा खंड समाप्त.

तृतीयः खण्डः ।

अत्यद्भुतत्वात्साकल्येन न ज्ञेयमिति प्रतिपादितेऽर्थे कां च नाऽऽख्यायिकां वक्ति—

सिद्धान्ती—ब्रह्म वस्तु अपूर्व आणि अद्भुत आहे, म्हणून तिचें ज्ञान समग्रत्वानें केव्हांही होणें शक्य नाहीं, हें तत्त्व स्पष्ट करून सांगण्यासाठीं श्रुति एका आख्यायिकेचा अवतार करीत आहे ती ऐकः—

मंत्र पहिला (क्रमांक १४ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

देवानां दैत्यदानवैर्युद्धे प्रस्तुते सति ब्रह्म देवानाविश्य देवेभ्यो देवानामर्थे दैत्यादीन्विजिग्ये व्यजयत् । हेति निश्चितमेतदित्यर्थः । अथ विजयानन्तरं तस्य देवेष्वाविष्टस्य ब्रह्मणो विजये सति देवा अमहीयन्तापूज्यन्त । महीङ्, पूजायाम् । कण्ड्वादिभ्यो यगिति यक्प्रत्ययः । गर्विणोऽभवन्निति भावः । हेत्याश्चर्ये । ब्रह्मणो विजये कुतो देवानां गर्व इत्येतदेव व्यनक्ति—त इति । देवा अस्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेत्यैक्षन्त व्यजानन् ॥ १४ ॥ १ ॥

सि०—देव-दानवांचें युद्ध चाललें असतां देवांच्या पक्षाला साहाय्य होऊन ब्रह्मानें दैत्यादिकांचा पराभव देवांकडून करविला. नारायण नेहमीं असेंच करून देवकार्य करितो हें प्रसिद्ध आहे. विजय प्राप्त झाल्यानंतर प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या देवांनीं मोठा उत्सव केला. पण या विजयाबद्दल त्यांस फार मोठा गर्व झाला आणि अर्थातच ब्रह्माकडून साहाय्य मिळालें असतांही आपल्या आश्रयदात्याचें त्यांस स्मरण झालें नाहीं.

शिष्य—ब्रह्माच्या आश्रयानें जय मिळाला असून देवांस काय म्हणून गर्व झाला ?

सिद्धान्ती—देवांचें हें शुद्ध अज्ञान होतें. त्यांना वाटत होतें कीं केवल आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें आपण हा जय मिळविला आहे. ॥ १४ ॥ १ ॥

मंत्र दुसरा (क्रमांक १५ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

एषां देवानां तदासुरावेशकृतेश्वराज्ञाननिमित्तमहंकारादिकं जज्ञौ व्यजानाद्ब्रह्मेत्यनुषङ्गः। तेभ्यो देवेभ्योऽर्थे देवानां स्वात्मतत्त्वबोधाय यक्षरूपतया प्रादुर्बभूव ब्रह्मेत्यर्थः। तद्यक्षरूपं ब्रह्मेदं किमिति न व्यजानत न व्यजानन् ॥ १५ ॥ २ ॥

सि०—या देवांनां असुर लोकांस योग्य अशा अज्ञानजन्य अहंकाराचा संसर्ग झाला आहे असें सर्वज्ञ ब्रह्माला तत्काल कळलें.

शिष्य—अज्ञान आणि तजन्य अहंकार हे दुर्गुण राक्षसांमध्येंच असतात काय ?

सिद्धान्ती—तसें नाहीं. जेथें अहंकार, अज्ञान, इत्यादि दोष दिसतात तेथें असुरप्रवेश झाला, असुर-संगति झाली, असें समजावें. असो, देवांचें हें अज्ञान घालवून त्यांनां आत्म-तत्त्वाचा बोध करावा म्हणून ब्रह्मानें एक अतिविलक्षण असें यक्षाचें स्वरूप धारण केलें. हें स्वरूप चमत्कारजनक आणि पूज्यभाव-प्रदीपक असें होतें. हें काय स्वरूप आहे हें देवांसही कळलें नाहीं. ॥ १५ ॥ २ ॥

मंत्र तिसरा (क्रमांक १६ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

ते देवा अग्निमब्रुवञ्जातवेद एतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेत्युक्त्वा ॥ १६ ॥ ३ ॥

सिद्धान्ती—देवांनीं अग्नीला विनंति केली कीं हे जातवेदा ! (सर्वज्ञा !) ही अति विलक्षण गोष्ट काय आहे, तिचा शोध करून ये. अग्नीनें ' बरें आहे ' असें उत्तर दिलें. ॥ १६ ॥ ३ ॥

मंत्र ४-१० (क्रमांक १७ ते २३).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

अग्निस्तद्यक्षमाभिमुख्येनाद्रवदगमत् । तद्यक्षमभिमुखमागतमग्निं कोऽसीत्यवदत् । अग्निरहमस्मि जातवेदा अहमस्मीत्यग्निरब्रवीत् । वै प्रसिद्धौ । एतन्नाम ममेत्यर्थः । तस्मिंस्त्वयि तादृशे त्वयि किं वीर्यमिति यक्षमब्रवीत् । यदिदं पृथिव्यामस्ति सर्वमपीदं दहेयमित्यग्निरब्रवीत् । तस्मा अग्नय एतद्धेत्युक्त्वा किंचित्तृणं तत्पुरतो निदधौ यक्षमित्यर्थः । तत्तृणं दग्धुं सर्वजवेन सर्ववेगेणोपप्रेयाय समीपमगमत् । गत्वा तन्न शशाक दग्धुं सोऽग्निः । तत एव तावन्मात्रत एव यक्षरूपमवधार्य निवृत्ते निवृत्तवाग्निर्वृत्र्य च देवानब्रवीत् । यदेतद्यक्षमित्येतद्विज्ञातुं नाशकमिति । अथानन्तरं वायुं प्राग्वद्याख्या । आददीयाऽऽदद्यामित्यर्थः ॥ ४ ॥ ॥ १० ॥ १७ ॥ ॥ २३ ॥

सिद्धान्ती—देवांनीं सांगितल्याप्रमाणें अग्नि त्या यक्षाच्या जवळ लवकर गेला; यक्षासमोर गेल्यावर त्यानें अग्नीला विचारिलें कीं, 'तूं कोण आहेस ? अग्नीनें उत्तर दिलें 'मीं अग्नि आहें, मला जातवेद असेंही म्हणतात.' यक्षानें विचारलें 'तूं जातवेद आहेस तर तुझ्यामध्यें सामर्थ्य तरी काय आहे ?' अग्नीनें उत्तर दिलें 'पृथ्वीमध्यें जें काय आहे, त्या सर्वांला मी दग्ध करून टाकीन.' नंतर यक्षानें अग्नीपुढें एक गवताची काडी ठेविली; आणि म्हणाला,—कीं, 'या काडीला तूं जाळून भस्म करून टाक.' त्या तृणाजवळ त्वरित जाऊन अग्नीनें हें काम करण्याकरितां आपलें होतें नव्हतें तें सामर्थ्य खर्च केलें, पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. म्हणजे तें गवत त्याला जाळतां आलें नाहीं. नंतर तो अग्नि यक्षस्वरूप न समजण्यासारखें आहे, असें समजून देवांकडे परत गेला; आणि 'मला यक्षस्वरूप मुळींच समजलें नाहीं.' असें सांगता झाला. वायूचीही हीच अवस्था झाली; म्हणजे वायूचें सामर्थ्य भग्न होऊन, त्यालाही यक्षस्वरूप काय आहे, हें कळलें नाहीं. मंत्रांत 'आददीय' असें पद आहे, त्याचा अर्थ ग्रहण करणें असा आहे. ॥ १७ ॥ ते ॥ २३ ॥

मंत्र ११-१२ (क्रमांक २४ व २५).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

तस्मात्तिरोदधे तस्मात्प्रदेशादन्तर्हितमभूदिति वा । स इन्द्रस्तस्मिन्नेव यक्षतिरोधानाकाशप्रदेशे यक्षेणोपदेशार्थं स्थापितां स्त्रियं

दृष्ट्वाऽऽजगाम तत्समीपं प्राप्तवान्। सा केत्यत उक्तं बहुशोभमानां हैमवतीं हिमवतः पुत्रीमेतद्यक्षं किमिति तां स्त्रियमुवाच पप्रच्छेत्यर्थः ॥ ११ ॥ १२ ॥ २४ ॥ २५ ॥

इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

नंतर देवांनीं इंद्राकडे ही कामगिरी सोंपविली. तेव्हां इंद्र त्या यक्षाजवळ गेला. तेव्हां यक्ष तेथल्या तेथेंच अंतर्धान पावला. अथवा इंद्राला दिसेनासा झाला. पण त्याच जागीं म्हणजे ज्या आकाशप्रदेशांत यक्ष अंतर्हित झाला होता, तेथें एक सुंदर स्त्री उभी होती, ती इंद्रानें पाहिली. तिच्याजवळ ज्ञानप्राप्तीसाठीं इंद्र जाता झाला. ही स्त्री यक्षानेंच तेथें स्थापित केली होती. तिच्याजवळ गेल्यावर त्याला असें दिसलें कीं, ती स्त्री हिमवताच्या कन्येसारखी (उमेसारखी) अति सुंदर आहे. असो; इंद्रानें तें 'यक्ष-स्वरूप कोणाचें' असें तिला विचारलें. ॥ ११ ॥ १२ ॥ २४ ॥ २५ ॥

तिसरा खंड समाप्त.

चतुर्थः खण्डः।

मंत्र पहिला (क्रमांक २६ वा).

* अन्वय पूर्वाप्रमाण.

इन्द्रेण पृष्टा देव्येतद्यक्षं ब्रह्मेति होवाच। हेति निश्चयमाह। एतदेतस्य देवेष्वनुप्रविष्टस्य ब्रह्मणो विजये तद्विजयनिमित्तं महीयध्वं महिमवन्तो भवत न त्वात्मनो विजय-निमित्तं गर्विणो भवत वै निश्चितमेतदिति चोवाचेत्यन्वयः। एवमुमयोपदिष्ट इन्द्रः किं चकारेत्यत आह-तत इति। ततो हैव देव्युपदेशादेव तद्यक्षमिन्द्रो ब्रह्मेति देवविजयोऽस्मदनुप्रविष्टब्रह्मकृत इति विदांचकार ज्ञातवान् ॥ १ ॥ २६ ॥

सिद्धान्ती—हा इंद्राचा प्रश्न ऐकून देवी म्हणाली, कीं 'तें ब्रह्म आहे' हें तुला ठाऊक नाहीं काय ? देवहो ! तुम्हांला अंतर्बाह्य साहाय्य करून ब्रह्मानें जयप्राप्ति दिली आहे आणि म्हणून तुमचा उत्कर्ष झाला आहे. अतएव आपण हा जय मिळविला, असा जो तुम्हांस गर्व झाला आहे त्याचा त्याग करा आणि

---

* अन्वय पूर्वीप्रमाणें, पण अर्थाचें स्पष्टीकरण व्याख्यानांत उत्तम केलें आहे.

हा विजय प्राप्त करून दिल्याबद्दल ब्रह्माचे आभारी व्हा, व त्याची योग्य उपासना करून त्याचा महिमा विश्वांत प्रकट करा. माझें सांगणें निःसंशय खरें आहे.

शिष्य—याप्रमाणें इंद्राला ब्रह्मोपदेश झाल्यावर इंद्रानें काय केलें ?

सिद्धान्ती—हा देवीचा उपदेश ऐकून मात्र इंद्राला ज्ञान झालें कीं जें आपण यक्षस्वरूप पाहिलें तें ब्रह्माचें होतें. तसेंच त्या सर्वशक्ति ब्रह्मानें देव-शरीरांत प्रवेश करून देवांचें अंतर्बाह्य साहाय्य केल्यामुळें आम्हां देवांचा जय झाला, असें इंद्रास आतां कळलें व त्याच्या गर्वाचा परिहार झाला. ॥ १ ॥ २६ ॥

मंत्र दुसरा (क्र० २७ वा).

तस्माद्वै यस्मात्त्वं ब्रह्मणः पूर्वदृष्टत्वादेवैते देवा अन्यान्देवानतितरामिवेति । एते देवाः क इत्यतस्तानाह—यदग्निर्वायुरिन्द्र इति । यदग्निर्योऽग्निर्यो वायुर्य इन्द्र एते देवाः । कुत एतेऽधिका इत्यतस्तस्मादित्युक्तम् । हेतुं व्यनक्ति—ते होति । हि यस्मादेतद्यक्षरूपं ब्रह्म नेदिष्ठं समीपस्थं पस्पृशुः । स्पृश संस्पर्शने । परामर्शं कृतवन्त इत्यर्थः । परामर्शात्प्राग-ग्निवाय्वोर्यक्षदर्शनमात्रमिंद्रस्य तु यक्षस्य ब्रह्मत्वज्ञानमिति । बोध्यम् । तद्व्यनक्ति—ते होति । तेऽग्निवायविन्द्राः प्रथमः प्रथमं विदांचकार विदांचक्रुः ॥ २ ॥ २७ ॥

सिद्धान्ती—ज्या अर्थी या देवांना ब्रह्मस्वरूपाचें दर्शन अगोदर झालें, त्या अर्थी हे देव इतर देवांपेक्षां योग्यतेनें श्रेष्ठ होते असें ठरल्यासारखें होतें.

शिष्य—हे देव म्हणजे कोणते ?

सिद्धान्ती—अग्नि, वायु, आणि इंद्र असे सर्वश्रेष्ठ देव, हा 'हे देव' याचा अर्थ आहे.

शिष्य—यांनाच श्रेष्ठ देव असें समजण्याचें कारण काय ?

सिद्धान्ती—कारण इतकेंच कीं त्यांना ब्रह्मस्वरूपाच्या जवळ जाऊन त्याचें ज्ञान संपादन करण्याचा सुंदर योग स्वयोग्यतेनुसार प्राप्त झाला. त्यांतल्यात्यांतही अग्निवायूंस यक्षदर्शन मात्र झालें; पण इंद्राला 'हें ब्रह्म आहे' असें जास्त ज्ञान झालें. सारांश, या तीन देवांना प्रथमतः ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें म्हणून ते श्रेष्ठ होत. येथें 'प्रथम' हें (पहिल्यांदा) या अर्थी आहे. ॥ २ ॥ २७ ॥

ब्रह्मवेदनं चेन्द्रस्य देव्युपदेशादन्यस्य त्विन्द्रोपदेशादिति भा· चेन्द्रस्य ज्ञानोदयप्रकारमाह—

सिद्धान्ती—इंद्राला प्रत्यक्ष देवीचा उपदेश होऊन ब्रह्मज्ञान झालें आणि इतर देवांना इंद्राकडून स्वरूपाचें ज्ञान झालें म्हणन या मंत्रांत इंद्राचा श्रेष्ठपणा व्यक्त केला आहे. तो मंत्र असाः—

मंत्र तिसरा (क्र० २८ वा).

तस्मादित्युक्तं हेतुं व्यनक्ति-स ह्येनदिति । एतदेव । तद्वाक्यार्थमेव व्यक्तमाह-स ह्येनत्प्रथम इति । प्रथममित्यर्थः ॥३॥२८॥

सिद्धान्ती—या मंत्रांतील 'तस्मात्' (म्हणून) हें पद या इंद्राचें श्रेष्ठत्व कां आहे, अग्निवायूंपेक्षां इंद्र श्रेष्ठ कां आहे, हें स्पष्ट करितें. आणि हाच अर्थ पुढील वाक्यांत स्पष्ट केला आहे. वाक्यार्थ पूर्व मंत्राच्या अर्थाप्रमाणेंच आहे. असो; 'प्रथमः' हें पदही तोच अर्थ स्पष्ट करितें. या शब्दाचा अर्थ 'सर्वांच्या अगोदर' असा आहे. सारांश, इंद्राला प्रथम ब्रह्मज्ञानोपदेश झाला म्हणून तो अग्नि–वायूंहून श्रेष्ठ आणि इंद्र, वायु व अग्नि यांना प्रथम ब्रह्मदर्शन झालें, म्हणन ते सर्व इतर देवांपेक्षां श्रेष्ठ होत. ३ ॥ ॥ २८ ॥

मंत्र चवथा (क्र० २९ वा).

अधिदैवतमध्यात्मं चोपास्यरूपमुपदिशति—तस्यैष इत्यादिना। तस्य ब्रह्मण एष आदेश उपदेशः । यदेतत्कपिलाख्यं रूपम् । विद्युतो बहुवचनमाद्यर्थं उपलक्षणं वा विद्युदादींस्तेजोरूपानर्थानासमन्ताद्द्योतद्द्योतयद्दीपयदिति । आ न्यमीमिषत्सम्यङ्मीलयत् । आ पूर्णमित्यर्थः । यद्वा यस्मादेवेभ्यो विद्युदिव सहसैव प्रादुर्भूतं ब्रह्म द्युतिमत्तस्माद्विद्युतो विद्योतनं यथा यदेतद्ब्रह्म व्यद्युतद्विद्योतितवत् । आ इवेत्युपमार्थ आशब्दः । यथा घनान्धकारं विदार्य विद्युत्सर्वतः प्रकाशत एवं तद्ब्रह्म देवानां पुरतः सर्वतः प्रकाशव्यक्तीभूतमतो विद्युतामेवेत्युपास्यम् । यथा सकृद्विद्युतम् [२।३।६] इति बृहदारण्यके । यस्माच्चेन्द्रोपसर्पणकाले न्यमीमिषत् । यथा कश्चिच्चक्षुर्निमेषणं कृतवानिति । इतीदित्यनर्थकौ निपातौ । निमिषितवदिव तिरोभूतमित्येवमधिदैवतं देवतायां अधि यद्दर्शनमधिदैवतं तत् ॥ ४ ॥ २९ ॥

सिद्धान्ती—आतां या व पुढील पांचव्या मंत्रांत अधिदैवत आणि अध्यात्मदृष्टीनें ब्रह्माच्या उपास्यस्वरूपाचा उपदेश आहे, त्या ब्रह्मस्वरूपाचा उपमारूपानें उपदेश आहे. म्हणजे त्याचें स्वरूप पुढें सांगितल्याप्रमाणें कपिल वर्णाचें आहे.

शिष्य—भगवन्! मंत्रामध्यें 'विद्युत्' हा शब्द अनेकवचनी कां आहे?

सिद्धान्ती—आद्यर्थी किंवा आदरार्थी हा शब्द आहे, किंवा विद्युत्–प्रमुख सर्व तेजांचें प्रकाशन करणारा हा शब्द आहे. किंवा या तेजानें सर्व त्रैलोक्यांतील तेजस्वी पदार्थही प्रकाशित झाले होते, असें जाणावें. सारांश, विद्युदादि तेजस्वी पदार्थांचा बोध हा शब्द करितो व सर्व तेजस्वी पदार्थ ही या ब्रह्मतेजानें उद्दीपित झाले, असें हा शब्द सुचवितो.

शिष्य—'आ' पदाचें रहस्य काय?

सिद्धान्ती—त्याचें रहस्य असें आहे कीं, या शब्दानें पूर्णत्वाचा उल्लेख व्हावा; म्हणजे ब्रह्मानें जें निर्मीलन केलें (ब्रह्म अंतर्धान पावलें) तें पूर्णत्वानें होतें. किंवा या मंत्राचा दुसऱ्याही तऱ्हेनें अर्थ करावा. कसा म्हणून विचारशील तर सांगतों ऐकः—

ज्या अर्थी हें ब्रह्म स्वतेजानें विजेप्रमाणें देवांपुढें एकदम प्रकट होऊन प्रकाशित झालें, त्या अर्थी विजेच्या आकस्मिक लकाकण्याप्रमाणें हें ब्रह्म प्रकाशमान झालें.

शिष्य—म्हणजे येथें 'आ' या पदाचा अर्थ उपमादृष्टीनें 'तसा' या अर्थी झाला. तात्पर्य, निबिड अंधकाराला फोडून काढून ज्याप्रमाणें वीज एकदम सर्व वस्तु क्षणमात्रामध्यें प्रकाशित करिते, त्याप्रमाणें तें ब्रह्म देवांच्यापुढें सर्व बाजूंनीं एकदम प्रकाशित झालें अथवा प्रकाशरूपानें प्रकट झालें, असें होईल.

सिद्धान्ती—आणि म्हणूनच विद्युत्तेज लक्षांत घेऊन त्या ब्रह्माची उपासना केली पाहिजे असें ठरतें. "ज्याप्रमाणें विजेचा प्रकाश एकदम सर्वत्र पडतो" (बृ० २।३।६) अशी श्रुतिही याला प्रमाण आहे. तसेंच ज्या वेळीं इंद्र जवळ गेला, त्या वेळीं एखादा पुरुष आपले डोळे एकदम झांकतो, त्याप्रमाणें हें ब्रह्म एकदम अंतर्धान पावलें. ह्या अर्थी ही ब्रह्माची विद्युद्' रूपानें उपासना करावी. मंत्रांत 'इति' 'इत्' अशीं जीं दोन अव्ययें आहेत, तीं अर्थशून्य आहेत. 'निमिषत' म्हणजे अंतर्धान पावणें होय, सारांश, तें क्षणांत नाहींसें झाल्यासारखें झालें. असो; देवतांच्या संबंधानें हें दर्शन आहे म्हणून याला अधिदैवत असें म्हटलें ॥ ४ ॥ २९ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक ३० वा).

अथेत्यर्थान्तरे । अध्यात्मं देहे तस्योपदेश उच्यत इत्यर्थः । यदेतन्मनोऽनेनैव प्रेरितं सद्गच्छतीव च सम्यङ् न गच्छतीयत्तया वस्तु न विषयीकरोति । अनेनैव ब्रह्मणाऽनिरुद्धाख्येन हरिणाऽनुगृहीतस्तद्विषयजातमुपस्मरति । कीदृशं मन इत्यत उक्तमभीक्ष्णं संकल्प इति । भृशमनेकार्थान्संकल्पयतीति । संकल्पमित्यर्थः । लिंगव्यत्ययश्छान्दसः । शब्दस्वभावाद्वा । अभीक्ष्णं नित्यं भृशं संकल्पश्च भवति । तस्य ब्रह्मणोऽनिरुद्धाख्यस्य हरेरेष उपदेश इत्यर्थः ॥ ५ ॥ ३० ॥

सिद्धान्ती—आतां यानंतर देहदृष्टि ध्यानांत घेऊन, ब्रह्मस्वरूपाचें निरूपण करितात. मनाला प्रेरणा होते ती ब्रह्माकडून होते, हें आपण मागेंच ठरविलें आहे.

शिष्य—येथें 'इव' या शब्दाचा अर्थ कसा करावयाचा ?

सिद्धान्ती—मन गेल्याप्रमाणें दिसतें; पण स्वतंत्रतेनें तें जात नाहीं. सारांश, मनाला ब्रह्मवस्तु ही ज्ञानविषय केव्हांही करितां येत नाहीं व ब्रह्मवस्तु 'अमुक प्रकारची' आहे असें सांगतां येत नाहीं. हें असें समजावयाचें आहे. शिष्या ! ध्यानांत ठेव कीं ह्या अनिरुद्ध नांवाच्या हरीनें (ब्रह्मानें) अनुग्रह केल्याशिवाय मनाला कोणत्याही विषयाचें स्मरणच करितां येत नाहीं. ब्रह्मानें अनुग्रह केला तर मात्र विषय-जाताचें स्मरण करितां येतें. ज्याचा कोठेंहीं निरोध होत नाहीं, तो अनिरुद्ध हरि आमच्या मनालाही अनुग्रहपूर्वक स्वस्वरूप दाखवितो.

शिष्य—मंत्रांतील 'अभीक्ष्ण' शब्दाचा अर्थ अनेकदां असाच आहे ना ?

सिद्धान्ती—होय. वारंवार अनेक विषयांचें चिंतन करणें, त्यासंबंधानें अनेक संकल्प करणें हें मनाचें स्वरूप आहे. जें मन संकल्प करितें, त्यालाच येथें 'संकल्प' या नांवानें श्रुति संबोधित आहे.

शिष्य—'संकल्प' हें पद पुल्लिंगी आहे. मग मनाला हा प्रतिशब्द कसा होणार व त्याच्याशीं अन्वय तरी कसा होणार ?

सिद्धान्ती—अरे ! हा आर्ष प्रयोग आहे. शिवाय 'संकल्प' हा शब्दही मूळचा पुल्लिंगीच आहे. नित्य व पुष्कळ संकल्प करणें हें मनाचें स्वरूप आहे. तथापि हें मन ब्रह्मप्रेरणेनें स्वव्यापार करीत असतें. असो; या मनाच्या उदाहरणानें या अनिरुद्धाख्य ब्रह्माचा, म्हणजे हरीचा हा उपदेश आहे. तात्पर्य, हरिप्रेरित मनाची मनोरूपानें उपासना करण्यासाठीं या मंत्राची योजना आहे. मनोरूपानें ही उपासना सांगितली म्हणून तिला 'अध्यात्म उपासना' असें नांव दिलें आहे. ॥ ५ ॥ ३० ॥

तस्योपास्यमन्वर्थं नामाऽऽह—

सिद्धान्ती—या ब्रह्माचें उपास्यत्व अन्वर्थच आहे हें कसें तें सांगतातः—

मंत्र सहावा (क्रमांक ३१ वा).

तद्वनं (' तत् '=सर्वव्यापी आणि ' वन '=वंदनीय, असें जें स्वरूप तें ' तद्वनं ' होय.)

तद्वेति । तद्ब्रह्म तद्वनं नाम ततत्वाद्व्याप्तत्वाद्वननीयत्वाद्भजनीयत्वात् । तद्वनमिति कल्याणनिमित्तकनामवत् । तनोतेरत्यजियजितनिभ्य इत्यदप्रत्ययः । वनतेरकारः । तच्च तद्वनं चेति तद्वनमिति । हेति प्रसिद्धम् । तद्वनमित्युपासकस्य फलमाह—स य इति । स प्रसिद्धो योऽधिकार्येतद्ब्रह्मैवं तद्वनं नामेत्येवं रूपेण वेदैनं तद्वनत्वज्ञानिनं सर्वाणि भूतान्यभिसंवाञ्छन्ति । सर्वापेक्षितो भवतीत्यर्थः ॥ ६ ॥ ३१ ॥

सिद्धान्ती—या ब्रह्माचें ' तद्वन ' हें एक सुप्रसिद्ध नांव आहे.

शिष्य—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—सर्वत्र पसरलेलें म्हणून ' तत् ' आणि सर्वांनीं उपासना करण्यास योग्य म्हणून ' वन ' हा असा ' तद्वन ' शब्द आहे. तात्पर्य, हें ब्रह्म सर्वव्यापी आणि सर्वोपास्य आहे, आणि सर्वांचें कल्याण होण्याचें निमित्तकारण आहे, म्हणून हें नांव हरीच्या इतर अनंत नांवांसारखें मंगलदायक आहे. हा शब्द व हा समास हे उभयतांहि व्याकरणशुद्ध आहेत, हा व्याकरणाचा भाग तुला नीटसा समजणार नाहीं म्हणून मी तुला सांगत नाहीं. असो; मंत्रांतील ' ह ' हें पद प्रसिद्धिदर्शक आहे, या नांवानें ब्रह्माची नित्य उपासना करावी.

शिष्य—या उपासनेनें फलप्राप्ति काय होणार ?

सिद्धान्ती—जो कोणी अधिकारी पुरुष, शुद्ध आणि सात्विक पुरुष, ब्रह्माचें सर्वव्यापित्व आणि सर्वोपास्यत्व जाणतो, व ब्रह्माचें ' तद्वन ' हें नांव सार्थ जाणून त्याची उपासना करितो, त्याला सर्वभूतें (यच्च यावत् स्थावर जंगम पदार्थ, वश्य होतात. सर्व त्याच्या समागमाची इच्छा करितात, हेंही प्रसिद्ध आहे. सर्वांसच तो परमात्मा हवासा वाटतो. ॥ ६ ॥ ३१ ॥

मंत्र सातवा (क्रमांक ३२ वा).

अन्वयः—यथापूर्व आहे. अर्थ निराळा आहे, तो पुढील व्याख्यानांत स्पष्ट होणार आहे.

एवं श्रुत्वा पुनराचार्यं पृच्छति शिष्य उपनिषदं भो ब्रूहीति । भो आचार्योपनिषदं सप्रतिष्ठां सायतनां ब्रूहीत्यपृच्छदिति शेषः । किमुपनिषत्प्रतिपाद्यं पृच्छस्युतोपनिषदुत्पन्नविद्याया अवस्थानकारणं किं वा विद्यायाः कारणमिति हृदि विकल्प्य क्रमेणोत्तरमाह-उक्ता त इति । ते तुभ्यं ब्राह्मी ब्रह्मविषया वावेत्य संशयं त उपनिषत्स्वरूपमब्रूमावोचामेति । ब्रह्मेति होवाचेत्यादिना ब्रह्मस्वरूपोक्तेस्तत्र वक्तव्यं किमपि नेत्यर्थः ॥ ७ ॥ ३२ ॥

सिद्धान्ती—ह फल श्रवण केल्यावर तो मुमुक्षु साधक आचार्यास विनंति करिता झाला, कीं मला उपनिषदाचें व्याख्यान सांगा.

शिष्य—भगवन्, आतांपर्यंत उपनिषदाचेंच व्याख्यान झालें ना ?

सिद्धान्ती—होय. पण शिष्याचा हेतु असा आहे कीं, आपल्याला उपनिषदाची प्रतिष्ठा व त्याचें आयतन यांचेंही ज्ञान होऊन उपनिषद्व्याख्यान ऐकावयास सांपडावें. हें मनांत आणून आचार्य साधकाला मनांतच प्रतिप्रश्न करितात कीं याला उपनिषद्-प्रतिपाद्य (उपनिषदें ज्याचें संकीर्तन करितात) जें ब्रह्म तें समजून घेण्याची इच्छा आहे किंवा उपनिषदानें जें ज्ञान उत्पन्न होतें त्याचें अधिष्ठानकारण कोणतें तें समजून घ्यावयाचें आहे ? किंवा विद्येचें कारण याला समजून घ्यावयाचें आहे ? असे विकल्प मनांत उत्पन्न करून साधकाला उत्तर आचार्य क्रमानें देतात कीं, तुला आम्ही ब्राह्मी उपनिषदाचें (ब्रह्म आहे विषय ज्याचा त्या उपनिषदाचेंच) स्वरूप सांगितलें आहे. चौथ्या खंडांत ब्रह्मस्वरूपाचें यथास्थित वर्णन आम्हीं केलेंच आहे. आतां त्यासंबंधानें सांगावयाचें कांहीं एक राहिलें नाहीं.

शिष्य—म्हणजे ब्राह्मी (ब्रह्मविषयक) उपनिषदाचें व्याख्यान हा वेळपर्यंत झालें. असेंचना भगवन् ?

सिद्धान्ती—होय. आतां अधिष्ठान व कारण या विकल्पाच्या संबंधानें उत्तरें देतात तें ऐक. ॥ ७ ॥ ३२ ॥

मंत्र आठवा (क्रमांक ३३ वा).

(शंकराचार्यांनीं वेदवेदांगांचा अंतर्भाव प्रतिष्ठेमध्यें केला आहे व श्रीरंगाचार्यांनीं वेदवेदांगांस 'आयतन' 'उत्पत्तिस्थान' यांत जागा दिली आहे. हा भेद ध्यानांत ठेवावा.)

तस्यै तस्या विद्यायास्तपो दमः कर्म च प्रतिष्ठा । तपः कृच्छ्रचान्द्रायणादि शास्त्रपर्यालोचनं वा । दम इन्द्रियनिग्रहः । कर्म तु वर्णाश्रमोचितक्रियानुष्ठानम् । प्रतिष्ठा प्रतिष्ठाहेतुः । तपआदिमत्सु विद्या प्रतितिष्ठतीत्यर्थः । वेदा ऋगादयस्तदनुकूलग्रन्थाश्च । शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति षडङ्गरूपसर्वाङ्गानि (णि) सत्यं यथाभूतमपीडाकरं वचनमायतनमुत्पत्तिस्थानं ब्रह्ममीमांसा तस्या इत्यनुषङ्गः । विद्याया इत्यर्थः ॥८॥३३॥

सिद्धान्ती–ह्या विद्येची प्रतिष्ठा तप, दम, आणि कर्म यांच्या साहाय्यानें होते.

शिष्य—तप म्हणजे कृच्छ्र चांद्रायणादि प्रायश्चित्तें करावयाचीं हेंच ना ?

सिद्धान्ती—होय. याचप्रमाणें तपामध्यें शास्त्राचें साग्र आणि सार्थ अवलोकन याचा ही अंतर्भाव होतो. दम म्हणजे इंद्रियांचा निग्रह होय. वर्णाश्रमाला उचित अशा क्रियांचें अनुष्ठान ठेवणें हें कर्म होय. सारांश, इंद्रियनिग्रह, वर्णाश्रमास योग्य असणारें विहितकर्म आणि शास्त्रांचें अवलोकन हीं सर्व विद्येची स्थापना ठीक व नीट करितात. हीं असलीं म्हणजे, विद्येला स्थैर्य येते. विद्येची हीच प्रतिष्ठा (अधिष्ठान) आहे.

शिष्य—आतां आयतन म्हणजे काय तें सांगावें.

सिद्धान्ती—ऋग्वेदादि चारी वेद आणि त्यांस अनुकूल असणारे ग्रंथ, याचप्रमाणें शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, आणि ज्योतिष हीं वेदाचीं सहा अंगें आहेत; वेद आणि वेदांगें मिळून विद्येचें उत्पत्तिस्थान होतें. ब्रह्मविद्या उत्पन्न होते, ती वेदवेदांगांच्या दृढ आणि एकनिष्ठ अभ्यासानें होतें. मात्र या अभ्यासाला सत्याचें साहाय्य हवें.

शिष्य—सत्य म्हणजे काय ?

सिद्धान्ती—जसें असेल तसें बोलणें व तें कोणासही पीडा देणार नाहीं. या रीतीनें बोलणें याचें नांव 'खरें बोलणें' आहे. सारांश, सत्य वचन आणि वेदवेदांगाचा दृढ अभ्यास हीं सिद्ध झालीं, म्हणजे ब्रह्मविद्येची व ब्रह्ममीमांसेची उत्पत्ति होते. येणें प्रमाणें विद्येची प्रतिष्ठा म्हणजे अधिष्ठान व विद्येचें उत्पत्तिस्थान (कारण) हीं आचार्यांनीं साधकास सांगितलीं. एवंच ब्रह्मविद्या, तिचें अधिष्ठान व तिचें उत्पत्तिस्थान ह्यांचें विवरण पूर्ण झालें. ॥ ८ ॥ ३३ ॥

मंत्र नववा (क्रमांक ३४ वा).

एतदुपनिषज्ज्ञानिनः फलमाह—

सिद्धान्ती—या उपनिषदाचें ज्ञान ज्याला होतें, त्याला फलप्राप्ति काय होते, तें सांगतातः—

य इति । योऽधिकार्येतामुपनिषदं वेद स पाप्मानमपहत्यानन्ते त्रिविधपरिच्छेदरहिते स्वर्गे सुखरूपे लोके प्रकाशरूपे ज्येये श्रेष्ठे ब्रह्मणीति योज्यम् । प्रतितिष्ठतीति द्विरुक्तिरुक्तसर्वावधारणार्था ॥ ९ ॥ ३४ ॥

इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

इति रङ्गरामानुजविरचितप्रकाशिकासमेता तलवकारोपनिषत् ।

सिद्धान्ती—ज्या अधिकारी पुरुषाला ह्या उपनिषदाचें ज्ञान होतें तो सर्व पापांचा विध्वंस करितो आणि तिन्ही प्रकारच्या उपाधींनीं परिछिन्न न झालेल्या सुखरूप आणि तेजोरूप स्वर्गामध्यें म्हणजे अतिश्रेष्ठ ब्रह्मामध्यें जाऊन स्थिर राहतो.

शिष्य—तीन प्रकारच्या उपाधी कोणत्या ?

सिद्धान्ती—देश, काल, आणि वर्तमान ह्या तीन उपाधि होत. स्थलाच्या कालाच्या, आणि परिस्थितीच्या अस्तित्वामुळें दृश्य विषयांना मर्यादित्व किंवा परिछिन्नत्व प्राप्त होतें. तसेंच आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक, अशाही तीन उपाधींचा (सारांश सर्व उपाधींचा) हा ज्ञानी पुरुष विध्वंस करितो आणि या उपाधींच्या पलीकडे जो ब्रह्मलोक आहे, जेथें सुख, ज्ञान आणि प्रकाश हींमात्र वास्तव्य करितात, त्या मध्यें जाऊन ज्ञानी जीव स्थिर राहतो. ' प्रतितिष्ठति ' या पदाची द्विरुक्ति झाली आहे तिचा हेतु मागील सर्व व्याख्यानाचें तात्पर्य, नीट लक्षांत ठेवावें हें आहे. ब्रह्मस्वरूप त्याची प्रतिष्ठा आणि त्याचें आयतन व ब्रह्मविद्येचें फल यांचा सर्व जीवांनीं यथार्थ विचार करावा आणि त्याप्रमाणें वागावें, एतदर्थ ह्या पदाची द्विरुक्ति केली आहे. ॥ ९ ॥ ३४ ॥

ॐ

कठोपनिषद्.

(द्वैताद्वैतभाष्यभाषांतरासह.)

संपादक,

चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.

प्रकाशक,

दामोदर सावळाराम आणि मंडळी

प्रिंटर्स, पब्लिशर्स, एजंट्स् इत्यादि, ठाकुरद्वार–मुंबई.

सन १९१२ इ.

ह्या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

किंमत ४ रुपये.

हें पुस्तक घर नं. ४३४, ठाकुरद्वार रोड–मुंबई येथें 'इंदुप्रकाश' छापखान्यांत
रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ॐ

प्रश्नोपनिषद्.

(श्रीशाङ्करभाष्यसमेता.)

संपादक

चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

प्रिंटर्स, पब्लिशर्स, एजंट्स् इत्यादि, ठाकुरद्वार–मुंबई.

सन १९१२ इ.

ह्या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

किंमत १॥ रुपया.

हें पुस्तक घर नं. ४३४, ठाकुरद्वार रोड–मुंबई येथें इंदुविजय कंपनीच्या
'इंदुप्रकाश' छापखान्यांत रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं
छापून प्रसिद्ध केलें.

प्रश्नोपनिषद्.

इतर आचार्यांच्या सिद्धान्तांचा उल्लेख.

येथें श्रीमद्रामानुजाचार्यादि भाष्यकारांनीं शंकराचार्यांच्या भाष्याहून कोठें विभिन्नता प्रकट केली आहे, तिचें स्वरूप सांगून एकंदर त्यांचा अभिप्राय काय आहे हें कळविण्याचें योजिलें आहे.

श्रीरंगरामानुजाचार्य.

प्रश्न पहिला.

चौथ्या मंत्रांत प्रजापतीचा अर्थ परमात्मा अथवा ब्रह्म असा केला आहे. सहाव्या मंत्रांत आदित्याचा अर्थ जीव असा करून, प्राच्यान् प्राणान् म्हणजे चक्षुआदिकरून इंद्रियें असा गोड अर्थ केला आहे. रश्मीचा अर्थ धर्मसंबंधी ज्ञान असा केला आहे. दहाव्या मंत्रांत सांगितलेलें अमृत आणि अभयस्थान परब्रह्माचें आहे, केवल सूर्याचेंच आहे असें नव्हे, असें स्पष्ट सांगितलें आहे; कारण ज्ञानकर्मसमुच्चयानें अमृत मिळतें असा यांचा सिद्धांत आहे. अकराव्या मंत्रांतील पंचपाद' याचा वत्सर, संवत्सर, परिवत्सर, इडावत्सर, अनुवत्सर, असा ठीक अर्थ केला आहे. सप्तचक्राचा 'ग्रहसप्तक' अर्थ चिंतनीय होय. पंधराव्या मंत्रांतील 'प्रजापति-व्रत म्हणजे व्रतपूर्वक अन्नभक्षण करणें होय. अन्न मात्र भक्षण करणारे ब्रह्मचर्यशून्य लोक प्रजा उत्पन्न करितात व त्यांस पुत्र, पशु, अन्न-आदि संसारलोक प्राप्त होतो' असें या आचार्यांचें म्हणणें आहे.

पहिल्या प्रश्नांतील भावार्थासंबंधानें केवलाद्वैत आणि विशिष्टाद्वैत यांच्यामध्यें फारसा भेद उत्पन्न होणें शक्य नाहीं. शंकराचार्य प्रजापति शब्दानें हिरण्यगर्भाचा अवतार करितात, तर श्रीमद्रामानुज वरील शब्दानें सर्व नियामक व सर्वव्यापी परब्रह्माचा अवतार करतात. उक्तयतींनीं आपआपल्या तत्त्वज्ञानविषयक समजुतींस वश होऊन प्रत्येक मंत्र आपल्या पूर्वग्रहास अनुकूल आहे, असें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे हुसऱ्या किरकोळ भेदांपैकीं कांहींचा निर्देश वर केला आहे; त्यांवरून मुख्य तात्पर्यामध्यें विशेष विरोध दिसत नाहीं, असें वाचकांच्या प्रत्ययास येईल.

प्रश्न दुसरा.

तिसऱ्या मंत्रांत मुख्य प्राणाचें म्हणणें असें वर्णिलें आहे कीं, आकाशादि पंचमहाभूतें आपापलीं स्वकार्यें मात्र करण्यास समर्थ असतात. देहाचीं सर्व कार्यें करण्याचें सामर्थ्य त्यांपैकीं कोणाही एकास नसतें; पण

प्राण हा सर्व भूतांच्या स्वस्वकार्याचें निमित्तकारण असल्यामुळें प्रत्येक महाभूताचें कार्य त्यास करितां येतें; पण पंचमहाभूतांपैकीं कोणत्याही भूताला प्राणाचीं जीवधातृत्व व जीवदातृत्व इत्यादि कामें करितां येत नाहींत. हा कायतो विशेष स्मरणीय अर्थविशेष मला दिसत आहे. सहाव्या मंत्रांतील क्षत्र आणि ब्रह्म या शब्दांचे स्थावर आणि जंगम प्राणी असा उपलक्षणानें अर्थ करून मंत्राचें विवरण केलें आहे.

प्रश्न तिसरा.

दुसऱ्या मंत्रांत ब्रह्मिष्ठ या पदाचा अर्थ ब्रह्मवेत्ता असा केला आहे. तिसऱ्या मंत्रांत 'अकृतेन' याचा प्रयत्नाशिवाय असा अर्थ करून आतत म्हणजे अविनाभाव (नित्य साहचर्य) असा अर्थ केला आहे; आणि तात्पर्यार्थ असा काढला आहे कीं, मन आणि प्राण हे पुरुषार्थी नित्य साहचर्यानें असतात. म्हणजे परब्रह्म हें नित्य मन आणि प्राण या विशेषांनीं युक्त असतें. हा अर्थ विशिष्टाद्वैताच्या सरणीस योग्यच होय. आठव्या मंत्रांत आदित्याला बाह्य प्राण असें म्हटलें आहे. हा केवल उपचार आहे आणि उपासनेचा अर्थ सिद्ध व्हावा, यासाठीं आदित्यादिकांस प्राणात्मकत्व अर्पित केलें आहे. दहाव्या मंत्रांत मुख्य प्राण आणि उपप्राण हे सर्व जीवामध्यें लीन होतात, जीव प्राणामध्यें लीन होत नाहीं, असा अर्थ केला आहे. शंकराचार्य म्हणतात कीं, लिंगदेह मुख्य प्राणामध्यें (हिरण्यगर्भामध्यें) लीन होतो. पण श्रीरंगरामानुज म्हणतात कीं, जीव उत्क्रांत होतो किंवा प्रतिष्ठित होतो, तो प्राणासह होतो. असो.

प्रश्न चौथा.

पांचव्या मंत्रांत 'देव' शब्द जीवाचा बोध करितो, असें म्हटलें आणि सहाव्या मंत्रांत 'सुख होतें' असें जें म्हटलें आहे, तें भौतिक शरीरांत जीव असेल तर होतें; नाहीं तर नाहीं; असें मंत्राचें तात्पर्य काढिलें आहे. आठव्या आणि नवव्या मंत्राचें तात्पर्य असें ठरविलें कीं, आत्मा हा ज्ञानरूप नसून तो ज्ञानी आहे. आणि त्याच्या आश्रयानें सर्व चेतनाचेतनरूप प्रपंच राहतो. या म्हणण्यानें मायावादाचा निरास होतो असें रंगरामानुजाचार्यांचें मत आहे. दहाव्या मंत्रांत छाया शब्दाचा अर्थ ज्ञानाचा संकोच करणारें कर्म असा अर्थ करून, अच्छाय म्हणजे निष्पाप असें ठरविलें ! येथें परब्रह्म म्हणजे वासुदेव होय.

प्रश्न पांचवा.

तिसऱ्या मंत्रांतील 'एकमात्रं' या पदानें अपरब्रह्माचा वाचक 'ह्रस्व प्रणव' असा अर्थबोध केला आहे आणि चौथ्या मंत्रांतील द्विमात्रप्रणव हाही अपरब्रह्माचा मात्र वाचक आहे, असें सांगितलें आहे. पांचव्या मंत्रांतील जीवघन याचा अर्थ आब्रह्मस्तंबपर्यंत असणारें संसारमंडल आणि पुरुष म्हणजे वासुदेव असे

अर्थ केले. वासुदेवाचें ध्यान करणारे लोक ब्रह्मलोकाला म्हणजे वासुदेवलोकाला जातात असें या मंत्रांत सांगितलें. सहाव्या मंत्रांत विप्रयुक्त म्हणजे अत्यंत लवकर ज्यांचा उच्चार केला आहे अशा मात्रा होत. अर्थातच त्यांचा एकमेकांशीं दृढ संयोग होणें म्हणजे अन्योन्यसक्तता होय. तात्पर्य, अत्यंत सावकाश रीतीनें मात्रांचा उच्चार केला असतां, त्या मात्रांचा तो उच्चार अनर्थावह होतो, असें स्पष्ट सांगावयाचें आहे. यज्ञादिक बाह्य क्रिया, मानसक्रिया आणि मध्यमा म्हणजे जपरूप वाचिक क्रिया ह्या तीन क्रियांमध्यें तिन्ही मात्रांचा यथार्थ उपयोग केला असतां जीव निर्भय होतो असें ठरतें.

या प्रश्नाचें तात्पर्य असें काढिलें आहे कीं, पाहण्याचें अथवा विचार करण्याचें कर्म करणाऱ्या परमात्म्याकडे जीवाला ॐकाराच्या आश्रयानें जातां येतें. प्रश्नांत उल्लेखिलेलें शांत, अजर, अभय आणि अमृतदायी स्थान हें परमात्म्याचें वास्तव्य स्थान आहे. म्हणून ॐकाराचें यथाशास्त्र ध्यान करणारा जीव हिरण्यगर्भापर्यंतच न जातां परमात्मस्वरूपापर्यंत जातो. जीवघन शब्दानें हिरण्यगर्भाचाही उल्लेख होतो. त्या जीवघनाच्या पलीकडे ॐकाराच्या मात्र साहाय्यानें जीवास जातां येतें. म्हणून जीवघनांत अंतर्भूत होणारा जो हिरण्यगर्भ, त्याच्या पलीकडे असणाऱ्या परब्रह्मस्थानाप्रत ॐकाराचा आश्रय करणारा एकनिष्ठ उपासक जातो असें तात्पर्य आहे. एकमात्रक प्रणवाची (ह्रस्वोच्चरित प्रणवाची) उपासना करणाऱ्या जीवाला मनुष्यलोकाची प्राप्ति होते. एकनिष्ठ द्विमात्रक ॐकाराची, मध्यमोच्चरित प्रणवाची, उपासना करणारास स्वर्गलोक प्राप्त होतो; आणि त्रिमात्रक प्रणवाची, दीर्घोच्चरित प्रणवाची, उपासना करणारा जीव परब्रह्माची प्राप्ति करून घेतो. असें पांचव्या प्रश्नाचें तात्पर्य यांनीं काढिलें आहे.

प्रश्न सहावा.

या प्रश्नाच्या दुसऱ्या मंत्रांत प्रभवन्ति (समर्थ होतात.) या पदावर विशेष कटाक्ष घरून त्याच्या बलानें या मंत्रांतील पुरुष शब्दाचा अर्थ जीव असा केला आहे आणि त्याचें समर्थन जीव जेथें राहतो, त्या शरीराच्या अंतर्भागानें केलें आहे. या अर्थाचें समर्थन—इह एव अंतःशरीरे (येथेंच अंतःशरीरांत म्हणजे शरीरानें मर्यादित केलेल्या प्रदेशाचा ज्यास आधार आहे, त्या जीवाधिष्ठानामध्यें) असा या पदांचा अर्थ करून केलें आहे. पुढें चौथ्या मंत्रांत प्राणाला आरंभ करून,—नामापर्यंतच्या सर्व सोळा कला जीवांस होणाऱ्या सुख—दुःखादि भोगरूप उपकार करण्यास समर्थ होतात असें म्हटलें आहे. सारांश, षोडशकलत्व जीवाचें मात्र आहे, असें ठरविलें आहे आणि याला नियामक पुढील मंत्र घेतला आहे. सोळा कलांचा आविर्भाव व तिरोभाव यांनीं जीवाचा आविर्भाव (प्रकट होणें) व तिरोभाव (अस्त पावणें) होतात; म्हणून जीवाला प्राणादि षोडशकलांचें जननसामर्थ्य येऊन तद्भोक्तृत्व संभवनीय होतें.

चौथ्या मंत्रांत तर रंगरामानुजाचार्यांनीं सर्व कलांचें उत्पादकत्व जीवाच्या माथीं मारलें आहे आणि त्याचें समर्थन असें केलें आहे कीं, परमेश्वराच्या संकल्पानुसार वागणाऱ्या अदृष्टोत्पादी (पाप-पुण्यादि धर्मात्मक) कर्मांचें कर्तृत्व जीवाकडे आहे. सारांश, तो प्राणादिकांचा कर्ता आहे. नंतर या-पुढील मंत्रांत विशिष्टाद्वैतात्मक विशेष मला दिसला नाहीं. पाठीमागील मंत्रानुसार पुढील मंत्राचा अर्थ केला आहे आणि परमेश्वर कलाजन्य भोक्तृत्वाचा लेप स्वीकारीत नाहीं, म्हणन त्याला निष्कल असें म्हटलें आहे.

पुढें सारांश सांगतांना अशी एक शंका उत्पन्न केली आहे कीं, "ज्याअर्थी पिप्पलादाचार्य 'यापलीकडे परब्रह्म नाहीं, मीं सांगितलें इतकेंच परब्रह्म मला ठाऊक आहे,' असें म्हणतात; त्याअर्थी जीवापलीकडे ब्रह्म नाहीं, असा त्यांचा अभिप्राय दिसतो." या शंकेचें समाधान "जीवब्रह्मामध्यें भेद सांगितला आहे म्हणून तें जीवाहून अधिक आहे." या ब्रह्मसूत्रावर (२।१।२२) भिस्त ठेवून केलें आहे व असें मानलें नाहीं तर सूत्राशीं विरोध येईल असें म्हटलें आहे. ईश्वरानें जगत् उत्पन्न केलें आहे, असें जीव आणि ब्रह्म यांचा अभेद मानून मानिलें तर आपलेंच अहित कोणी करणार नाहीं. ब्रह्माशीं अभिन्न असणाऱ्या जीवानें जगत् उत्पन्न केलें असतें, तर जीवाला दुःख देणारे प्रसंग जगांत आढळतात; तसें आढळले नसते. कारण, ब्रह्म हें सर्वज्ञ, सत्यसंकल्पी इत्यादि मंगलगुणांनीं युक्त आहे. तसाच जीवही असणार; म्हणून जगांत दुःख दिसलें नसतें; पण जगांत दुःख दिसतें. म्हणन जीव आणि ब्रह्म एक आहेत असें मानतां येत नाहीं; असा सिद्धांत केला आहे. तसेंच आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ अनेक द्वैतमूलक श्रुतींचा अवतार केला आहे.

असो, हा वाद फार मोठा आहे. आणि या उत्पन्न केलेल्या शंकेचें समाधान विशिष्टाद्वैती श्रीमद्रामानुजाचार्यांचें सूत्रभाष्य वाचलें असतां सहज करून घेतां येईल. आपल्यापरीनें कां होईना; पण विशिष्टाद्वैताचार्यांनीं अनेक श्रुति एकत्र आणून त्या सर्वांचा अभिप्राय जीव आणि ब्रह्म यांच्यामध्यें परस्पर भेद आहे, असा उद्धृत केला आहे.

तात्पर्य, विशिष्टाद्वैताचें जें मुख्य रहस्य तें या प्रश्नोपनिषदांत श्रीरंगरामानुजांनीं संगृहित केलें आहे. ब्रह्म सगुण आहे; सर्व-नियामक आहे; सर्वकर्तृ आहे; जीवाचें नियामक तेंच परब्रह्म आहे; जीव परब्रह्माहून निराळा आहे; तो अल्पज्ञ आहे; ब्रह्म सर्वज्ञ आहे; जीव अमर आहे; तथापि त्याच्या ज्ञानसंकोचविकासानें रूपांतर पावणारा आहे; मुक्ति मिळविण्यासाठीं त्यानें ज्ञाननिष्ठा व कर्मनिष्ठा यांचा आश्रय केलाच पाहिजे; एक परब्रह्ममात्र भयशून्य आणि मरणशून्य आहे; सर्वनियामक परब्रह्माच्या संकल्पानुसार अदृष्टानें प्रेरित झालेला जीव प्राणादि षोडश कला उत्पन्न करितो; माया नाहीं; आपल्यास होणारें ज्ञान सत्यरूप मात्र असतें. इत्यादि अनेक सिद्धांत ग्रथित केले आहेत.

श्रीमन्मध्वाचार्य.

या आचार्यांनीं केलेल्या भाष्यांत व श्रीजयतीर्थकृत विस्तृत टिप्पणींत जीं काय अर्थांतरें या उपनिषदांत मला दिसलीं, त्यांपैकीं कांहीं नमूद करीत आहें.

प्रश्न पहिला.

मंत्र पहिला--ब्रह्मपर म्हणजे वेदाच्या अभ्यासामध्यें वेदतात्पर्याकडे मात्र लक्ष देणारे; ब्रह्मनिष्ठ म्हणजे वेदोक्त कर्मांचें अनुष्ठान एकनिष्ठपणानें करणारे होत. हीं विशेषणें ब्रह्मजिज्ञासेचा अधिकार या उपनिषदांतील सहा शिष्यांस होता, हें दाखविण्यासाठीं आहेत. तिसऱ्या मंत्रांत कबंधीच्या प्रश्नाची अशी फोड केली आहेः प्रजांची उत्पत्ति होते हें प्रसिद्ध आहे. यांचें कारण कोणतें ? अचेतन कारण असणें शक्य नाहीं. चेतनांच्या आश्रयानें अचेतन नसलें म्हणजे तें कांहीं एक कार्य करीत नाहीं, असा अनुभव आहे. तसेंच जीव परतंत्र असल्यामुळें तोही अचेतनाचा स्वतंत्र नियामक होऊं शकत नाहीं. ईश्वरही प्रजोत्पादनाचें कारण नव्हे. कारण, तसा अनुभव नाहीं. याप्रमाणें सचेतन, अचेतन व परमेश्वर यांपैकीं कोणीही कारण असल्याचें सिद्ध होत नाहीं. तेव्हां प्रजांची उत्पत्ति कशी ? असा पहिला प्रश्न आहे. तिसऱ्या मंत्रांत प्रजापति याचा अर्थ परमेश्वर केला आहे. परमेश्वरानें तप केलें तें लोकांचें अनुकरण करण्यासाठींच होय. परमेश्वरानें प्राण आणि रयि या उभयतांस उत्पन्न करून असें ठरविलें कीं, हीं उभयतां अनेक प्रकारच्या प्रजा उत्पन्न करतील. या उभयतांमध्यें शिरून मी प्रजोत्पादन करीन. अथवा तीं प्रजोत्पादनाचें निमित्तकारण होतील. हा चौथ्या मंत्रांतील भावार्थ आहे. पांचव्या मंत्रांत सर्व रयि म्हणजे तेज, जल आणि अन्न या मूर्त वस्तु आणि प्रकृत्यादि अमूर्त वस्तु हें राशिद्वय ज्याचें उपादानकारण आहे, तें या मंत्रांतील ' सर्व ' होय. या राशिद्वयापासून विभक्त झालेली जी मूर्ति ती रयि होय. प्राण हा सूर्यामध्यें राहून प्रजोत्पत्तीचें निमित्तकारण असतो. हें सहाव्या मंत्राचें तात्पर्य आहे. शिवाय या आचार्यांनीं उपनिषदांत सांगितलेल्या देवांच्या भार्यांचाही अंतर्भाव केला आहे. सातव्या मंत्रांतील संवत्सरांत वास्तव्य करणारा प्रजापति आहे. या संवत्सराचीं दोन अयनें हीं प्राण आणि रयिरूप आहेत. उत्तरायण प्राण आणि दक्षिणायन रयि होय. येथील ' कृत ' शब्दाचा अर्थ अन्य कर्म असा सांगितला आहे. आठव्या मंत्रांतील उत्तरार्धाचा व पूर्वार्धाचा संबंध असा दाखविला आहे कीं, उत्तरार्ध हा दक्षिणमार्गास नेणारा आहे आणि प्रथम अर्ध देवयानमार्गानें जाणारा आहे. नवव्या मंत्रांतील सूर्यलोकास जाऊं इच्छिणारे ऋषि शुक्लपक्षांत इष्टि करितात, म्हणजे निष्काम अशी प्राणपूजा करितात व चंद्रलोकास जाऊं इच्छणारे ऋषि कृष्णपक्षांत काम्यइष्टि म्हणजे रयि-पूजा करितात; असें तात्पर्य सांगितलें आहे. अहोरात्रांतील दिवस हा प्राण पुरुषामध्यें असतो आणि रात्रीची अधिष्ठात्री रयि ही स्त्रियांमध्यें असते. म्हणून पुरुषरेतामध्यें राहणारा प्राण

दिवसा स्त्री–संगत झाला, तर तो संग व्यर्थ होतो. हा अर्थ चिंत्य आहे, या आचार्य–भाष्यामध्यें उत्तरायण, शुक्लपक्ष, दिवस हीं सर्व प्राणरूप आणि दक्षिणायन, कृष्णपक्ष आणि रात्र हीं रयिरूप अथवा सरस्वतीरूप आहेत असें प्रतिपादिलें आहे. जे प्रजापतिव्रत करितात ते सत्यलोकाला जातात, असें दहाव्या मंत्राचें तात्पर्य सांगितलें आहे! सारांश, रयि, प्राण व परमेश्वर मिळून सृष्टीची उत्पत्ति होते.

प्रश्न दुसरा.

या प्रश्नाचें उत्तर देतांना आकाशादि पंचमहाभूतांच्या अभिमानी देवता किंवा तत्त्वदेवता स्थिति–हेतु आहेत; व चक्षुरादि देवता प्रकाश–हेतु आहेत आणि त्यांत मुख्य प्राण हा श्रेष्ठ आहे, असें दुसऱ्या मंत्रांत देवतांचें पृथक्करण केलें आहे. तिसऱ्या मंत्रांत 'प्राकाश्य' असा पाठ घेऊन, त्याचा अर्थ प्रकाशवंत असा केला आहे. तिसऱ्या मंत्रांत "मी या शरीरांतील पंचप्राणादि रूपांनीं हें शरीर धारण करितों व प्रकाशितों, अशी वस्तुस्थिति असून तुम्हीं आपसांमध्यें धारक कोण व प्रकाशक कोण असा वाद घातला आहे; हा तुमचा मोह होय." असें प्राण इतर देवतांस म्हणाला. अभिमान याचा अर्थ शरीर असा केला आहे. प्राण हाच गर्भस्थ असून, जनिक्रिया करणारा आहे. असा पांचव्या मंत्रांतील 'चरसि गर्भे' इत्यादि मंत्रखंडाचा अर्थ केला आहे.

प्रश्न तिसरा.

परमेश्वर जगाच्या जन्मस्थितिलयांचा नियामक आहे. या सिद्धांताचें स्पष्टीकरण या प्रश्नांत केलें आहे. येथें परमेश्वरापासून प्राण कसा उत्पन्न होतो? त्याचे पंचभेद कसे होतात? तो शरीरांत कां वास्तव्य करितो? त्याचे विभाग कसे? कोणत्या विभागामुळें जीवाचें उत्क्रमण होतें आणि त्याचीं अधिभूतादि स्वरूपें कशीं? इत्यादि प्राणविषयक अनेक प्रश्न येथें केले आहेत. दुसऱ्या मंत्रापासून उत्तराला आरंभ झाला आहे. ज्याप्रमाणें छाया ही सर्वथा शरीराधीन असते, त्याप्रमाणें महाश्रेष्ठ जो प्राण तोही आत्म्याच्या अत्यंत अधीन असतो. यावरून प्राणापेक्षां आत्म्याची म्हणजे परमात्म्याची आढ्यता जास्त आहे, असें ठरतें. येथें मन म्हणजे परमेश्वरी संकल्प होय. सारांश, परमेश्वराच्या इच्छेनें प्राण हा शरीरांत प्रवेश करितो व तोच सर्व प्राणांचा (मुख्य प्राणाचाही) नियामक आहे. वायुपुराणांत असें सांगितलें आहे कीं, 'प्रभु हा स्वतः पंचप्राणरूपात्मक होतो आणि मोक्षादिकांचें दान करितो. सूर्य हा प्राणाचें बाह्य स्वरूप आहे. सूर्यांत असणारा प्राण नेत्रामध्यें असणाऱ्या प्राणवायवर अनुग्रह करितो, असें सहाव्या मंत्रांत सांगितलें आहे. सातव्या मंत्रांत "मरणकालीं जीवाला ज्या विषयाचें चिंतन असतें त्या विषय–सहित चित्तासह जीव मुख्य प्राणाजवळ जातो. पण मुख्य प्राण हा उदानासह व परमेश्वरासह जीवाल

त्याच्या इष्ट स्थानाकडे घेऊन जातो. सारांश जीवाचें उत्क्रमण करणारा उदान वायु आहे. याप्रमाणें प्राणांची परमात्म्यापासून उत्पत्ति होते, त्याच्या इच्छेनें तो शरीरांत राहतो. तेथें पंचप्राणरूपी होऊन (विविध स्वरूपें धारण करून) मुख्य प्राण आपलें स्वामित्व प्रकट करितो; तोच आध्यात्मिकादि स्वरूपवान् होतो इत्यादि प्रकारचें ज्ञान ज्यास होतें तो मुक्त होतो; असें तिसऱ्या प्रश्नाचें तात्पर्य आहे.

प्रश्न चौथा.

या प्रश्नांत जगताचें भगवन्नियामकत्व केवळ जागृतावस्थेतच नाहीं, तर इतर अवस्थांमध्येंही आहे, असें सांगितलें आहे. जीव निद्रा घेत असतां कोणत्या देवता स्वव्यापारापासून निवृत्त होतात? कोणत्या स्वव्यापार करितात? स्वप्नामध्यें पदार्थ पाहणारा कोण? निद्रास्थितींत कोणाला सुख होतें? इत्यादि प्रश्न विचारले आहेत. जीवाला स्वतंत्रतेनें या अवस्था प्राप्त होत नाहींत. मुख्य प्राणाधीनही या अवस्था नाहींत. अतएव कोणाच्या आश्रयानें या जीवाच्या अवस्था असतात? हेंही जाणावयाची सौर्यायणीची इच्छा आहे. दुसऱ्या मंत्रांत सूर्यकिरणांचा दृष्टांत घेऊन असें सांगितलें आहे कीं, स्वप्न पडत असतां सर्व देवता मनामध्यें वास्तव्य करणाऱ्या विष्णु-स्वरूपांत एकत्र होतात, आणि गाढ निद्रित हृदयाकाशस्थ विष्णुस्वरूपांत एकत्र होतात. तिसऱ्या मंत्रांत अग्निहोत्राचा दृष्टांत घेऊन अपान हा पश्चिमेकडे असणारा गार्हपत्य अग्नि, व्यान हा दक्षिणेकडे असणारा अग्नि, अपानापासून, येणारा प्राण हा आहवनीय अग्नि, श्वासोच्छ्वासाला यथाकाळ येणाऱ्या दोन आहुतींसह समस्वरूप देणारा समानवायु हा अध्वर्यु, जीव हा यजमान, इष्ट फल देणारा उदान हा उद्गाता, इत्यादि रूपक संपूर्ण केलें आहे आणि मनाला स्वप्नदर्शन होतें, असा निष्कर्ष काढिला आहे. चौथ्या मंत्रांत जीव हा परमेश्वरी तेजानें अभिभूत झाल्यामुळें (परमेश्वराचें सान्निध्य प्राप्त झाल्यामुळें) गाढ निद्रित त्याला अत्यंत सुखप्राप्ति होते. कारण, भगवंताच्या शरीरासारखें शरीर या वेळीं प्राप्त होतें व त्याला आत्मस्वरूपाचें ज्ञान असतें म्हणून सुख होतें आणि शेवटीं असें सांगितलें आहे कीं, पंचमहाभूतें, त्यांच्या तन्मात्रा, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, शब्दस्पर्शादि सर्व विषय, मनःप्रमुख अंतःकरण पंचक, चेतनप्राणी इत्यादि सर्व पदार्थांस परमेश्वराचा आश्रय आहे. प्राण हा मुख्य धर्ता आहे. परमेश्वर हा सर्वांस सर्वप्रकारची शक्ति देणारा आहे, त्याचें शरीर प्राकृत नाहीं, असें परमेश्वरी ज्ञान ज्यास होईल, तो तत्स्वरूप होऊन त्याच्या जवळ राहतो. सारांश, मुक्त होतो.

प्रश्न पांचवा.

या प्रश्नांत ओंकारोपासनेचे मंत्र आहेत. तसेंच येथें फलश्रुतिही सांगितली आहे. दुसऱ्या मंत्रांत ओंकार हा परमात्म्याचा प्रतिपादक आहे. आणि त्याच-

प्रमाणें प्रतिमेच्या द्वारा ब्रह्मदेवाचा प्रतिपादक आहे. ज्ञान झालें असतां प्रणव-उपासना फलप्रद होते. प्रणवाच्या तीन मात्रा आहेत. त्या अकार, उकार आणि मकार होत. जो कोणी अकार हेंच अक्षर परमात्म्याचें वाचक आहे, असें समजून अकार–प्रणवानें परब्रह्माचें ध्यान करील, त्याला ऋग्वेदाभिमानी देवतांच्या साहाय्यानें भूलोकावर उत्तम ब्राह्मणकुलीं जन्म प्राप्त होऊन तो तपादिकांनीं संपन्न होईल. याचप्रमाणें द्विमात्रक प्रणवाचें ध्यान करणाराला अंतरिक्ष लोकाची प्राप्ति होते, आणि त्रिमात्रक ओंकारसाहाय्यानें परमात्म्याचें ध्यान करणाराला परमेश्वराचा साक्षात्कार होऊन तो तेजःस्वरूपी होतो. त्याला मात्र पुनर्जन्म प्राप्त होत नाहीं. मंत्रांतील ' जीवघन ' याचा अर्थ विरिंच (ब्रह्मदेव) असा केला आहे. तिसऱ्या मंत्रांत 'विप्रयुक्ताः' म्हणजे एकेक मात्रा निराळेपणानें जाणलेल्या असा अर्थ केला आहे. ' अनविप्रयुक्ताः ' याचाही तोच अर्थ केला आहे. अन्योन्यसक्त म्हणजे दोन मात्रांची जोडी होऊन त्यांचा संबंध झालेल्या मात्रा होत. याप्रमाणें दोन दोन मात्रांचें युग्म जाणलें असतां आणि तार (उंच) मंद्र (मंद) आणि मध्यमस्वरानें त्यांचा उच्चार केला असतां मृत्यूचें निवारण होत नाहीं; पण तिन्ही मात्रांचें उत्तम प्रकारचें ज्ञान होऊन त्यांचा उच्चार यथाशास्त्र झाला म्हणजे हा ध्याता मुक्त होतो, असा भावार्थ काढिला आहे.

प्रश्न सहावा.

हा वेळपर्यंत प्राण आणि जीव तिन्ही अवस्थांमध्यें परमेश्वराच्या स्वाधीन असतात असें ठरविलें. या प्रश्नांत मुक्त पुरुष सुद्धां त्याच्याच स्वाधीन असतात असें ठरवावयाचें आहे. येथें पहिल्या मंत्रांतील ' पुरुष ' या शब्दाचा अर्थ ' विष्णु ' असा आहे. प्राणादि सोळा कला जीवाच्या शरीराचे भाग असतात. त्या विष्णूपासून उत्पन्न होतात, तेथें लय पावतात आणि त्याच्या आश्रयानें असतात. तो पुरुष (विष्णु) जीवशरीराच्या अंतर्भागीं असतो. हा प्रथम प्राणाची उत्पत्ति करितो. ' हा सर्वथा माझ्या स्वाधीन असणारा आहे व भक्तिज्ञानादिकांनीं संपन्न होणारा आहे ' असा निश्चय करून परमेश्वरानें जीव–कलेचा अभिमानी जो प्राण त्याची उत्पत्ति केली. प्राणानंतर श्रद्धा, याक्रमानें सोळा कलांची उत्पत्ति परमेश्वरानें केली. येथें ज्या कला सांगितल्या आहेत त्या त्या कलांचा व त्यांच्या अभिमानी देवतांचा संग्रह करावयाचा आहे. असा अर्थ केला म्हणजे मोक्षामध्यें जड कलांचा प्रवेश होत नाहीं आणि जीवांसह म्हणजे प्राणाभिमानी देवतेसह परमेश्वरप्राप्ति होते, हें म्हणणें सयुक्तिक होतें. वासुदेव हा प्राणाचा स्वामी असून त्याचा उत्पादक आहे. तो पर, अव्यय, अद्वितीय अशा स्वरूपाचा आहे. मंत्रामध्यें जो क्रम सांगितला आहे, तशीच कलांची उत्पत्ति झाली आहे, असें नाहीं; तर प्राण, मन, इंद्रियें, आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी असा उत्पत्तीचा क्रम आहे. विष्णु हा नित्यमुक्त आहे आणि

म्हणून तो सर्वोत्तम आहे. म्हणजे यांचें उत्तमत्व सर्व-विलक्षण आहे. तिसऱ्या मंत्रांत समुद्र हा शब्द प्रथमांत नसून, सप्तमी विभक्तीमध्यें आहे! आणि त्याचा अर्थ समुद्रामध्यें असा करून, समुद्र आणि नद्या यांमध्यें भेद प्रकट केला आहे; आणि या फेरफारानें असा अर्थ केला आहे कीं, समुद्रांत जाऊन मिळणाऱ्या नद्या अज्ञानी लोकांना दिसत नाहींत; तथापि त्यांचीं नामरूपें समुद्राहून निराळींच असतात, असें विद्वान् लोक म्हणतात. त्याचप्रमाणें मोक्षकाळीं कला (नामरूपांसह) परमेश्वरी स्वरूपांत लीन झाल्या, असें अज्ञानी पुरुषांस वाटतें; पण खरा प्रकार तसा नसून, कलांची नामरूपें परमेश्वराहून भिन्न म्हणजे निराळींच असतात, हा सिद्धांत आहे. भेद या शब्दाचा नाश असा कधींच अर्थ होत नाहीं; अवयव-विभाग असा अर्थ होतो. पुढें मग आपण अनुमानानें त्याचा नाश असा अर्थ करितों; शिवाय नामरूपें अवयव-हीन असतात, म्हणन त्यांचा नाश होणें शक्य नाहीं. 'नामरूपे विहाय' येथें 'रूपे' या पदापुढें अवग्रह आहे, असें समजून 'अविहाय' असें पद घेतलें म्हणजे श्रतीचा अर्थ सुसंगत होतो! तात्पर्य येथें श्रुतीला भेद इष्ट आहे. जीव आणि ब्रह्म हीं निरनिराळीं आहेत, असें सांगावयाचें आहे. श्रुतीला भेदवाद इष्ट आहे, अद्वैतवाद इष्ट नाहीं. याप्रमाणें श्रीमन्मध्वाचार्यांचा सिद्धांत आहे. श्रीमन्मध्वाचार्यांनीं आपल्या सिद्धांताचें प्रणयन श्रुतीच्या व स्मृतिपुराणां-दिकांच्या द्वारें केलें आहे.

यापुढें श्रीमद्दयानंद स्वामींचे प्रवचनाचा विचार करावयाचा; पण तें सद्यःप्रसंगीं फारसें इष्ट दिसत नाहीं. कारण हे स्वामीजी प्रायः द्वैतवादी असल्यामुळें त्यांचे सिद्धांत विशिष्टाद्वैताच्या व केव्हां द्वैतसिद्धांताच्या मध्यें अंतर्भूत होतात. म्हणन त्यांचा विचार येथें मी करीत नाहीं.

याप्रमाणें इतर आचार्यांच्या मतांचें विवरण झालें. यावरून कोणाच्याहीं लक्ष्यांत हें येईल कीं, प्रत्येक आचार्यास जो सिद्धांत खरा वाटत आहे, त्याला अनुसरून प्रत्येकानें त्या सिद्धांतास अनुकूल असा प्रत्येक मंत्राचा अर्थ केला आहे. हें करितांना प्रत्येक आचार्यास थोडीबहुत पदांची व अर्थांची ओढाताण करावी लागली आहे. असो; ह्यासंबंधानें मी गणित केलें नाहीं, तथापि मायावादी शंकराचार्यांच्या मतानुसार अर्थ करावयाचा, म्हणजे फार कमी ओढाताण पडते, इतर मतांत जास्त पडते, असा माझा अजमास आहे. श्रुतीला केवलाद्वैत मात्र इष्ट आहे; पण अधिकारानुसार श्रुतीनें आपले अपौरुषेय बोल कधीं द्वैतभाषेंत व कधीं अद्वैतभाषेंत प्रकट केले आहेत, अशी माझी समजूत असल्यामुळें, मला अर्थ करितांना कोठेंच अडचण पडत नाहीं. इतर आचार्यांच्या अनुयायांनीं हा प्रकार एकदां अजमावून पहावा